# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. IV AKOLA :—SATURDAY EVENING, SEPTEMBER 4, 1869 NO. 35

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ४ माहे सप्तंबर सन १८६९ इ० अंक ३५.

### ज्ञातीच्या सभा व बहिष्कार यांविषयीं कायदा.

जून महिन्यांत मुंबईस विधवाविवाह झाला त्यावेळीं सदरहु कृत्यास प्रतिकूल असणारे लोक सभा भरवितील व तत्पक्षी लोकांस बहिष्कार टाकतील तर ते कायद्याप्रमाणें गुन्हेगार होतील कीं नाहीं? असा रा० रा० शांताराम नारायण मुंबईच्या हायकोर्टाचे वकील यांस इंदुप्रकाशद्वारां प्रश्न झाला व त्याचें सविस्तर उत्तर त्यांनीं दिलेलें इंदुप्रकाशचे पुरवणी द्वारें प्रसिद्ध झालेंच आहे त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं सभा भरविणें व बहिष्कृत टाकणें हा पिनल कोडच्या ४९९ कलमा प्रमाणें अब्रू घेण्याचा गुन्हा घडेल व त्याबद्दल दोन वर्षांची कैद व दंड होईल. व ती सभा पिनल कोडचें १४१ कलमाप्रमाणें गैर कायदा मंडळी होईल व तिच्या प्रत्येक सभासदास सहा सहा महिन्यांची कैद व दंड होईल.

हा अभिप्राय इंदुप्रकाशांतून प्रसिद्ध झाल्यावर पुढील आठवड्याच्या नेटिव ओपिनियन पत्रांत पुढें लिहिलेले सहा प्रश्न आले. व ते प्रश्न आणि इंदुप्रकाशाची पुरवणी एका गृहस्थानें रा० रा० नानाभाई हरिदास हायकोर्टाचे वकील यांजकडे अभिप्रायास पाठविली त्यावरून त्यांनीं आपले अभिप्रायाचीं सविस्तर उत्तरें दिलेलीं पुढें लिहिलीं आहेत. यावरून कायदा कोणत्या प्रकारचा आहे व त्यावर विद्वान व हुशार गृहस्थांस दोन्ही पक्षी कोट्या करावयास कसें सांपडतें हें आमचे वाचकांस दिसून येईल. रा० रा० शांताराम नारायण यांचा अभिप्राय लोकांत मानवला गेला नाहीं व ती फिका पडला असें दिसतें. कारण लोकांनीं त्यांच्या मताविरुद्ध सभा केल्या व बहिष्कारही घातले. तथापि शांताराम यांची योग्यता, विद्वता, व हुशारी कमी आहे असें कोणी समजूंनये. प्रकरणाच्या स्वरूपावरून व आपल्या स्वतांच्या मतावरून कोर्टांत दोन्ही पक्षाचे वकील आपआपले मुद्दे न्यायाशीं अगदी नेऊन भिडवित असतात व त्यांतील एक एकटा पक्ष ऐकला असतां दोन्हीही केवळ खरे व सयुक्तिक आहेत असें ऐकणारांस वाटतें. पण शेवटीं त्यांतून एकास च प्राधान्य मिळतें. तोच प्रकार एथें लागू आहे. असो. या दोन्ही अभिप्रायांचे इंग्लिश व मराठी मिळून मुंबईस ओरिंयटल छापखान्यांत रा० वामन रामचंद्र ओक यांनीं एक पुस्तक तयार केलें आहे. व त्याची एक प्रत आम्हांस आली आहे. तिजवरून हें पुढील प्रकरण उतरून घेतों—

#### प्रश्न

१. आपल्या ज्ञातींतील अथवा उपज्ञातींतील विधवेचें लग्न धर्मशास्त्रानें अनुज्ञात आहे किंवा नाहीं, याचा विचार करून त्याचा निर्णय करण्यास हिंदु लोकांपैकीं कोणत्याही ज्ञातीला किंवा उपज्ञातीला कायद्यानें प्रतिबंध आहे कीं काय?

२. पुनर्विवाह धर्मशास्त्राविरुद्ध आहे असा वरील विचाराचा निर्णय झाल्यास, आणि म्हणून, पुनर्विवाह करणारे स्त्रीपुरुषांबरोवर सहवास अथवा हर कोणताही व्यवहार किंवा संबंध त्या लोकांच्यानें स्वधर्माप्रमाणें ठेवतां येणार नाहीं, असें असल्यास हें त्यांचें मत उघडपणें बोलून दाखविण्यास जेणें करून त्यांस प्रतिबंध आहे असा एकादा कायदा आहे कीं काय?

३. असा विवाह ( म्हणजे ब्राह्मणींपुनर्विवाह ) त्यांचे ज्ञातीचे नियमां विरुद्ध आहे ही गोष्ट खरी असल्यास तसें निश्चय पूर्वक म्हणण्यास कायद्याचा प्रतिबंध आहे कीं काय?

४. जर एका हिंदूनें विधवेशीं लग्न केलें, तर त्याणें अशी गोष्ट केली हें त्याचे ज्ञातीचे सभेंत अथवा अन्यत्र त्या ज्ञातीचा एकादा मनुष्य उघडपणें निश्चयात्मक म्हणूं शकेल कीं नाहीं?

५. जर त्यांचें ( ज्ञातीचें ) मतें असा पुनर्विवाह धर्मशास्त्र व ज्ञातिधर्म यांच्या विरुद्ध आहे आणि या मर्यादेस उलंघून जे पुनर्विवाह करितात ते बहिष्कारास पात्र होतात, असें होत असल्यास, जर त्यांची सर्व ज्ञात अशा मनुष्यांस बहिष्कार टाकण्याकरितां एकत्र मिळेल आणि असा नियम ठरवील कीं, अशा मनुष्यांबरोबर हर कोणताही व्यवहार राखूंनये; आणि त्या प्रमाणें ती ज्ञात व्यवहार बंद करील; अथवा पूर्वीं त्या पाशीं जो व्यवहार चालू होता तो बंद ठेवील; तर त्यांस कायदा प्रतिबंध करील कीं काय?

६. आपल्या ज्ञातींतील एकाद्या मनुष्यास बहिष्कृत करणें हें योग्य किंवा अयोग्य आहे, याचा विचार करण्याकरितां ज्ञातीच्या सर्व लोकांस एकत्र जमण्यास; आणि अशा मनुष्यानें ज्ञातीचे किंवा धर्मशास्त्राचे कांहीं नियमांस उल्लंघिल्यामुळें स्वज्ञातिच लोक हक्काचा अंश वेण्यास त्याणें आपणास अपात्र केलें आहे, असें मत देऊन त्या प्रमाणें ठराव करण्यास; त्यांस एकाद्या कायद्याची अडचण आहे कीं काय?

#### उत्तरें.

१. खासगी रीतीनें हर एक गोष्टी विषयीं सारासार विच्यार करण्याची मोकळीक सर्व मनुष्यांस आहे. ज्या कायद्यानें ही मोकळीक सर्वथैव नाहींशी होते, अगर अंशतः संकोचित होते, असा एकाद्या कायदा हिंदुस्थानांत हल्लीं चालू आहे, असें मला अवगत नाहीं. या करितां स्वज्ञातींतील विधवेचा पुनर्विवाह धर्मशास्त्रानें अनुज्ञात आहे किंवा नाहीं, याचा विच्यार करण्यास हिंदु ज्ञातीच्या कोणत्याही अंतर्ज्ञातीस किंवा वर्गास पुर्णपणें मोकळीक आहे.

२. त्याच प्रमाणें अशा विच्याराअंतीं जो काय निर्णय झाला असेल तो उघडपणें बोलून दाखविण्यास हिंदूच्या कोणत्याही ज्ञातीस तशीच मोकळीक आहे.

३. पुनर्विवाह हिंदूच्या ज्ञातिधर्माविरुद्ध आहे असें असल्यास तसें निश्चयात्मक रीतीनें प्रतिपादन करण्यास कोणत्याही कायद्याचा प्रतिबंध आहे असें मला वाटत नाहीं.

६.* धर्मशास्त्राविरुद्ध व ज्ञातिनियमांविरुद्ध अपराध न्यायाचे कोर्टाचे अधिकारांत येत नसून त्या त्या ज्ञातीचेच अधिकारांत येतात तेव्हां धर्मशास्त्राविरुद्ध व ज्ञातिधर्म ज्यांचा जोर धर्मशास्त्रा प्रमाणेंच हिंदूंवर चालतो, त्यांच्या विरुद्ध अपराध करणारांस स्वज्ञातींतून दूर करण्याचा अधिकार त्या त्या ज्ञातींतील लोकांस धर्मशास्त्र व अनादि काळापासून चालत आलेली वहिवाट यांवरून पूर्णपणें प्राप्त झालेला आहे. (स्ट्रेंजकृत हिंदु धर्मशास्त्र, प्रथम भाग पृष्ठ १६२; दुसरा भाग पृष्ठ २६१, २६७ व २६८.) तशा कारणा करितां जेव्हां जेव्हां ज्ञातीची सभा होये तेव्हां तेव्हां ज्ञातीच्या नियमाचे अनुरोधानें हा वरील अधिकार ज्ञातीचे लोक नेहेमी चालवित आले आहेत. आणि निरंतरचा किंवा कांहीं काळपावेतों बहिष्कार टाकल्याबद्दल उदाहरणें या आपल्या मुंबई प्रेसिडेन्सींत शेंकडों घडलेलीं आहेत. जातीनें टाकिलेलें वाळीत रद्द होण्यासाठीं वाळीत टाकलेल्या लोकांपैकीं पुष्कळांनीं न्यायाचे कोर्टांत फिर्यादी केल्या होत्या परंतु प्रत्येक फिर्यादीचा निकाल सर्वत्र एकच झाला असें दिसत आहे म्हणजे जातीनें टाकिलेले बहिष्कार कोर्टांनीं कायम केले इतकेंच नाहीं परंतु धर्मशास्त्रा विरुद्ध किंवा ज्ञातीच्या नियमांविरुद्ध कोणी अपराध करील, म्हाणजे त्यांचें उलंघन करिल, तर त्यास ज्ञातीबाहिर टाकण्यास ज्ञातीचे लोकांस पूर्ण अधिकार आहे असें शाबिद धरिलें आहे. (मोर्ली, भाग १ सदर ज्ञात; बारोडेल, भाग १. पृ. ३८, ३४७, ३६३, ३६८, ३६९, ३९८; व भाग २. ४७३, ५९८; सदर दिवाणी अदालत. (बंगाल) १०८, बेलासिस २५, ३५) हिंदु धर्मशास्त्र व अनादि काळापासून चालू वहिवाट यांवरून ज्या अर्थीं वर लिहिलेले अधिकार ज्ञातीस आहेत, आणि ज्ञातींतील ज्ञातिसंबंधाचे तंटयांत हात घालण्यास कोर्टांस अधिकार नाहीं (सन १८२७चा कायदा २ कलम २१) त्या अर्थीं ज्या तंटयांत ज्ञातीचे लोकांचा ज्ञातिकार्याचा मात्र संबंध असून दुसऱ्या कोणाचा नसतो असे तंटे सर्वथैव ज्ञातीच्याच अधिकाराखालचे आहेत. अर्थात ज्ञातींतील एकादा मनुष्य सर्व ज्ञातीस लागू असणाऱ्या नियमांबरहुकूम ज्ञातीचे हक्क उपभोगितो तो जर त्या ज्ञातिनियमांचें उलंघन करील तर असें करण्यानें त्याणें आपणांस बहिष्कारास पात्र केलें कीं नाहीं, हा प्रश्नही ज्ञातीचे अधिकारांतच येतो, आणि कांहींएक नियमांनीं आपखुशीनें स्थापिलेल्या मंडळ्या किंवा समाज हे प्रत्येक अशा प्रकाराचा अधिकार चालवित आहेतच. तेव्हां सर्व ज्ञात जर अशा प्रश्नाचा विचार करील, त्याबद्दल चौकशी करील, व त्याचा निर्णय ठरवील तर हें करण्यांत त्या ज्ञातीस निःसंशयित जे हक्क व अधिकार प्राप्त झालेले आहेत ते तिणें चालविले इतकें मात्र होतें; आणि असे अधिकार चालविण्यास एकादा प्रतिबंधक कायदा आहे असें मला अवगत नाहीं.

४. ज्ञातींतील प्रत्येक मनुष्यावर ज्ञातीचें महत्व, हक्क, व अधिकार कसे आहेत हें सहाव्या प्रश्नाचे उत्तरांत मी सांगितलें आहे. यावरून माझा अभिप्राय असा आहे कीं ज्ञातींतील कोणी एकानें स्वज्ञातींतील एक विधवेशीं लग्न लाविलें. अशाबद्दल जर ज्ञातीचे सभेंत जाऊन कोणी कांगावा करील अगर अशी गोष्ट ( म्हणजे पुनर्विवाह) केल्या विषयीं निश्चयात्मक सभेपुढें बोलेल तर असें बोलणारानें कायद्याविरुद्ध अपराध केला असें होत नाहीं. कारण कीं अन्यत्र हें कृत्य जरी अपराध होत असेल ( आणि खरोखर हा मुद्दा शंका घेण्यास पात्र आहे ) असें मानिलें तथापि या ठिकाणीं इंडियन पिनल कोडाचें कलम ४९९ यांतील आठव्या अपवादानें त्या मनुष्याचा बचाव होतो. तो अपवाद येणें प्रमाणें:—

"ज्या गोष्टीविषयीं कोणावर फिर्याद करावयाची त्या गोष्टीच्या संबधानें ज्यांला त्याजवर अधिकार आहे त्यांपैकीं कोणापाशीं इमानानें फिर्याद करणें हें अब्रू घेणें नव्हे."

माझ्या अभिप्रायाचा असाही कल आहे कीं, वरील मनुष्याचा बचाव नवव्या अपवादानेंही होईल. तो अपवाद असा:—

"कोणी कोणावर त्याच्या गुणाविषयीं आरोप केला असतां आरोप करणाऱ्याचें अगर दुसऱ्या कोणा मनुष्याचें नुकसान न होऊं देण्याकरितां किंवा साधारण सर्व लोकांच्या हिता करितां तो आरोप केला असें असल्यास तसा आरोप करणें हें अब्रू घेणें नव्हे."

आपले ज्ञातीच्या नियमांविरुद्ध जे काय अपराध किंवा कृत्यें, ज्ञातींतील हर कोणीही मनुष्यानें केलेलीं आपल्यास समजतील तर तीं सर्व स्वज्ञातीचे समोर आणणें हा ज्ञातीच्या प्रत्येक पुरुषाचा धर्म होय. त्याच प्रमाणें ज्ञातींतील कोणीही मनुष्य ज्ञातिधर्माचें उलंघन करूं लागल्यास त्यास शिक्षा करून किंवा दुसऱ्या रीतीनें प्रतिबंध करणें हें सर्व ज्ञातीचें कर्तव्य आहे व अशापासून हित आहे. आणि इंडियन पिनल कोडाचें कलम १२ यांत व्याख्या केल्याप्रमाणें " साधारण सर्व लोक " या शब्दांत लोकांची जमात किंवा जाति किंवा मंडळी यांचा संग्रह होतो. तेव्हां लोकांच्या एकाद्या जमातीचें, जातीचें किंवा मंडळीचें हित तें " सर्व साधारण लोकांचें " हित असें वरील कलमावरून सिद्ध आहे. आणि जर जि

* कोटिक्रमाचे सोयीसाठीं अनुक्रमापूर्वीं सहाव्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे.

तर्की जितर्की ज्ञातिधर्माचे उल्लंघनाचीं उदाहरणें आढळांत येतील तितकीं तितकीं सर्व ज्ञातीचे लोकांनीं ज्ञातीस कळविणें व ज्ञातीनें त्याबद्दल शिक्षा करणें यापासून त्यांचे ज्ञातीचा फायदा असेल, तर अशा बाबें कांगाळी करणाऱ्या मनुष्याचा बचाव होतो.

"सर्व साधारण लोकांचें हित" या शब्दाचा अर्थ वर लिहिल्याप्रमाणें घेऊन पाहिलें असतां माझा असा अभिप्राय आहे कीं, त्या मनुष्याचा बचाव पहिल्या अपवादानेंही होईल. तो अपवाद असा:—

"कोणावर खऱ्या गोष्टीचा आरोप केला असतां, अगर तसा आरोप प्रसिद्ध केला असतां, साधारण सर्व लोकांचें हित व्हावयाचें असें असल्यास, तशा खऱ्या गोष्टीचा आरोप करणें हें अन्नू घेणें नव्हे. परंतु त्या आरोपापासून साधारण सर्व लोकांचें हित व्हावयाचें कीं, नाहीं हें पाहिलें पाहिजे."

तसेंच त्या मनुष्यानें स्वज्ञातीच्या दुसऱ्या माणसास जपण्याची सूचना म्हणून ज्ञातीच्या सभेहून अन्यत्र वरील गोष्ट इमानानें प्रतिज्ञापूर्वक सांगितली असतां त्याचा बचाव दहाव्या अपवादानेंही होईल असें मला वाटतें. तो अपवाद येणेंप्रमाणें.

"कोणीं कोणाला कोणाविषयीं जपावयाची सूचना इमानानें केली असतां, ती सूचना ज्या मनुष्यास केली त्याच्या, अगर ज्या दुसऱ्या मनुष्याचें अगत्य तो बाळगतो त्याच्या, किंवा साधारणत: सर्व लोकांच्या, हिताच्या इराद्यानें केली असल्यास ती करणें हें अन्नू घेणें नव्हे."

९. साधारणत: धर्मशास्त्राविरुद्ध व ज्ञातिनियमांविरुद्ध अपराध करणाऱ्या ज्ञातींतील मनुष्यास बहिष्कृत करण्यास ज्ञातीस हक्क व अधिकार कायद्यानें आहेत हें सहाव्या प्रश्नाचे जबाबांत लिहिलेंच आहे. आणि वर लिहिलेले ज्ञातीचे हक्क व अधिकार जेणेंकरून विधवाविवाहाचे बाबतींत मात्र नाहींसे होतात किंवा संकुचित होतात अशाविषयीं निराळा एकादा कायदा अगर आक्ट असल्यावांचून इतर बाबतींत जे ज्ञातीस हक्क व अधिकार आहेत ते विधवाविवाहाचे बाबतींत ही अजून कायम आहेत हें स्पष्ट आहे. तेव्हां, पुनर्विवाहाबद्दलचा सन १८५६चा आक्ट १५ येणेंकरून वरील हक्कांत व अधिकारांत कांहीं कमज्यास्त होत आहे कीं काय, आणि होत असल्यास त्याचें काय स्वरूप आहे एवढें मात्र आतां पहाणें राहिलें आहे. याकरितां त्या आक्टाचे उपोद्घातांत काय आहे हें पाहूं. उपोद्घातांत असें लिहिलेलें आहे कीं,

"१ हिंदुस्थानांतील न्यायाचे कोर्टांत कायदा जसा चालवितात त्या कायद्यावरून हिंदुज्ञातीच्या कितीएक विधवा स्त्रिया खेरीज करून बाकी विधवांस एक वेळ त्यांचा विवाह झाल्याचे सबबेनें दुसरा कायदेशीर विवाह करतां येत नाहीं, आणि

२ पुनर्विवाहा पासून सदर्हू प्रकारचे विधवा स्त्रियांस झालेली संतति अनौरस होते व त्या संततीचा वारसा मालमिळकतीवर चालत नाहीं; आणि

३ हा कायद्याची हरकत ह्मणतात ती चालत आलेले चालीस अनुसरून आहे तथापि हिंदु धर्मशास्त्राचे खरे अर्थाप्रमाणें नाहीं असें बहुत हिंदु लोकांचें मत आहे, आणि जे हिंदुलोक आपले बुद्धीप्रमाणें सदर्हू विषयीं दुसरी चाल घालण्यास इच्छीत असतील त्यांस इनसाफाचीं कोर्टें जो कायदा चालवितात त्यावरून यापुढें मनाई होऊं नये अशी बहुत लोकांची इच्छा आहे यास्तव; आणि

४ सदर्हू प्रकारचे सर्व हिंदु लोक कायद्याची सदर्हू हरकत आहे म्हणून सांगतात ती दूर करावी हें वाजवी आहे. यास्तव; व

५ हिंदु ज्ञातीचे विधवा स्त्रियांचे विवाहास कायद्याच्या हरकती आहेत त्या सर्व दूर केल्यानें सुनीतीची वृद्धी होऊन लोकांचें कल्याण होईल यास्तव खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे."

याप्रमाणें या विषयाची स्थिती असतां हा कायदा शास्त्राची प्रतिकूलता व तत्संबंधानें अनाधिकार इतकें मात्र दूर करितो; परंतु वरील लिहिलेले व ज्यांचीं मनें तशा प्रकारचीं असतील त्यांस शिवाय करून बाकीचे जे हिंदु लोक राहिले त्यांस चालत आलेल्या चालीसच धरून राहण्यास अथवा त्यांचे बुद्धीनें वरील धर्मशास्त्राचा जो अर्थ खरा दिसेल तो तसा आहे असें म्हणण्यास व त्या दोन्ही गोष्टींबरहुकूम चालण्यास जो त्यांचा हक्क आहे त्यास वरील कायद्यानें तिलप्रायही प्रतिबंध झाला नाहीं हें स्पष्टच आहे. म्हणून वर लिहिले त्या धर्मशास्त्राचा अर्थ आपल्या बुद्धीप्रमाणें करून पाहिलें असतां विधवेशीं विवाह करणाऱ्या पुरुषाशीं त्याणें हा नवीन मार्ग स्वीकारिल्यामुळें पूर्वीप्रमाणें व्यवहार संबंध ठेवूं नये हें योग्य होय असें ज्या हिंदु लोकांस वाटेल व त्याप्रमाणें व्यवहार बंद करण्यास ते इच्छितील तर वरील आक्ट त्यांस कोणत्याही रीतीनें प्रतिबंध करणार नाहीं. त्याचप्रमाणें दुसरा कोणताही आक्ट प्रतिबंधक होणार नाहीं. आणि सर्व ज्ञाति वर लिहिल्या सारखें मत जर ठरावाचे रूपानें प्रसिद्ध करील तर ती कोणत्याही रीतीनें फौजदारी गुन्ह्यास पात्र होणार नाहीं. जातीनें एकाद्या मनुष्यास बहिष्कृत टाकिल्याबद्दल त्यावर फौजदारी मुकदमा होऊन त्याची दर्याफ्त हिंदुस्थानांतील कोणत्याही हाय कोर्टांत अजून पावेतों झालेली नाहीं. परंतु या प्रेसिडेन्सींत बाहेर गांवीं अशाबद्दल फौजदारींत फिर्यादी झालेल्या आहेत. तथापि असें समजण्यांत आलेलें आहे कीं, त्यांचा परिणाम फिर्याद करणारांस अनुकूल झाला नाहीं. राव साहेब महिपतराम यांचें एक उदाहरण त्यांपैकीं आहे. परंतु याबाबदींत दिवाणी दावे होऊन त्यांवर अपिलांत येथील हाय कोर्टाचे अपिलेट शाखेकडे पुष्कळ ठराव झालेले आहेत कीं, ज्ञातिभोजनास ज्ञातींतील एकास न बोलावणें- आणि वस्तुत: बहिष्कार समजण्यांत किंवा अनुभवास बहुधा याच स्वरूपानें येत असतात.—हें असें कायदेशीर नुकसान होत नाहीं कीं ज्याबद्दल दिवाणींत फिर्याद चालेल; कारण कीं, अशा समाजांत भोजनास जाण्याचा त्याचा कायदेशीर हक्क नाहीं. (स्पेशल अपीलें. २४३; २४४, २४५ आणि २५८, सन १८६७ चीं.) ह्मणून कोणा मनुष्यास त्याचे जातीनें बहिष्कार टाकला तर ज्या मनुष्याचे कांगाळीवरून अथवा खबरेवरून त्याला बहिष्कृत केला असेल त्या मनुष्यावर किंवा ज्ञातीवर फौजदारींत किंवा दिवाणींत फिर्याद करण्याचा उपाय नाहीं.

पांचव्या प्रश्नाचे उत्तरांत सांगितलेल्या कारणाकरितां जमलेली ज्ञातीची सभा इंडियन पिनल कोडाचें कलम १४१ यांत लिहिल्याप्रमाणें "गैर कायद्याची मंडळी" समजली जाणार नाहीं. कारण कीं, त्या कलमाप्रमाणें अशी मंडळी "गैर कायद्याची मंडळी" होण्यासाठीं जे हेतु आवश्यक आहेत त्यांच्याहून भिन्न असा या ज्ञातीच्या मंडळीचा साधारण हेतु आहे.

नानाभाई, हरिदास.

## सपुच्छ मनुष्यें.

ईश्वराची करणी अगाध आहे! या जगतितलावर व अंतर्भागीं त्या चतुर कारागिरानें ज्या अद्भुत वस्तु संग्रहित केल्या आहेत त्यांचा जेव्हां जेव्हां मनुष्यांस प्रथम शोध लागतो तेव्हां तेव्हां त्यांकडे मनुष्यमात्रांचें पराकाष्ठेचें चित्त वेधतें. शोधक पुरुषानीं हल्लीं असा एक शोध काढला आहे कीं पृथ्वीवर सपुच्छ म्हणजे शेपुटवालीं मनुष्यें आहेत. ही सामान्य आश्चर्याची गोष्ट आहे काय?

बोर्निओ बेटांत पुनांग म्हणून एक जातीचे लोक आहेत. हे मोठे लाजाळू असून फार अंतस्थ राहातात. कोणी नवीं मनुष्यें किंवा जनावरें यांचे दृष्टीस पडली कीं हे भयाभीत होऊन झाडांच्या आड लपतात. व जे त्याचे नजरेचे अटोक्यांत येतात त्यांस ते ठार मारितात. ते फार कुरूप व बेढब दिसतात त्यांचा बांधा व रंग, बासाप लोकांसारखीं असून कपाळ उंच, चेहरा भव्य, व तोंड फारच रुंद आहे. ते जी भाषा बोलतात तिचें दुसऱ्या त्या देशच्या लोकांच्या भाषांशी कांहीं साम्य नाहीं. त्यांचा ध्वनी एकेरी शब्दासारखा खुला आहे. हें सर्व असो, पण सर्वांहून विलक्षण तऱ्हा ती ही कीं त्यांनां जनावरासारखें शेपुट आहे. व तें कोणास लहान कोणास मोठें असें असून स्त्रियांस पुरुषांपेक्षां लहान आहे. या शेपटाची साधारण लांबी तीन इंच पासून पाच इंच पावेतों आहे- हें शेपुट काठिण, ताठ, व चलनवलन रहित असतें. तेणेंकरून त्यांस बसण्यास मोठी पंचाईत पडते. व त्याकरितां पुनांग लोक शेपटाचे बेतानें भोक पाडेललें एक लाकुड आपलेबरोबर सर्व काळ वागावित असतात. व त्याचा पाहिजे तेथें खुर्ची सारखा उपयोग करितात. व बसण्याचेवेळीं जपून शेपूट त्या छिद्रांत आधीं खोवून मग बसतात. कुती संस्थानांतही अशा प्रकारचे लोक आहेत. पण त्या जातीस नाव दुसरें आहे. कित्येक राष्ट्रांतील मुळचे लोक या पुनांग जाती विषयीं असेंच सांगत आले आहेत. व गुनांग ताबूर एथील सुलतानाच्या लोकांनीं त्यां पैकीं तीन मनुष्यें गेल्या वर्षीं धरून आणिलीं होतीं व तेव्हां मि० वान हात्रप हे बोर्निओ प्रांतीं होते त्यांनीं तीं मनुष्यें पाहिलीं. व त्यांचीं शेपटें हातीं धरून बारकाव्यानें त्यांची विचक्षणा करून ठरविलें कीं हें शेपुटच आहे. उगीच भात किंबा मांस वाढून अवाळू वगैरे होत असतें तसें नाही.

तीं मनुष्यें युरोप खंडात हालंड देशीं जीवंत किंवा मृत तरी आणवून आतां त्यां विषयीं तिकडील पंडित लोक अधिक माहिती करून घेणार आहेत.

## दस्तऐवज रजिष्टर करण्याविषयीं.

प्रजेचा धर्म आहे कीं आपले राजानें केलेले कानू कायद्याप्रमाणें वर्तन करून आपणास दोषापासून दूर ठेवावें. ह्या वऱ्हाडांत हल्लीं रेजिस्ट्रेशन आक्ट म्हणजे नोंदणीचा कायदा सुरू होऊन सुमारें १४ महिने होत आले परंतु लोकांस त्याची पुरी समजूत न झाल्यामुळें म्हणा किंवा दुसरे कोणते कारणामुळें म्हणा जे दस्ताऐवज अवश्य रजिष्टर केले पाहिजेत ते कधीं कधीं रजिस्टर केले जात नाहींत. तसेंच ज्या दस्ताऐवजांस रजिष्टर करणें खुषीचें काम आहे तसे दस्ताऐवज रजिष्टर केले असतां काय फायदा आहे. त्याकडे लक्ष न देतां ते रजिष्टर क्वचित होतात. ह्यामुळें न्यायाचे अगर इतर सरकारी कामांत त्या दस्ताऐवजांपासून कायद्यानें होणारा लाभ व्हावा तसा होत नाहीं. जो दस्तऐवज रजिष्टर कायदा सुरू झाल्यानंतर लिहिला गेला तो रजिष्टर करणें कायद्यानें अवश्य असून रजिष्टर न केल्यास त्यास पुराव्यांत बिलकुल घेतलें जात नाहीं. यामुळें दस्तऐवज केल्या पासून कांहींच फायदा होत नाहीं. आतां असें म्हणणें नाहीं कीं लोक बुद्धिपुरस्कर कायद्याचे हुकुमाची अवज्ञा करितात. परंतु ही चूक कायद्याचे गैरमाहितीमुळें उत्पन्न होते व या चुकीपासून अखेरीस नुकसानी होते यास्तव लोकांनीं आपलें बरें होण्याकरितां त्या कायद्याची माहिती करून घेणें अवश्य आहे. व दस्तऐवज रजिष्टर केल्यापासून एक तर त्यांची मुदत एरव्ही पेक्षां वाढते व दुसरें रजिष्टर न केलेले दस्तऐवजा पेक्षां त्यांची मजबुती ज्यास्त समजली जाते. कित्येक दस्ताऐवज असे आहेत कीं जे रजिष्टर करणें भाग आहेत ते रजिष्टर झाल्यास पुराव्यांत घेतले जाऊन त्यांस सदरील फायदा प्राप्त होतो व न झाल्यास मुळींच ते दस्ताऐवज रद्दी म्हणून समजले जातात- येणेंकरून अर्थातच तोटा आहे. हे दस्ताऐवज केव्हां कोठें व कसे रजिष्टर करावे याविषयीं सर्व मजकूर नोंदणीचे कायद्यांत सांगितला आहे त्याकडे लक्ष देणें अवश्य आहे. कधीं कधीं दस्ताऐवज रजिष्टर न होण्यास हेंही एक कारण असतें कीं दस्ताऐवज लिहून घेणार यास असें वाटतें कीं आपल्यास कोडतांत अगर सरकारांत या दस्ताएेजाबद्दल दावा करण्याचा प्रसंग पडणार नाहीं. परंतु अशी कल्पना करणें केवळ व्यर्थ आहे. कारण जरी हल्लीं दस्ताऐवज लिहून देणार व घेणार यांमध्यें सौजन्य आहे तरी तें चिरकाल चालेल अशी काय खात्री आहे? न चाललें म्हणजे सरकारांत जाणें अवश्य सरकारांत गेलें म्हणजे मग त्या दस्ताऐवजास कोणीच विचारीत नाहीं किंवा विच्यारिल्यास त्यास जे वढी प्रतिष्ठा असावयाची तेवढी मिळत नाहीं मग अलबतच तोटा आहे. यास्तव जें काम करणें आहे तें मुळींच पायाशुद्ध केलें

पाहिजे. सरकारचा हेतु कायदा करण्यांत लोकांस सुलभता प्राप्त होऊन तर्कटिपणा व लबाडी ह्यांचा ऱ्हास व्हावा असा आहे. आणि मग जर आपण त्या कायद्याचा लाभ साधून न घेतला तर चूक कोणाची बरें? विचार करून पाहिलें असतां रजिष्टर कयद्याचा हेतु हा आहे कीं दस्ताऐवज लिहिला गेला तेव्हां तो खरोखरी लिहून देणाराचे खुशीनें व सल्यानें लिहिला गेला की नाहीं याचा तपास व्हावा म्हणजे तो दस्ताऐवज नोंदणी करित असल्यानें रजिष्टर सर्व गोष्टीचा तपास व खुलासा करून घेऊन तो दस्ताऐवज नोंदतो ह्यामुळें तो निर्विवाद पुरावा कित्येक अंशीं समजला जातो.

ह्या बाबदींत आणखी पुष्कळ लिहिणें आहे तें पुढील अंकांत लोकांस नोंदणीचे कायद्याची सर्व माहिती थोडक्यांत होईल असे रितीनें लिहिलें जाईल.

## Local
## वऱ्हाड.

वाशिम जिल्ह्यांतील पुसदाहून पत्र आल्यावरून कळतें कीं तेथें धर्मार्थ दवाखान्यावर नेटिव डाक्टर गेले आहेत ते म्हणतात कीं आम्हांस पटकीचे आजारा शिवाय दुसऱ्या कसल्या रोगावर औषध देण्यास डिपुटि कमिशनर साहेबांचा हुकूम नाहीं. व तोही सरकारी लोकांस औषध देण्यापुरता आहे. गावकरी लोकांस औषध पाहिजे तर त्यांनीं दवाखान्यांत येऊन रोज दोन रुपये देऊन घेऊन जात जावें व आपले घरीं डाक्टरास नेणें असेल तर दर इसमानें दररोज पांच रुपये देत जावें. व याजबद्दल त्यांनीं नायब तहशिलदाराजवळ ५ शाळे कडल्या दुसऱ्या एका गृहस्थाजवळ पुष्कळ तक्रारही केली. ही गोष्ट तंतोतंत अशीच असेल तर आश्चर्यकारक खरी!

मागें बाळापुरच्या एका डाक्टरानींही असेच रुपये मागितल्याची गोष्ट वर्तमान पत्रांत आली होती. डाक्टरलोक शहाणे असून वेड्याचा बाजार हा काय आहे? त्यांचे दवाखाने धर्मार्थ आहेत. तर धर्मार्थ शब्दाचा अर्थ त्यांस कळतो काय? कळत नसल्यास शाळेत जाऊन तरी त्यांनीं कांहीं शिकावें. लोकांच्या देहरक्षणासारख्या महत्वाच्या कामावर असे पंडित लोक नेमणें म्हणजे जरा अवघडच होय. आम्हीं इच्छितों कीं त्यांचे वरिष्ठांनीं ही त्यांची गैर समजूत लवकर काढून टाकावी. व लोकांनीं धर्मार्थ दवाखान्यांतील औषधाकरितां डाक्टरांस सदरील प्रमाणें चिरीमिरी दिली पाहिजे किंवा नको या विषयीं जाहिर नामे लावून सर्वत्र प्रसिद्ध करावे म्हणजे बरें होईल.

बदनेरा गावास व त्याच्या आसपासच्या प्रदेशास सन १८६७चा तिसरा आक्ट जुगार खेळणारास शिक्षा करण्या विषयींचा,लागू केला आहे.

फर्स्ट ग्रेड ओव्हरसियर रविरिओ यांस खामगांव ब्रांच रेलवेकडून पश्चिम वऱ्हाडाकड दिले.

मि० जि० कोलिन्स पोलिसचे फर्स्ट क्लास इन्स्पेक्टर यांस वाशिमास आफिशियेटिंग पोलिस सुपरइंटेंडंट नेमिले.

उमरावतीच्या सत्यप्रकाश वर्तमानपत्राच्या मालकीचे व भांडवलाचे कामीं कांहीं वाद उत्पन्न झाला आहे असें आजच्या अमच्या पत्रांतील नोटिशीवरून वाचकांस कळेल.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस--

वि०वि० महाराज तारीख ३० माहे आगष्ट सन मजकूरचे सुबोध प्रकाशांत इलिचपुर या सदराखालीं असें लिहिलें आहे कीं "रा० रा० वामनराव गणेश शाळाखात्याकडील अकौंटिंग डेपुटी इन्स्पेक्टर आणि रा० रा० बाळाजी नरसिंह इंग्रेजी शाळेचे हेड मास्तर या उभयतानीं निजाम सरकारचे राज्यांत नवीन स्मालकाज कोर्टें व मुनसफ कोर्टें स्थापन होणार आहेत. त्यांतील एखादि जागा आपणास मिळावी म्हणून त्यांणीं अर्ज केल्याचें समजतें." त्यास सदरील मजकूर सर्वथैव खोटा व अप्रमाण आहे आणि आम्ही असें खचित कळवितों कीं सदरहूबद्दल आम्ही अर्ज वगैरे कांहीं येक केलें नाहीं. तुमचे बंधूनें असली बातमी कांहीं आधार नसून लिहिली ही मोठी दुःखाची गोष्ट आहे यास्तव ही माहिती त्यांस कोठून मिळाली हें कृपा करून त्यांणीं कळविण्याचें करावें. कळावें तारीख ३० आगष्ट सन १८६९ इसवी मुकाम इलिचपुर.

वामन गणेश परांजपे.

बाळाजी नरसिंह मुधोळकर.

*** खरेंच निराधार असें लिहिणें जोखिमाचें असून थोडें अप्रतिष्ठेसही कारण आहे. सदरहू गृहस्थ अब्रूदार असून सरकारी बरेच मोठे कामदार आहेत आणि ते सुबोधप्रकाशाच्या गावच्या गावीं राहत असतां त्यानें चांगली माहिती न मिळवितां एकदम पत्रांत ही गोष्ट लिहिली हें कित्येक प्रकारें वाईट केलें. एक तर त्या उभयतां गृहस्थांविषयीं त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचे मनांत संशयास कारण उत्पन्न केलें. दुसरें, इंग्लिश विद्याभ्यास केलेले व चांगले विचारी हे गृहस्थ आहेत व इंग्लिश सरकारांतील स्थाइकच्या अशा निर्भेय जागा सोडून त्यांनीं अव्यवस्थित नेटिव राजाच्या मुलखांत चाकरी इच्छिल्याचें लिहिल्यानें त्यांच्या मनाची वेगळ्या प्रकारची स्थिती दर्शविली. तिसरें, निजामाच्या राज्यांत त्या ज्या जागा भरावयाच्या आहेत त्या मद्रास इलाख्यांतील लोक आणून भरणार आहेत असें प्रसिद्ध झालेलें असतां हे गृहस्थ अर्ज कशास करितील? इत्यादि गोष्टींचा विच्यार केला असतांतो गोष्ट खरी नसेल असें सुबोधप्रकाश कर्त्याच्या मनांत येण्याजोगें नव्हतें असें आम्हांस वाटत नाहीं. व पक्का आधार मिळण्यास अडचणहोती तरती गोष्ट खरी ठरेपर्यंत ती विषयीं कांहीं लिहिलें नसतें तर न चालतें असेंही नव्हतें. मग आमच्या बंधूनें असें कां केलें कोण जाणे! व०स० कर्ता.

### अकोला.

मि. जे. एच बर्नेस येथील एक्स्ट्रा असिस्टंट कमीशनर यांस जष्टिस आफ धि पीस नेमिलें.

काल दोन प्रहरीं व रात्रीं आणि आज सकाळीं पाऊस मोठा व चांगला पडला.

एथें रात्रीं पोलिसाची गस्त निघत असते. ते शिपाई नाटकांतील राक्षसपुढच्याप्रमाणें बहुतेक घराशीं ओरड करून घरवाल्यांस त्रास देत असतात. तर त्यांनीं असें न ओरडण्या विषयीं त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांस ताकिद देतील तर चांगलें होईल.

बाळापुर तालुक्याच्या वनचराई मक्त्या विषयीं आम्हास मजकूर समजला आहे त्या व दुसरे कांहीं गोष्टींचे संबंधानें येथील डिपुटी कामिशनर आफिसास आम्हास कांहीं सूचना करावयाच्या आहेत त्या पुढील खेपेस करूं.

नदीवरील बोटीची दुरुस्ती करून तीस तक्ते व कठडे मारले आहेत हें चांगलें केलें पण मनुष्यें आंत फार बसवितात ही चूक आहे. आज दोन वेळां बोट पालथी होऊन लोकांस त्रास झाला व पाणी थोडें होतें म्हणून बच्याव झाला, नाहीं, पेक्षां, जलसमाधीवर पाळी आली असती.

एथील हायस्कुलांतील असि० मास्तर रा. रामचंद्र हरी यास पुसद एथें स्कूलमास्तर नेमिलें. तेथील मास्तर रा० विनायक राव भिडे रजेवरून परत आले नाहींत.

## Epitome of News
## वर्तमानसार.

आनरबल एलिस साहेबयांस हिंदुस्थान सरकारचे कौंसलदार नेमिलें, तेव्हां मुंबईचे लोकांनीं त्यांस जें मानपत्र दिलें त्याचें त्यांकडून हल्लीं आभारपूर्वक उत्तर आलें आहे. त्यांनीं मुंबईच्या युनिवर्सिटींत म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेचे वेळीं इकडील देश भाषां पैकीं एकींत पास झालेल्या विद्यार्थ्यां पैकीं एकास दरसाल ५० रुपये किमतीचीं पुस्तकें बक्षिस द्यावीं व रत्नागिरीचे हायस्कुलांत वार्षिक परीक्षेचे वेळीं २५ रुपयांचीं पुस्तकें बक्षिस द्यावीं अशी इच्छा दर्शविली आहे व त्याकरितां साहेब मजकूर रकम वेगळी काढून ठेवणार आहेत. तसेच मुंबईचे लोक यांच्याकरितां जी वर्गणी जमा करित आहेत त्यापैशाचे व्याजावर युनिवर्सिटींत एक स्कालरशिप ठेवणार आहेत.

न्यूसाउथ वेल्स प्रांतांत हिऱ्याच्या खाणी सांपडल्या आहेत व त्यांतून चांगले हिरे सापडतात.

मक्केची सालमजकूरची यात्रा सुमारे सवालाख जमली होती.

देवी काढण्याच्या खात्याचा मुंबई इलाख्याचा गुदस्त सालचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून कळतें कीं २८० मनुष्य देवी काढण्याचे कामीं होते. त्यांनीं ४२६२९३ मुलांस देवी काढिल्या त्यां पैकीं शेकडा ९५॥ इसमांस त्या गुणावह झाल्या. या कामीं एकंदर खर्च १११९२४ रुपये लागला. त्यामानानें दर मुलास च्यार आणे दोन पै खर्च आला.

अमदाबादेकडे ११ महिन्यांच्या व १८ महिन्यांच्या वयाच्या दोघी मुलींचीं लग्नें झालीं आहेत.

मुंबईस वाफेचीं यंत्रें चालतात त्यांची तपासणी हमेषा करण्याचे कामीं मुंबई सरकारानें कायदा केला होता तो हिंदुस्थान सरकारानें पास केला व त्याजवर सन १८६९ चा ६ वा नंबर पडला.

पुण्यस मि० बालकृष्ण मुदलियार या नावांचे येक मोठे व प्रख्यात गृहस्थ मरण पावले हे मद्रासेहून १८१९ सालीं ड्युक आफ वेलिंगटन यांजबरोबर मुंबई इलाख्यांत आले. यांस ७३ वें वर्ष होतें.

मुंबईचे नवे कमांडर इन चीफ सर एसेंन्सर आगष्टच्या १७वे तारखेस मुंबईस येऊन पुण्यास आले व जुने कमांडर लार्ड नेपियर साहेब ३१ वे तारखेस विलायतेस जाण्याकरितां आगबोटींत बसले.

मुंबईचे नामांकित व्यापारी शेट कावसजी जाहांगिरजी रेडी मनी यांनीं लंडन शहरांत रिजेंट पार्क मध्यें एक पाण्याचा हौद बांधिला. त्याचे सुरवातीचा समारंभ गेल्या महिन्याचे दुसरे तारखेस झाला. त्याची उंची २२ फुट आहे. खर्च १४००० रुपये लागला

जबलपुर रेलवे पुढील जून महिन्यांत चालू होणार असें पायनियर पत्रांत अधारपूर्वक लिहिलें आहे.

पंजाबाकडे अजून पाऊस नाहीं. धान्याचे दर दिवसानु दिवस फार चढत आहेत.

स्टांपाचा कायदा मागील सर्व कायदे टाकून नुकताच एक पास झाला आहे. व तो जानेवारी पासून अमलांत येणार आहे. हल्लीं फ्रेंड आफ इंडिया पत्रावरून असें कळतें कीं मि० मेन साहेब विलायतेस जाण्यापूर्वीं जुडीशल स्टांप आक्टाविषयीं एक मसुदा कायदे कौंसलांत गुजारिण्याची तयारी करित आहेत.

कोरोलीचे राजे महामारीचे आजारानें मरण पावले. हें संस्थान रजपूत संस्थानांत आहे. राजे साहेब स्वभावानें फार चांगले व प्रजेविषयीं ममताळू होते. यांस स्टार आफ इंडियाचा किताब मिळालिला होता. यांचा [illegible] चौरस मैलाचा आहे. त्यांत २ लक्ष लोक आहेत- व त्याची साडेतीनलक्ष वसुली बेरिज आहे.

रजपुत संस्थानांत मेवाडप्रांतीं पिकें चांगलीं आहेत. परंतु पाली आणि जोधपुर इकडे पेरे करण्या जोगा जमिनीस ओलावा ही झाला नाहीं व तळीं कोरडीं आहेत.

घरकामाशिवाय इतर कांहीं कामाकरितां कोणी नेटिव लोक साहेब लोकांबरोबर लंडनास जातात व परत येण्यास पैसे न मिळाल्यामुळें पुढें लंडनचे रस्त्यांतून भटकत फिरतात. असें न व्हावें याजकरितां गवरनरजनरल साहेबानीं बंदर बंदरचे आफिसर यांस हुकूम दिले आहेत कीं असे जे नेटिव लोक विलायतेस जाऊं लागतील त्यांस समजूत द्यावी कीं परतीच्या पैशाची तजवीज ते आपल्या यजमानापासून आगाऊ करून घेत जातील.

यंदा पुण्यास कलेक्टर व इंजिनियर यांची वार्षिक सभा भरत नाहीं.

अक्कलकोटचे राजे गवरनर साहेबांचे मुलाखतीस गेले आहेत.

NOTICE—Is hereby given to Mr. A. Harvey Manager Berar Cotton Gg: and Press Co Ld. Khamgaum by the undersigned that he should within two days from receipt of their notice pay his salary for the stated period, as marked against his name; other wise he will be required to take legal steps. Narayen Gopal Storekeeper 30 days at 14 Rs. a month in August last. Rs. 13—8—9.

(Signed) NARAYEN GOPALL
care of Mahodeorao Ramchandra head cleark.

**वकिलीच्या परीक्षेच नियम**—गेल्या स० ग्याझेट मध्यें वकिलीच्या परीक्षेचे नियम प्रसिद्ध झाले आहेत त्यांत फेब्रुवारी महिन्यांत अगर त्या सुमारास मुंबईस परीक्षा होईल, परीक्षकरितां कमिटी नेमली जाईल व उमेदवारांनीं अर्ज करणें ते हायकोर्टाच्या रेजिस्ट्रारच्या मार्फत करावे. परीक्षेकरितां फी सात रु० व सनदेकरितां सात रु० द्यावे लागतील, सर्टिफिकिटें दाखल करणें वगैरे सर्व नियम पूर्वी प्रमाणेंच आहेत. फक्त परीक्षेचे विषय व त्याजबद्दल गुण लावणें यांजबद्दल मात्र फेरफार झाला आहे. परीक्षा व्हावयाची ती इंग्रजी, मराठी, गुजराथी व जरूर पडल्यास कानडी या भाषांत होईल. विषयावर गुणांची इयत्ता पुढें लिहिल्याप्रमाणें ठरविली आहे.

१ हिंदुधर्मशास्त्र—दायग्रहण, वारस, व दत्तक प्रकरण आणि मुसलमानी धर्मशास्त्र ............................१००

२ सिविल प्रोसिज्यर, मुदत, नोंदणी व स्टांप कायदे ................१००

३ करारशास्त्र, अपकृत्यशास्त्र व प्रमाणशास्त्र .................... ... ...१००

४ पिनलकोड व क्रिमिनल प्रोसिज्यर कोड .............................१००

या चार विषयांचे निरनिराळे चार कायदे परीक्षेकरितां दिले जातील. प्रत्येक विषयांच्या लेखी व तोंडी परीक्षेंत मिळून उमेदवाराचे निदान एक त्रितीयांशावर गुण लागले पाहिजेत आणि परीक्षेंत उतरण्यास एकंदर गुणांच्या संख्येच्या मानानें निदान दर शेंकडा साठ प्रमाणें लागले पाहिजेत असें आहे.

**बाबू**— खेतर मोहन दत्त यांनीं हिंदुस्थानांतील सिविल सर्विसच्या परीक्षेंत पसार झालेल्या उमेदवारांस वयाच्या संबंधानें दगाबाजीनें घोटाळ्यांत आणलें त्यांस लंडन येथील युनिवर्सिटी कालेजमध्यें हिंदुस्थानी शिकविण्याचें काम होतें त्या कामावरून दूर केलें. तसेंच ईस्ट इंडियां असोशिएशनच्या कौन्सिल मधून काढून टाकलें असें कळतें.

येत्या आक्टोबर महिन्यापासून पोस्टहपिसाविरुद्ध तकरारीचीं पत्रें त्या खात्याच्या अंमलदारांच्या नांवचीं असलीं तर तीं बिनहशील जातील. त्या लखोट्यावर "पोस्ट हापिसा विरुद्ध तकरार" असें लिहून अंमलदारांच्या नांवेंच मात्र पत्र पाहिजे. याप्रमाणें काम चालू होणार.

**मौजेची गोष्ट**— बोस्टन आडवर्टेजवरून कळतें कीं, अमेरिकेंत ओहिओमध्यें एक १०६ वर्षांचा गृहस्थ राहत आहे. त्याचा एक मुलगा ८० वर्षांचा आहे आणि दुसरा एक सहा महिन्यांचा आहे. त्यानें या हल्लींच्या बायकोशीं लग्न नऊ वर्षांपूर्वी केलें आणि तें लग्न करण्याचें तो कारण असें सांगतो कीं, आतां सरासरी लवकरच मी म्हातारा होईन तेव्हां माझा सांभाळ करावयास कोणी तरी लागेल असें वाटल्या वरून हें लग्न केलें. यावरून ते बाबा अजून म्हातारे झालेच नाहींत असें होतें. इं० प्र०

## क्रिमिनल प्रोसिजर कोड.

प्रोसिजर कोड सन १८६१ चा आकट २५ हा सुधारण्याबद्दल नवीन सन १८६९ चा आकट ८ झाला आहे त्यावरून पूर्वीच्या पैकीं पुष्कळ कलमें रद्द झालीं आहेत सबब पूर्वीच्या आकटा पैकीं चालू कलमें व हल्लीं नवीन झालेलीं कलमें एकंदर करून आम्ही आपले छापखान्यांत शिलाप्रेसावर चतुष्पत्री सांचाचे छापण्यास आरंभ केला आहे. सदरहू बुकाची किंमत रुपये २ आगाऊ ठेविली आहे. मागाहून जास्त किंमत पडेल. या बुकास समजुतीचा कागद जोडलेला सुद्धा मिळेल. हें बुक माहे सपटंबर सन १८६९ अखेर वर्गणीदारास बांधून तयार मिळेल. पत्र पाठविणारांनीं सोलापुर येथें "कल्पतरू" छापखान्यांत किमतीचे पैशासुद्धां अगर टिकिटें पाठविणें झाल्यास अर्धा आणा वर्ताळ्यासह पाठविले असतां बुक तयार होतांच रवाना करण्यांत येईल. किमती शिवाय टपालखर्च पडेल. ता० ९ माहे आगष्ट सन १८६९.

कल्पतरूचे मालक.

## जाहिरखबरा.

**नो**टिस—प्रेमसूक नथमल दुकान देउळगाव साकरशाचें यांस नोटिस देण्यात येते कीं, तुम्ही तारिख २८ जुलाई सन १८६९ इसवी रोजी वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिलेली पावली. त्याचें उत्तर असें कीं. आम्हांस दुकानचे देणें बिलकुल नसोन तुमचे दुकानची खातेबाकी ही आम्हीं कधीं रुजू केली नाहीं. आम्हास विनाकारण नोटिस दिल्ही त्यामुळें या नोटिसीचा खर्च अम्हांस लागला. हा खर्च आठदिवसांत दाखल करावा न केल्यास रिती प्रमाणें तजबीज लावण्यांत येईल तारिख २८ अगष्ट सन १८६९ इसवी.

( सही )अमृता वलद बहीरजी पाटील मौजे मांडवगांव तालुकें बाळापूर नि०

**नो**टिस—रामजी वलद बाबुजी ठाकुर वस्ती मौजे उंबरें तालुक बाळापुर यांस बाळाजी वलद माहादु ठाकुर राहाणार खामगाव यांजकडून अशी नोटिस दिली जाते कीं तूं आपले जातींतून पांच वर्षें भ्रष्ट झाल्यामुळें तूं मजला पुर्वी एकदस्ताऐवज लिहून दिल्हा आहे कीं एक महिन्यांत मजला जातीनें जातींत घेतल्यास उत्तम नाहींतर तुमची लेक नामें भागि ही माझी लग्नाची बायको आहे तिजला दुसरा नवरा करून देण्यास तुम्ही मुखत्यार आहा मी दावा करणार नाहीं म्हणोन तुम्ही तारिख १९ अगष्ट सन १८६१ इसवी रोजीं दस्ताऐवज लिहून दिला आहे त्याजला सुमारें दोनवर्षें झालीं आहेत तुम्हीं जातींत येऊन शुद्धीपत्र आम्हांस दाखवित नाहीं. याजकरितां तुम्हास या नोटिसीनें असें कळविण्यांत येतें कीं आज तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत तुम्ही जातींत येऊन शुद्धीपत्र आम्हास जातीचें दाखवाल तर उत्तम नाहींतर तुमचे दस्ताऐवजा प्रमाणें अमल करण्यांत येईल पुढें तुमची तकरार चालणार नाहीं कळावें तारिख ३० माहे अगष्ट सन १८६९ इसवी

( सही ) बाळाजी व० महादू ठाकूर याचे हातची संक्षेप.

## जाहिरात.

## मुदतीसंबंधी तिन्ही इलाख्याचे हायकोर्टाचे निवाडे.

सर्व लोकांस कळावें कीं, आम्ही मुदतीचे कायदे व इतर आकट यांजवर आजपर्यंत मुंबई, कलकत्ता, व मद्रास यांतील हायकोर्टांनीं ठराव केले आहेत त्यांचा उपयोगापुरता सारांश समजण्याजोगा फक्त मुदती प्रकरणीं व ते ठराव कोणते ग्रंथांत कोणते पानांत सांपडतील त्याविषयीं प्रत्येक ठरावावर खुलासा होण्याकरितां नंबर-तारीख, सन व त्या ग्रंथाचें पान याप्रमाणें लिहिलें आहे. या ग्रंथाची रचना अशी केली आहे कीं, ज्याज्या आकटाचे ज्या ज्या कलमावर हायकोर्टानें ठराव दिला आहे. त्या त्या आकटाचीं कलमें लिहून त्या कलमा खालींच ठराव, नंबरवार, व तारिखवार लिहिले. आहेत. फक्त सन १८५९ चा आकट १४ वरच झालेले ठराव लिहिले नाहींत. इतर आकटावर मुदती संबंधीं केलेलेही लिहिले आहेत. एक कलमावर आजपर्यंत किती ठराव झाले आहेत हें चांगले रितीनें समजावें म्हणून प्रथम मोठे अक्षरानीं कलम लिहून त्याचे खालींच त्या कलमावरचे सर्व ठराव लिहून नंतर दुसरें कलम या प्रमाणे ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथांत खालीं लिहिलेल्या बुकांपैकीं ठराव आहेत.

१ मुंबई हायकोर्ट रिपोर्ट वाल्यूम १ पासून वाल्यूम ५ भाग २ पर्यंत.

२ मद्रास हायकोर्ट रिपोर्ट वाल्यूम १ पासून ३ पर्यंत.

३ कलकत्ता उइकली रिपोर्ट वाल्यूम १ पासून १० पर्यंत.

४ शिवाय कितीएक वर्तमानपत्रांतील ठराव.

हे सर्व डिमळून सुमारें चार चारशें अगर साडेचारशें होतील.

अशा प्रकारचा ग्रंथ आजपर्यंत झाला नाहीं दिवाणी खात्यांतील न्यायाधीश व वकील लोक व वकिलीचे परिक्षेंत जाणार उमेदवार यांस याग्रंथापासून फारच उपयोग होईल, यांत संशय नाहीं. हें बूक छापण्याचें काम सोलापूर येथें कल्पतरू छापखान्यांत शिळाप्रेसावर सुवाच्य अक्षरांनीं जाड कागदावर चतुष्पत्री सांचावें सुरू केलें आहे. वर्गणीदारांस हें बूक ता० १५ डिसेंबर सन १८६९ चे आंत मिळेल हें बूक सर्वांस सोइंवार मिळावें म्हणून आगाऊ किंमत ३ रुपये शिवाय टपाल खर्च ०४ व मागाहून रुपये ४ व टपाल खर्च याच प्रमाणें ठेवला आहे तर ज्या लोकांची बुकें घेण्याची इछा असेल त्यांणीं ता० १५ माहे सपटेंबर सन १८६९ चे आंत रुपये पाठविल्यास आगाऊ असें समजलें जाईल. हे रुपये आमचे नांवें वर्गणीदारांनीं आपले नांव पत्यासुद्धां लिहून पाठवावें म्हणजे बुक तयार होतांच त्यांजकडे रवाना करण्यांत येईल- टिकिटा पाठविल्यास वर्ताळ्या सुद्धां पाठविणें. हें बूक दोनतीन वकिलांचे मदतीनें निघणार आहे, सबब सर्व लोक आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

तारिख १५ माहे आगष्ट सन १८६९ इसवी. } विश्वनाथ नारायण सहस्त्रबुद्धे वकील कोर्ट अदालत जिल्हा सोलापूर.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास दोन वर्षें होत आलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या मोहिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ०६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity of ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षांची अगाऊ देणारास··· | ···६ | ० |
| साल अखेर ··· ··· | ···७ | ० |
| सहा महिन्यांची अगाऊ ··· | ···३ | ८ |
| एक अंकास ··· | ···४ | |
| फुटकळ ··· ··· | ···० | ६ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें

# वऱ्हाडसमाचार.

वा

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV AKOLA :—SATURDAY EVENING, SEPTEMBER 11, 1869 NO. 36

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ११ माहे सप्तंबर सन १८६९ इ० अंक ३६


गजकरणाचें औषध—विक्रीस आलें आहे. चांगलें आहे. किंमत सहा आणे.

## राबता महार.

आपले या हिंदुस्थान देशांत ब्रिटिश सरकारचें राज्य झाल्यापासून रयतेस न्याय मिळूं लागला, तिची दाद लागूं लागली आणि पूर्वीप्रमाणें तिजवर जुलूम जबरदस्ती कोणी करूं शकत नाहीं अशी ख्याती आहे. सरकारचे मोठे मोठे सरदार जरी एका ठिकाणीं राहून दुसरे ठिकाणीं जाणें झालें तरी त्याणीं मजूर लोकांस मजुरीचा पैसा, शिरस्त्याप्रमाणें म्हणजे सरकार दर मैलास किंवा कोसास घोडे, जोडी, बैलांची गाडी, मनुष्य वगैरेस अमूक द्यावें म्हणून ठरवितें त्याप्रमाणें, द्यावा लागतो. बिगारी म्हणून कोठेंही श्रम फुकट घेऊ नये असा ठराव आहे. परंतु त्याप्रमाणेंच सर्व लोकांची वहिवाट आहे किंवा नाहीं या विशीं बारकाईनें चौकशी ठेवणें व ज्यास मजुरीचा पैसा मिळाला नसेल त्यास देवविणें, ज्याणें तो दिला नसेल त्याचा यथान्याय बंदोबस्त करणें व कोणास दुःख न पोंचे अशी तजवीज ठेवणें हें काम वरिष्ठ अधिकाऱ्यांचें आहे. तें त्यांजकडून जसें व्हावें तसें होत नाहीं किंवा सरकारची परवानगीच तशी आहे या गोष्टीचा विचार करणें अगदीं अवश्य आहे. यास्तव दयाळु मेहेरबान कमिशनर साहेब बहादूर या गोष्टीचा तपास करून चांगला बंदोबस्त करतील असें आम्ही इच्छितों. ती गोष्ट कोणती म्हणाल तर खेडें गांवांतील पाटील, देशमुख वगैरे लोक अधिकाराच्या बळानें सत्ताधारीपणा मिरवून आपले खाजगी कामाकडे नेहेमीं बाराही महिने एक महार लावीत असतात त्यास राबता म्हणतात. आणि त्यास एकादी भाकर देतात म्हणजे झालें. हा वतनदार पाटील वगैरे लोकांचा जुलूम त्या गरीब बिचारे महारावर अद्याप कां चालू आहे न कळे. आम्हास वाटतें कीं, इंग्रज सरकारचे न्यायास उणेपणा आणणाऱ्या गोष्टींपैकींच ही एक आहे. ज्याप्रमाणें सर्व लोकांस स्वातंत्र्य मिळालें आहे त्याप्रमाणें महारांस नाहीं व त्यांस गुलामाप्रमाणें खरेदी केल्यासारखें राबविणें हें रास्त नाहीं. इतरांप्रमाणें त्यांसही स्वातंत्र्य असावें व इतरांप्रमाणें मजुरी मिळावी. त्याजबद्दल आमचे कमिशनर साहेब या अनाथ दीन महारांकडे कृपादृष्टी करून चित्त पुरवितील अशी उमेद राखून आज हा विषय तहकूब ठेवितों. पुढें प्रसंगानुसार इकडे वळूं.

## वर्तमानपत्रावर बेअदबीचा चार्ज.

कलकत्यास इंडियन डेली न्यूस नामें नित्याचें एक इंग्रजी वर्तमानपत्र निघत असतें. त्यांत एका फौजदारी मुकदम्या संबंधी एक पत्र प्रसिद्ध झाल्या वरून त्याजवर च्यार्ज आणिला आहे. हें पत्र मि० शेफर्ड नावाच्या युरोपियनावर डाका घातल्याचा चार्ज असतां व सेशन कोर्टापुढें त्याची चौकशी चालावयाची असतां त्याच दिवशीं सकाळीं सदरहु वर्तमानपत्रांत त्याचे बापानें छापविलें. त्यावरून कलकत्याचे अडवोकेट जनरल यानीं तें पत्र छापून प्रसिद्ध करणारावर कोर्टाच्या बेअदबीच्या तोहमतीचें समान काढिलें. व पुढें त्यापत्राचे एडिटर स्वतां हजर झाले. नंतर न्यायाधिशांचें व त्यांचें भाषण होऊन जो निकाल झाला त्याचें तात्पर्य आम्हीं आपले वाचकांस कळवितों.

मि० गोम्स डेलीन्यूस पत्राचे छापणारे व प्रसिद्ध करणारे नेमल्या दिवशीं कोर्टांत हजर होऊन पुढें लिहिल्या प्रमाणें त्यानीं शपथेवर जबानी लिहून दिली—

मी इंडियन डेली न्यूस वर्तमानपत्राचा छापणारा व प्रसिद्ध करणारा आहे—व जेम्स उइलसन या नावाचे गृहस्थ या पत्राचे एडिटर आहेत. व सर्व आर्टिकलें, पत्रें, आणि इतर मजकूर वर्तमान पत्रांत येतात ते त्यांचे हुकुमानें येतात— जें पत्र छापल्याच्या बाबदींत मला प्रश्न आहे तें त्याच्या खुशीनें व हुकुमानें मी छापिलें आहे— पत्राच्या आंतील मजकुरावर पैरवी ठेवण्याचें काम मजकडे नाहीं— छापण्याच्या वेळेस मीं तें पत्र वाचिलें होतें- परंतु त्यांतलि बारकाव्याकडे लक्ष न देतां मी चाकर या नात्यानें तें छापून प्रसिद्ध केलें— तें छापते वेळेस हायकोर्टाच्या न्याधिशां विषयीं माझे मनांत कसलाहि वाईट हेतु नव्हता व तें छापल्यानें कोर्टाची बेअदबी व्हावी असेंही माझे मनांत बिलकुल नव्हतें.

ही जबानी पाहून मि० जास्टिस फियर साहेब न्यायाधीश म्हणाले कीं छापण्याची जबाबदारी मि० उइलसन साहेब आपल्यावर घेतात असें दिसतें.

नंतर आडवोकेट जनरल यांणीं सूचना केली कीं मि० उइलसन साहेब यांस समन व्हावें.

इतक्यांत मि० उइलसन साहेब एडिटर स्वतां पुढें झाले आणि म्हणाले कीं, छापण्याची सर्व जबाबदारी मजवर आहे. व कायदेशीर समन वगैरे करून घेऊन कोर्टाचा वेळ व्यर्थ खर्च करावा अशी माझी इच्छा नाहीं म्हणून मी आजचे आज हजर झालों आहे. मि० गोम्स यांजवर जें समन्स लागू झालें तेंच मला मान्य आहे. तर आजच चौकशी होऊन निकाल व्हावा. कायद्यासंबंधीं कांहीं मुद्यांवर मला तक्रार चालवावयाची नाहीं. तो मजकूर प्रसिद्ध होण्यांत कोर्टाची कांहीं पारिभाषिक बेअदबी झाली आहे असें मी कबूल करितों, आणि हा आरोप शिक्षेलायक नाहीं याजवर कोर्टापुढें आपला कांहीं विचार सादर करावा अशी माझी इच्छा आहे.

नामदार जज्ज साहेब म्हणाले, बरोबर आहे. आपण बोलावें.

नंतर उइल्सन साहेबांनीं आपला अड्रेस (भाषण) करण्यास आरंभ केला—धाकटे शेफर्ड साहेबांवर जी तोहमत आहे ती जुलाईचे २८ वे तारखेस इंग्लिशमन पत्रामध्यें पहिल्यानें छापली गेली. हो प्रसिद्ध झाल्या दिवशीं प्रात:काळीं मि० शेफर्ड साहेब एक पत्र घेऊन माझे आफिसांत आले. आणि मला त्यांनीं विनंती केली कीं, आपणास योग्य दिसेल तर आपण माझी बाजू घ्यावी आणि इंग्लिशम्यान पत्रांतील मजकुरास जबाब म्हणून हें माझें पत्र आपण घेऊन छापावें व लोकांपुढें ठेवावें. मी तें पत्र घेतलें. पुढें त्याच दिवशीं संध्याकाळीं शेफर्ड साहेब मजकडे आले आणि मला म्हणाले कीं तें पत्र न छापतां कृपा करून परत द्यावें. ते म्हणाले कीं "मी मोठा तामसी मनुष्य आहे. मजविषयीं व माझे चिरंजिवाविषयीं लोकांनीं ज्या चर्चा केल्या व जो अन्याय केला त्याचा मला फार संताप येऊन मीं पत्र लिहिलें? परंतु मला आतां कोणीं चांगली सला दिल्यावरून आपणापासून तें पत्र परत घेण्याची माझी इच्छा आहे. त्याचवेळीं त्यांचे चिरंजीवावर अलिपुरचे माजिस्त्रेटापुढें खटला चालला होता व शहरांत सर्वत्र तोच बोलण्याचा विषय झाला होता. पुढें आगष्ट महिन्याचे १७वे तारखेस एक पत्राचा मसुदा घेऊन शेफर्ड साहेब पुन्हा मजकडे आले; आणि इंग्लिशम्यान पत्रांतील मजकुरावरून आपणाविषयीं व मुलाविषयीं लोकांत अन्यायाचा जो गिल्ला झाला होता व त्यामुळें त्यांस जें वाईट वाटलें होतें तें सर्व त्यांनीं मला सांगितलें. इंग्लिशम्यान पत्रांतील ती गोष्ट इंडियन एक्झामिनर पत्रांत घेतली होती. व त्याच रोखाचा मजकूर फ्रेंड आफ् इंडिया पत्रांतही आला होता व सवांचें मत शेफर्ड साहेबाचा मुलगा दोषी असें होतें व शेफर्ड साहेबास तो निर्दोषी वाटत होता. साधारण समजुतीप्रमाणें त्यांस वाटलें कीं या आरोपाचा खोटसाळपणा आपले मुलाचे वतीनें आपण लोकांस विदित केला पाहिजे. व त्याकरितां त्यांनीं मला म्हटलें कीं हा मजकूर कोणत्यातरी रूपानें आपण आपले पत्रांत घ्यावा.

शेफर्ड साहेबांचें हातचा कागद कोर्टापुढें हजर केला आहे त्यावर त्यानीं स्वदस्तुरची सही केलेली आहे .त्यांत तांबडे शाईनें कोठें कोठें मुद्दे न बिघडूं देतां फेरफार केला आहे व तसें करण्याचा माझा परिपाठ आहे. पत्रांतलि खोडलेल्या तीन ओळी पोलिसाचे संबंधाच्या व दुसऱ्या तीन ओळी इंग्लिशम्यानचे संबंधाच्या आहेत व त्या खोडण्यांत त्यापत्राचा तीव्रपणा जरा कमी केला आहे हें कोर्टाचे ध्यानांत आलें असेल. आणि एथें मला हें सांगण्याची जरूर परमाणगी पाहिजे कीं वर्तमानपत्राचें जें महत्विक काम आहे त्यांत लोकांचीं मतें पूर्णपणें प्रसिद्धींत आणिल्यानें लोकांचें हित होणें हाही महत्विक भाग त्याच कामापैकीं आहे. व यामुळेंच छापखाने व वर्तमानपत्रें हीं राष्ट्रांतील चवथी* सत्ता असें मानिलेलें आहे. व त्याचप्रमाणें हेंही तत्व प्रसिद्ध आहे कीं वर्तमानपत्रांचे चालविणारे जे आहेत ते कारेस्पांडन्स भागांतलि म्हणजे इतरें लोकांच्या लेखांतील मतांचे भागीदार असतात असें नाहीं. त्या भागांतून लोकांचीं मतें प्रसिद्धीस आणणें हें मोठें हितावह मानिलेलें आहे. व त्याकरितां एडिटर हे पत्रव्यवहार ठेवणारांस प्रशस्त मोकळीक देत असतात. तसें न केलें आणि लोकांच्या असलेल्या पत्रांतील मतांत फेरबदल केला तर वर्तमानपत्र हें लोकांचें तोंड असें जें मानिलेलें आहे तें फक्त एडिटराचें तोंड आहे असें मानिलें जाईल. आतां हें खरें आहे कीं वर्तमानपत्रांतील पत्रें कायद्याच्या सक्त दृष्टीनें कधींकधीं लायबल होण्यास व कोर्टाच्या बेअदबीस पात्र होतात आणि वर्तमानपत्र प्रसिद्ध करणाराचा तर काडिमात्र तसा हेतु नसतो.

आणि एथें हें ही कोर्टास कळविण्याची मी मोकळीक घेतों कीं अपराधाचें मूळ मुख्यत्वें उद्देशांत पाहिलें पाहिजे. करणापासून कार्य घडेल आणि तें कार्य ज्या विषयीं उद्देश नाही असा अपराध कदाचित घडवील.परंतु त्या अपराधांत आणि इतर अपराधांत फार तफावत राहील. शेफर्ड साहेबांचें पत्र प्रसिद्ध करण्यामध्यें माझा एवढाच हेतु होता कीं त्यांस त्यांचे विचार लोकांपुढें ठेवण्यास प्रसंग मिळावा. त्यांच्या लिहिण्याचा मुद्दा खोट्या आवयांची प्रसिद्धी मना करावी. इतकाच होता. आणि त्यास स्थल दिल्यांत वर्तमानपत्र छापून प्रसिद्ध करणारावर उद्देशपूर्वक न्यायाच्या कामास हरकत केल्याच्या किंवा कोर्टाची बेअदबी केल्याच्या आरोपाचा बोजा पडूं नये.

पत्रांतलि मजकुराचा खरेपणा बाहेर निघण्याचा समय अजून आलाच नाहीं आणि सबरीं सांगितले कारणा करितां त्याविषयीं कांहीं सांगतां येणार नाहीं, परंतु तें पत्र छापण्याच्या फळाची शक्यता मनांत आणिली तर त्या पासून न्यायाच्या कामास हरकत फारच थोड्या अंशानें येणार आहे. वर्तमान पत्राच्या एडिटोरियल कालमांतलि अभिप्रायास जितकें महत्व लोक देतात तितकें कारेस्पांडन्सच्या म्हणजे पत्रव्यवहाराच्या कालमाच्या अभिप्रायास देत नाहींत ही गोष्ट सर्वत्र ख्यात आहे. व तें कदाचित त्या कालमांतील लिहिणें उत्तम असतें म्हणून नव्हे तर एडिटोरियल आर्टिकलें हीं शहाण्या, समजूतदार

व योग्य विद्वानाच्या हातचीं असतात व न्यायतत्पर मताच्या एडिटोरियल तपासणीसही तीं विषय असतात.

आतां या पत्रांत कांहीं महत्वाचें असतें तर तें पत्ररूपानें न येतां एडिटोरियल रूपानें आलें असतें. तें पत्र जरा कडक व पितृ धर्मास अनुरूप असें असल्यामुळें कारेस्पांडन्स सदरांत दाखल करण्याविषयीं मी हुकूम दिला. व तेथेंच तें योग्य आहे असें बहुमत आहे. हा खटला चालल्यानें त्या पत्राचा जो उद्देश मनांत आला तसें तें असतें तर शहाणपणाचें व समर्पक समजावयाचें;पण तशा दृष्टीनें पाहिलें असतां तें पत्र फौजदारी गुन्ह्यास पात्र होण्यापेक्षां मूर्खतेस पात्र अधिक आहे. कारण तें पत्र पितृवात्सल्यानें कळवळून संतापलेल्या बापानें लिहिलें होतें. तर हायकोर्टाचे पूर्ण ज्ञानी व अनुभवी जडज यांच्या समोर चाललेल्या खटल्यांत, व ज्याजमध्यें निःसंशय विद्वान, महत्तम, व आपले धंद्याच्या वर्चस्वानें हिंदुस्थानास शोभा देणारे असे कित्येक बारिस्टर लढावयाचे त्या रणसंग्रामांत त्या गरीब पत्राच्यानें कांहीं कार्य करवतें अशी कल्पनाही करावयास नको. या कोर्टांत न्यायाधीश आणि बारिस्टर लोक न्यायाचे कामीं व्यत्यय येऊ लागेल तर तो न येऊ देण्यास सेफगार्ड म्हणजे संरक्षक आहेत. व माझा यांवर पूर्ण भरवसा आहे आणि हल्लीं त्यांच्या इनसाफास मी पूर्णत्वें राजी झालों आहे याहून दुसरा माझे भरवशा विषयीं दाखला माझ्यानें देववत नाहीं. या आरोपाची कायद्यासंबंधी जबाबदारी मी पतकरतो व अंशतः शिक्षेविषयींची नीति संबंधी जबाबदारी कोर्टावर सोपवितो. आणि मी हें अशा पूर्ण भरवशानें करित आहे कीं आपण जो ठराव सांगाल व निवाडा लिहाल तो आपल्या सन्मान्य कोर्टाचें वैभव संरक्षिल.

नंतर आनरबल मि० जस्टिस फियरसाहेबांचें भाषण सुरू झालें.

(पुढें चालू.)

## पुस्तकांची पोंच.

गीतार्थ रामायण, ईस्टइंडिया असोसिएशनच्या मुंबईच्या शाखेचें मराठी मासिक पुस्तक, गोपीचंद नाटक, ज्ञातीच्या सभा व बहिष्कार यां विषयीं कायदा, व मुंबईचे हेल्थ (आरोग्य) आफिसर मि० लमस्डन साहेब यानीं मुंबई असोसिएशनास देवी काढण्या संबंधी बिच्यार यावर पत्र लिहिलें त्याचें पुस्तक, असे पांच ग्रथ आम्हांस त्यांचे त्यांचे कर्त्या कडून आले आहेत ते स्वीकारून आम्ही त्यांचे आभार मानितों. पुढील आठवड्यांत स्थलावकाशानुरूप या विषयींचे आम्ही आपले अभिप्राय वाचकां पुढें सादर करूं.

## एका युरोपियन अधिकाऱ्याचें नीचवर्तन.

चांगली विद्या, मोठा अधिकार, लोकांत अब्रू व बरें वाईट जाणण्याची बुद्धी मनुष्यामध्यें असली तरी त्याच्या अंतर्गत झाकून राहिल्या असलेल्या दुष्ट मनोवृती केव्हां व कशा उफाळून बाहेर पडून त्याचें मातेरें करितील याची कल्पना करवत नाहीं.

सिंधप्रांतांत क्या० गिलेस्पी यानावाचे एक साहेब सेव्हाण जिल्ह्यास डिपुटिकलेक्टर आहेत. यांनीं मदोन्मत्त होऊन पशुतुल्य नीच कर्म केलें आणि तें छापीवण्याची त्यानी तजबीज केली होती परंतु त्यांचे दुर्दैवानें तें न छापतां सर्व बाहेर पडलें ता प्रकार असा—

गिलेस्पी साहेबाजवळ सर्र म्हणून घोडेवाला होता त्यास त्यानीं फमास केली कीं ११–१२ वर्षाची एक कोरी मुलगी आम्हांकरितां पैदा करावी. त्यानें कराचीचे सोजिर बाजारांतील भिस्ती वाड्यांत राहणारी माहरी नावाची एक मुलगी मिळवून साहेबांचे बंगल्यावर नेली.साहेबानीं खुष व उल्लू होऊन तिला अंतर्गृहांत नेलें. पुढें अर्ध्या तासानें ती खोली बाहेर आली आणि म्हणाली कीं माझ्या पोटाच्या बेंबी खालच्या भागांत आणि दोन्ही कुशींत पराकाष्ठेचें दुखतें आहे व माय अंगांतून रक्त वहात आहे. तिच्यानें चालवेना तेव्हां दुसरे मनुष्याकडून तिला घरीं पोचविलें दुसरे दिवशीं सकाळीं ती अतिशय आजारी झाली. ही खबर सदूनें गिलेस्पी साहेबांस कळविली तेव्हां त्यानीं तिला १० रुपये पाठवून दिले. पुढें माहरी त्याच दर्देनें दुसरे दिवशीं मरण पावली.हें गिलेस्पी साहेबांस कळतांच त्यानीं तिचे आईला १४ रुपये पाठवून दिले व तिनें गोष्ट फोडूंनये अशी युक्ती केली. व त्याप्रमाणें बेतही झाला होता असें दिसतें. पोलिसानें महारीच्या आईस ही कशानें मेली म्हणून विच्यारिलें तेव्हां तापानें मेली असें सागून तिला मूठमाती देण्याच्या तजविजीस लागली होती. परंतु पोलिसास दुसरी कडून खबर लागल्या वरून त्यांनीं मुठमातीस हरकत केली व बारिक तपास केला तेव्हां गिलेस्पी साहेबांचें सर्व दुष्ट कृत्य बाहेर पडलें. आतां त्यांचें कोर्ट मार्शल होणार आहे. काय निकाल होतो पाहावा.

Local

## वऱ्हाड.

**खामगांव**—ता० ८ सप्टेंबर १८६९

हल्लीं येथें कापसाच्या सट्ट्याचा हगांम सुरू झाला आहे. आणि ह्याच्या सोईकरितां सरकारी तारायंत्र आफिस ह्या महिन्यापासून सुरू होऊन तें येथें नेहेमीं राहण्याविषयीं ठराव झाल्याचें ऐकतों. हें आफिस तूर्त कापुस बाजारांत आहे खरें परंतु तें सर्वांस सोईवार जाग्यांत असण्याचा विचार होईल तर फार चांगलें. आतां हें आफिस सुरू झाल्यापासून व्यापाराच्या भावाचा परिणाम समुद्राच्या ओहोटी भरती सारखा झाला आहे. घटकेंत भाव १०४ रु० आणि घटकेंत ९० रु० होतो अशी मजा उडाली आहे. ह्या ओहोटीच्या तडाख्यांत कोण सापडेल तो सपडो.

आगगाडीचें काम मोठ्या झपाट्यानें चाललें आहे. व बाहेर गांवचे व्यापाऱ्यानीं हळु हळु येण्याचा पाया घातला आहे. पूर्वा नक्षत्राचे पर्जन्यानें मोठी मौज करून दिली. कपासी व इतर पिकें चांगलीं आहेत.

क्या० वोडहौस साहेब स्मालकाज कोर्टाचे जज्ज हे आज शहरांत फिरत असतां मुलींच्या शाळेंत गेले होते आणि त्याणीं विचारिले प्रश्नांचीं उत्तरें मुलींनीं बरीं दिल्यावरून खुष झाले. व मुलींस मिठाई वाटली. नंतर सरकारी इंग्लिश मराठी स्कुलांत गेले आणि तेथें कांहीं मुलांची परीक्षा घेऊन परत गेले. यांचा स्वभाव पाहून व काम करण्याची चतुराई ऐकून संतोष होतो.

हल्लीं इंग्लिश मराठी स्कूल अगदीं रोडावलें आहे व ज्या रोगानें असें झालें आहे त्याचा विचार करण्याकडे कोणीं लक्ष पुरवित नसल्याचें ऐकून दुःख वाटतें. याजरितां त्याच्या पोटांत शिरलेला महाराचा मुलगा चांगल्या उपायानें बाहेर निघेल अशाविषयीं कांहीं तजवीज लवकर निघाल्यास उत्तम आहे. रेलवेंत देखिल ज्या धर्मसंबंधी वगैरे अडचणी येतात त्या दूर करण्याकडे सरकारचा पूर्ण विचार होत आहे.

ह्या झालेल्या बखेड्यानें शाळेंतील मुलांस आकटोबरांत होणाऱ्या कांपिटिटिव परीक्षेंत यश मिळविण्यास चांगला उपाय आहे नाहीं बरें? (एकमित्र.)

**पुसद**—ता० ३ सपटंबर १८६९.

डिपुटी कमिशनर साहेबांची स्वारी लवकरच इकडे येणार आहे.

उत्तरा नक्षत्राचा पर्जन्य चांगला पडून हल्लीं पूर्वा नक्षत्रानें तर संतत धार धरली आहे. एकंदरीनें पहातां आजपावेतों पर्जन्य मागितल्या बेतानें पडला. ह्याप्रमाणें शेवट साधला तर मग त्या आनंदास पारावार नाहीं.

रा. उदाजीराम देशमुख यांचे येथें लिंगार्चनाचा उत्साह व त्याची समाप्ती चांगली झाली.

येथें लायब्ररी होण्याची मंडळी तजवीज करितील तर चांगलें.

मेहेकर एथून एक मित्र लिहितो कीं, अलीकडे पोस्टाकडील अधिकारी याणीं विलेज डिलेव्हरी प्यून (खेड्यापाड्यावर पत्रें वाटणार शिपाई) ठेवल्यापासून बोभाट कमी झाला आहे. यापूर्वीं कित्येक स्कुलमास्तर वगैरे लोकांकडून या बाबतींत फार गिल्हे येत असत तसे आतां येत नाहींत.

मेहेकर तालुके कचेरींतील नायब तहशिलदार रा० रा० दत्तात्रय योगीराज याणीं पंढरीचे यात्रेस जाण्यासाठीं रजा न मिळाल्यामुळें राजीनामा दिला. त्यांचे जागेवर अकटिंग चिखलीचे दुसरे कारकून रा० रा० वामन लक्षुमण यांस नेमल्याप्रमाणें ते येऊन त्यांणीं चार्ज घेतला.

रेवरेंड एच पी. जेम्स वऱ्हाडांतील चाप्लेन म्हणजे सरकारी धर्मोपदेशक यांस ३ महिन्यांची रजा मिळाली.

फर्स्ट आसिस्टंट रेसिडेंट साहेबांचें सरक्युलर वऱ्हाडांतील पूर्व व पश्चिम भागांचे कमिशनर यांस नंबर २५११-२४५ ता० १९ आगष्ट सन १८६९ इ०

बेवारस भूमीगत द्रव्य सापडल्यास त्याची एक महिन्याचे आंत तहशिलदारांस किंवा जवळचे माजिस्त्रेटांस खबर द्यावी व त्यानीं डिपुटी कमिशनराकडे रिपोर्ट करावा. ज्यांस द्रव्य सापडलें त्यानें सरकारांत रिपोर्ट न करितां त्याचा अभिलाष केला अशी पोलिसास खबर लागली तर त्यांनीं एकदम त्यास प्रासिक्यूट न करितां माजिस्त्रेटाकडे झाड्याचें वारंट मागवावें व त्यांस द्रव्याच्या अभिलाषाचा सयुक्तिक संशय येईल तर त्यांनीं वारंट द्यावें.

हैदराबादचे दिवाण साहेबांस मारण्याचा कोणी दुष्ट बेत केला होता तो उघडकीस आला. निज्याम सरकारचे कमांडर इन चीफ यानीं कवाईत पाहाण्या करितां दिवाण साहेबांस बोलाविलें होतें ते जाऊन कवायत पाहून विश्रांति स्थानीं जाऊं लागले तेव्हां त्यांच्या बरोबरच्या एका विश्वासु सेवकानें सांगितलें कीं आपण त्या स्थानांत जाऊ नये. मला एका शिद्दी मनुष्यानें सांगितलें कीं या जागेवर खालीं भुयार खणून दारू भरली आहे व दिवाण साहेबांस उडवून जाळून टाकण्याचा बेत आहे. चौकशी करितां ती जागा खणली आणि पाहतात तों बंदुकीचे दारूच्या कांहीं पिशव्या तेथें पुरून ठेवलेल्या निघाल्या. ती गोष्ट माहित असण्याच्या वहिमावरून निजामत फौजेपैकीं १६ असामी कैदी केले आहेत असें वर्तमान आहे. सदरहू मजकूर कलकत्यांतील इंग्लिशम्यान पत्राच्या हैदराबादच्या बातमी दारानें लिहिला आहे.

## अकोला.

डा० सिंक्लेर साहेब विद्या खात्याचे डायरेक्टर उमरातीस गेले आहेत.

हायस्कुलांतील शास्त्री वे० रा० काकाच्यार्य यांस इलिच पुरास ६० रुपयांवर असिस्टंट मास्तर नेमिलें.

व्यापारांत आज तारखेपावेतों अकोला चलनीच्या नोटी आहेत त्या येणेंप्रमाणें.

| | नोटी सुमारें, | ख. रु. |
|---|---|---|
| दर १० प्र०— | २३३१ | २३३१० |
| दर २० प्र०— | १८३३ | ३६६६० |
| दर ५० प्र०— | ६३२ | ३१६५० |
| दर १०० प्र०— | १०५४ | १०५४०० |
| दर ५०० प्र०— | १९० | ९५००० |
| दर १००० प्र०— | ३५४ | ३५४००० |
| | ६३९४ | ६४५९७० |

आजपर्यंत कोणीं दुसरे जिल्ह्याचे खजिन्यांत नोटी मागून घेतल्या नसून या जिल्ह्यापैकीं मोठमोठाले पेठेचे गांवांतील व्यापारी यांस या चलनीचा कांहीं उपयोग झाला नाहीं कारण कीं सरकारांतून नोटी अकोल्याशिवाय इतर ठिकाणीं मिळूं शकत नाहींत. खामगाव ही मोठी व्यापाराची पेठ असून अद्यापि कांहीं नोटी तेथीलचे राहणाऱ्यांस मिळण्याची सरकारांतून कांहीं तजवीज झाली नाहीं. याजकरितां लोकांस मोठी अडचण व गैरसोय आहे याजकरितां याजबद्दल बंदोबस्त लवकर झाला असतां लोकांस सुख व सोईचें होऊन लोक सरकारचा मोठा उपकार मानतील असें वाटतें. आणखीं असें ऐकण्यांत आलें आहे कीं, मुंबई ब्यांकेचे अधिकारी हे अकोले चलनी नोटी ज्या मुंबईचे करेन्सी आफिसांत जमा होतात त्या सर्व खरेदी करून घेतात याजवरून या नोटीचा उपयोग व्यापारांत किती आहे हें उघड दिसून येतें.

शहरांतिल चौकांत म्हणजे जेथें नवीन लायब्ररी बांधित आहेत त्यानजीक एका दुकानचे माडीवर अमीर बक्ष वगैरे तीन रांडा राहिलेल्या आहेत त्यांजकडे महमद जरीब व शेख रहिमू असे दोन मुसलमान जावून त्यांनीं ७ वे तारखेस रात्रीं दारूमध्यें धोतऱ्याच्या बिया वाटून ती त्या रांडांस यथे

न्छ पाजिली. व तिचा अमल चढून त्या बेहोष झाल्यावर त्यांचे दागिने सुमारें १००० रुपयांचे होते ते चोरून घेऊन ते दोन मुसलमान पळून गेले. पहाटेचे च्यार वाजतां चीफकानस्टेबल गस्तीस निघाले ले त्याठिकाणीं आले तों अमीर बक्ष ही माडीचे खालीं नागवीच येऊन वेड्या सारखी गुंगत होती. तिला सावध करून त्यांनीं विचारलें तेव्हां त्या दोघा मुसलमानानीं आपणास भूल घालून चोरी केली असें सांगितलें. नंतर ८ वे तारखेस सकाळीं त्यांस पकडलें व तीन दिवस तपास चालविला व वहिमावरून कित्येक ठिकाणचे झाडे घेतले. शेवटीं अगरवेशीकडे शेख रहिमूचे घरानजीक नदीचे घाटाशी मोरीमध्यें पुरून ठेविलेले सुमारें ८०० रुपयांचे दागिने १० वे तारखेस ७ वाजतां रात्रीं मिळाले. याप्रमाणें ही चोरी मुद्देसूदा पकडली. माल काढला त्यावेळेस मि० जेमिसन साहेब पोलिस सुपरइंटेंडंट, मिस्तर स्टिविनसन सा० पोलिस इन्स्पे०, व मि० किसनशिंग नवीन चीफ कान० हे समक्ष होते. आतां त्या मुसलमानांस काय शिक्षा होते पाहू.

शेख रहिमू हा खराब चालीचा नामर्द मनुष्य कांहीं धंदा करित नसून मोठे मिजासीनें वागे व बहुत लोकांचा कुंटणपण करून त्यांस बिघडवीत असे व त्यानें एक बैठकीची सुशोभित जागा केली असून तेथें दररोज गाणें, बजावणें, तमाशे वगैरे चालत व रांडा गरती स्त्रिया आणि निरुद्योगी व बिसनी बहुत लोक यांचा मेळा जमत असे. तेव्हांच हे चोऱ्या करित असावे असा आम्हांस शक होता व त्याविषयीं पूर्वींचे दोघा चीफ कानस्टेबलांस आम्हीं सांगूनही ठेविलें होतें. व त्यावरून त्यांनीं तो अखाडा बंद केलाहि होता; पण चोरीचे कामांत तेव्हां हे बिलंदर सापडले नव्हते ते आतां सापडले आहेत. पोलिसास आम्ही सांगतों कीं या चोरांचे साथी त्यांचे आखाड्यांतील आणखीं कित्येक लोक असावेत व ज्या मागें चोऱ्या झाल्या आहेत त्यांतही त्यांचे आंग असावें असें आम्हांस वाटतें सबब त्यांनीं बारकाव्यानें तपास करावा.

चीफ कानस्टेबल मि० किसनशिंग हे याच आठवड्यांत एथे आले असून ही पहिलीच चोरी झाली व ती लागलीच उमगली यावरून त्यांस येण्यास चांगला मुहूर्त लागला होता असें दिसतें.

मुनसिपाल कमेटीस व डिपुटी कमिशनर साहेबांस आमची अशी सूचना आहे कीं या मोठया चौकांत अब्रूदार मोठमोठया सावकारांचीं दुकानें आहेत व नेटिव लायब्ररी, शाळा वगैरे आहे तर अशा नामांकित व प्रसिद्ध स्थलीं कित्येक उदम्यांनीं नवीन बांधलेलीं दुकानें रांडांस राहवयास देऊन तेथें बावनखणी बनविली आहे ती मोडावी. म्हणजे रांडांस तेथें राहूं देऊं नये; त्यांनीं दुसऱ्या आडवस्तींत जाऊन राहवें अशी तजवीज केल्यास फार चांगलें होईल.

## Epitome of News
## वर्तमानसार.

मुंबईच्या म्युनिसिपाल कमेटीचे गेल्या आठवड्याचें उत्पन्न ६४४७६ रुपयांचे झालें. चांगलें

सिंध प्रांतापैकीं कांहीं संस्थानिक व मोठे लोक यांचे ७३ फोटोग्राफ मुंबई सरकारानें रायल एशियाटिकसोसैटीस बक्षीस पाठविले.

हिंदुस्थानांतील जिओलाजिकल सर्वेचे सुपरिन्टेंडेंट मि० ओलडहाम यांणीं सरकारास सन १८६७।६८ सालचा रिपोर्ट केला आहे त्यांत हिंदुस्थानांतील खाणीच्या कोळशाविषयीं ते येणेंप्रमाणें लिहितात—कोळशाच्या खाणी खणण्याच्या कामाचा उद्योग फार फलद्रूप होत आहे. सन १८६३ सालापासून कोळशांची गरज कमी कमी होत चालली होती ती सन १८६७ सालांत पुन्हा बेतावर आली. व सन १८६८ सालांत तर ती फार वाढली त्यावर्षीं हिंदुस्थानच्या कोळशाच्या खाणींतून १,३९,६२,२७४ मण कोळसे काढिले गेले. सन १८५८ सालांत ६१,६२,३१९ मण कोळसे हिंदुस्थानांत निघाले होते. त्यामानानें म्हटलें म्हणजे दहा वर्षांत दुपटीहून अधिक कोळसे या देशांत निघाले. तरी देशांत एकंदर यांत्रिक कामास जो कोळशांचा खप आहे त्याशीं हें प्रमाण फार थोडेंच आहे.

हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा नंबर १९८२ ता० ३ जून सन १८६९— डाक्तरचें सर्टिफिकिटा शिवाय ठरावांतलि मुदती बरहुकूम चाकरी करून पेनशन घेऊन घरीं बसलेले आफिसरांस पुन्हा सरकारी कामावर नेमले असतां त्या कामाचा पगार व पेनशन हीं दोन्ही त्यांस मिळण्यास हरकत नाहीं. मात्र अशी नेमणूक करण्या पूर्वीं हिंदुस्थान सरकारास रिपोर्ट करून त्यांचें सांगशन आणविलें पाहिजे.

पंजाबांत हिमालय पहाडावर सिमला नावाचें ठाणें आहे. तेथें हवा चांगली पाहून नामदार गवरनर जनरल साहेब जाऊन राहत असत. त्यामुळें त्या ठिकाणची वस्ती फार वाढली आहे. जुलई महिन्याचे २२वे तारखेस तेथील खानेसुमारी झाली त्यावरून समजतें कीं, तेथें युरोपियन १४३४ व नेटिव १३४१४ आहेत. सन १८४१ सालीं सारे १६६ युरोपियन होते.

५८वे पलटणींतील १०० मनुष्यें महामारीनें मरण पावली.

महादाजी बल्लाळ नावाच्या मुंबईच्या स्कुलमास्तरानें आफू खाऊन जीव दिला.

रा. ब. मोरोबा कान्होबा यांची वकिलीची परीक्षा घेतल्यावांचून त्यांस वकिली करूं देऊं नये असा हाय कोर्टांतील मंडळीनीं अर्ज केल्यावरून जज्जानीं आक्षेप घेतला आहे. व या गोष्टीचा आणखीं पुढें विचार होणार आहे.

रविवारीं किंवा सणाचे दिवशीं वारंटावरून मनुष्य पकडण्यास हिंदुस्थानचे कायद्यावरून कांहीं हरकत नाहीं असा ठराव मद्रास इलाख्यांत एका ख्रिस्तियनास पकडल्याचे तकारारीवरून झाला. इंग्लंडांत रविवारीं ख्रिस्तियन मनुष्यास पकडीत नाहींत.

चंद्रपुराकडे रेलवेची शाखा लवकर होणार असें वर्तमान आहे.

विलायतेंत सन १८७१ सालीं एक मोठें प्रदर्शन होणार आहे.

इनकम टयाक्स आक्टाच्या चवथे भागाप्रमाणें कोणाची प्राप्ती ५०० रुपयांहून कमी असेल व जरी दुसरे भागाप्रमाणें त्यावर कर बसत असून एकंदर बेरीज ५०० रुपये किंवा त्यांहून अधिक होत असेल तरी त्यावर कर बसवूं नये असा हिंदु० सर० चा ठराव नं० २०६९ जुलै सन १८६९चा झाला आहे.

पंजाबांत अमृतसर येथें महामारीचा मोठा तडाका उसळला होता पण आतां कमी आहे. गेल्या महिन्याचे १८ वे तारखेस ११९, १९ वे तारखेस १०२, २० वे तारखेस ९७, २१ वीस ९०, २२ वीस ८४, २३ वीस ९८, २४ वीस ८३, २५ वीस ४१, व २६ वीस ६२, याप्रमाणें मनुष्यें मरण पावलीं. सिविल, पोलीस वगैरे सर्व आफिसर लोकांस टेकडी वरून खालीं येण्याचे हुकुम झाले आहेत.

मारवाडच्या पाश्चिम भागांत टोळांची धाड आली होती.

पंजाब रेलवेचा अंबाल्या पासून लुधियाना पर्यंतचा भाग या महिन्यांत गाडी चालण्यांस सुरू होणार आहे.

**करार संबंधी नुकसानी परिणाम.**

हीं कायद्यासंबंधी उपयोगीं पुस्तकें मुंबईस मित्रोदयाच्या म्यानेजराकडे बिक्रीकरितां तयार आहेत. ह्या पुस्तकांत ब्रूम्स, कालेट व मेन ह्या प्रसिद्ध न्यायशास्त्र निपुण विद्वानांचीं मतें, कीं ज्यांत कराराच्या संबंधानें होणाऱ्या नुकसानीचें स्वरूप व परिणाम ह्यांचें स्पष्टीकरण सांपडतें, त्यांचा चांगल्या सुबोध महाराष्ट्र भाषेंत समावेश केला आहे. वकील व वकीलीच्या परिक्षेस जाणारे उमेदवार, मुनसफ, व अटर्नींचे कारभारी ह्यांस हें पुस्तक विशेषें करून व ज्याअर्थीं करारांचा संबंध सर्व लोकांच्या नित्यव्यवहाराकडे असतोच तेव्हां त्यांसही साधारणतः ह्या पुस्तकाचा मोठा उपयोग होईल. हल्लीं नियमाप्रमाणें वकीलीच्या परीक्षेच्या विषयांत "टार्ट" (नुकसानीबद्दल कायदा) आहे; ह्या विषयाच्या अभ्यासास सुलभपणा ह्या पुस्तकापासून बराच येण्याजोगा आहे. डाकहासीलसुद्धां प्रत्येक प्रतीची किंमत १।- रुपया आहे.

मि० द०

नगर—या आठवड्यांत पाऊस बराच पडला. परंतु, आतां तूर्त आठ पंधरा दिवस नसेल तर बरें होईल, कारण बाजरीच्या पिकास अपाय होईल आणि किरकोळ पीक आलेलें कुजून जाईल. अशी बोलवा ऐकूं येते. शहरांत रोगराई वगैरे कांहीं नाहीं.

वृ० बै०

सातारा—गेल्या मंगळवारीं व बुधवारीं बराच पाऊस पडला. हवा साधारण स्थितींत आहे. धान्याचे दर अजून आहेत तसेच आहेत साकरेचा भाव मणी चार आण्यानीं चढला आहे.

शु० सू०

## पत्रव्यवहार.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० पूर्वीं निजाम सरकारच्या अमलांत बळी तो कानपिळी ह्या म्हणी प्रमाणें सर्व गोष्टींची स्थिती होती आणि विशेषें करून हक्कदारी विषयीं तर हमेषा फारच तंटे असत. कित्येकांच्या अशा प्रकारच्या अनर्थांनीं वतनदाऱ्याही जात परंतु कित्येक असे हुषार होते कीं, थेट हैदराबादेपर्यंत जाऊन आपले खरे हक्क सरकारापाशीं जाहीर करून त्यांनीं आपल्या वतनदाऱ्या परत मिळविल्या. त्याप्रमाणेंच इकडे वरूड म्हणून एक गांव आहे. तेथील पाटिलकी विषयींही पूर्वीं असेंच जाहलें होतें. म्हणजे पूर्वीं कोणी कुणब्यानें देशमुखांच्या साह्यानें तेथील पाटिलकी बळकावून खऱ्या हक्कदारास धुळीस मिळविलें होतें. परंतु त्याच्या धाकट्या बंधूनें थेट हैदराबादेपर्यंत जाऊन महान भगीरथ प्रयत्न केले व आपली अन्यायानें हरण जाहलेली पाटिलकी परत मिळविली व त्या गांवचें काम ही कांहीं दिवस त्यानें केलें. परंतु आलीकडे इंग्रजी झाल्या नंतर त्याच्या वडील भावास काम झाल्या मुळें, त्या बिच्याऱ्या धाकट्या भावास इतके श्रम होऊनही आतां निरर्थक घरीं बसणें भाग पडलें आहे. तर सरकारांनी निदान इतकें तरीं करावें. कीं वर्षास पाळीपाळीनें एकेकास काम द्यावें म्हणजे त्याचे श्रमाचेंही उत्तीर्ण होईल आणि तेणें करून त्याचा खरा हक्कही संरक्षण केल्या सारिखा होईल. कळावें ता० ५ आगष्ट.

एस.

वि० वि०—महाराज, मीं फिरत फिरत जानेफळात आलों आणि मोठे उल्हासानें बाहेर फिरावयास निघालों तों आत्मा निघून गेल्यावर अवयवांचें चलनवलनादि व्यापार,बंद पडून देह निस्तेज होतो त्याप्रमाणें येथील ओसाड पडलेल्या कचेऱ्या व लोकांचे राहण्याचे बंगले दिसले. आणि सडकांस दुरुस्ती नसले कारणानें व त्यांवरील रहदारी उणी झाल्यामुळें त्यांजवर गवत वाढून जागजागीं खळगे पडून त्यांचेही स्वरूप नाहींसें होत आलें. सारांश दोन वर्षांपूर्वीं जी या गावास शोभा होती व भरभराट होण्याचा रंग होता तो अगदीं नाहींसा होऊन गेला. बागबगीचे विरूप झाले. एकंदरीनें या ठिकाणीं झालेला खर्च निर्फळ झाला. हें पाहून फार वाईट वाटलें. पुढें मेहेकरास जाऊन पाहतां सर्व याच्या उलटें नजरेस पडलें. व मार्गानें उत्तम प्रकारचीं शेतें दृष्टी पडून आनंद झालाच होता त्यांत तेथील स्थिती, सडका चांगल्या, स्वच्छता बहुत, दवाखाना, धर्मशाळा, विद्याशाळा वगैरे इमारतीचीं कामें फार चांगलीं चाललीं आहेत. व या सर्वांचें यश मिस्तर त्रिंबकराव नाईक व तहशिलदार यांस देणें योग्य दिसतें कारण त्यांणीं आलीकडे सुधारणुकीच्या कामीं चांगलें लक्ष दिलें आहे. पत्रकर्ते महाराज, आणखीं एक स्तुत्य गोष्ट राहिली ती लिहिल्या वांचून राहवत नाहीं. ती कोणती म्हणाल तर सरकारी इंग्लिश मराठी स्कुलांतील मुलांस वार्षिक परीक्षेबद्दल इनामें देण्याचा जो समारंभ झाला त्यावेळीं ज्या मुलांस इनामें सरकारांतून मिळालीं नाहींत त्यांस त्यांणीं आपले पदरचीं दिलीं व मिठाई वाटली. ही गोष्ट रावसाहेबानीं स्तुतीस योग्य अशीच केली. यास्तव त्यांची प्रशंसा करणें रास्त आहे. पत्रकर्ते महाराज हा चार ओळी मजकूर आपले सुंदर पत्रीं प्रसिद्ध करून याप्रमाणें सर्व लोक अशा प्रकारें सुधारणुकीचे कामीं लक्ष देतील असें उत्तेजन त्यांस द्याल अशी आशा धरून पुरें करितों. लोभ कीजे हे विनंती.

सत्यसारथी:

श्रीमंत सांगलीकर तात्या साहेब यांची स्वारी मोठ्या त्वरेनें पुण्याहून सातार मार्गानें टपालांतून स्वस्थानीं गेली.

शु० सू०

ठाणें—या आठवड्यांत पर्जन्य दररोज पुष्कळ व चांगला पडला. रोगराई नाहीं. एक दोन तालुक्यांत मात्र बाईची स्वारी आहे.

रोह्याचे मामलेदार गणेश विश्वनाथ गाडगीळ यांस देवआज्ञा झाली. सूर्योदय-

मुंबई—ऋतु वर्णन—ह्या आठवड्यांत रविवारा पासून गुरुवार सकाळपर्यंत पर्जन्याची एकसारखी वृष्टी झाली. ढगांनीं आकाश गर्क झालें होतें. सदर्हु मुदतींत सूर्यकिरण दिसलें असें क्वचित्. गुरुवार पासून थोडी उघाडी आहे. आकाशांत अजून मेघ आहेतच. पर्जन्याचीं चिन्हें कमी नाहींत. दिवसांतून एकादी दुसरी सर लागत असते.

मि० द०

गेल्या ज्ञानप्रकाशांत वे० भाऊ शास्त्री अष्टपुत्रे या विषयीं थोडा मजकूर लिहिला आहे. त्यांत एके ठिकाणीं "शास्त्री म्हणविणाऱ्या व शास्त्रार्थाचा वाद करणाऱ्या गृहस्थास मराठीही शुध्द व नीट लिहितां येऊं नये हें मोठें नवल होय" असें लिहिलें आहे व पुढें त्यांची बरीच पूजा केली आहे. आमच्या मतें ज्ञानप्रकाशाचा हा लेख रास्त नाहीं. जुन्या शास्त्री मंडळीस हल्लीं चालू असलेली मराठी भाषा उत्तम तऱ्हेनें न लिहितां येणें हें जितकें आश्चर्य कारक आहे त्याहून ज्ञानप्रकाशासारख्या विद्वान पत्रकर्त्यास, ती लिहितां आलीच पाहिजे असें वाटणें हें जास्त आश्चर्य कारक होय.

अ० द०

## जाहिरखबरा.

NOTICE.—Is hereby given to Mr. M. H. Willis late Station Master Sheagaum at present Nandgaum G. I. P. Railway, by the undersigned that he should within eigtht days from receipts of this Notice pay his spirits shop accounts as Marked against his name which are Rs. 43—13—0, otherwise he shall be Compelled to take legal steps.

(Signed) CIPRIAN DE MILLVO

Spirits Shop Keeper Sheagaum.

नोटिस—बनीचंद उदाराम मारवाडी दुकान पिंपळगांव काळे तालुके जळगांव याशी नोटिस देणार केशव पुरुषोत्तम पानटे वस्ती मौजे पिंपळगांव काळे याजकडून दिली जाते कीं, आमची जागा हवेली इमारत मैचीकासुद्धां मौजे मजकूर येथें आहे. तेव्हां आम्ही श्रीक्षेत्र काशी येथें खटल्यासुद्धां गेलो. त्याचवेळेस तुम्ही आम्हास तूर्त कोठे दुसरी जाग्याची सोय पाहून दुसरी जागा होईतोंपर्यंत आमचे हवेलींत राहू द्यावे नंतर आम्ही जाऊं असें ह्मटल्यावरून आम्ही तुम्हास काशीक्षेत्राहून सहा महिन्यानीं परत येऊं तोंपर्यंत तुम्हास राहण्यास हवेली आमची दिली असून सदर्हू जाग्यांत तुम्ही खटल्यासुद्धां राहिलेत नंतर आम्ही काशीक्षेत्राहून तुम्हास जागा परत मागितली असतां करार करीत गेलात. मग माझा विषम काळ असल्यामुळें मी बाळापुरास राहिलो मग मी बाळापुराहून येऊन माझी जागा खालीं करून मागितली असतां देतो दिलावतो असें छकेपंजे करीत गेलात. मी गरीब मनुष्य सबब मजला धक्के देऊन घराबाहेर घातलें करितां मी उगाच राहून आजपर्यंत मार्गप्रतिक्षा पाहिली परंतु अशी वासना कीं ही आमचीच जागा खरी झाली असें समजून माझी गरीबाची कांहींच तुम्हास दया येत नाहीं. यास्तव खालीं लिहिल्याप्रमाणें नोटिस देण्यांत येते.

आमचे जाग्यास तुम्ही किती रुपये खर्च केला आणि आमचें भाडें किती रुपये कोणते सालापासून झालें याबद्दल सर्व हकीकत या नोटिशींत कळविली पाहिजे. तुम्ही जे वेळेस माझ्या जाग्यांत राहिलेत ते वेळेस मुद्दलच माझी जागा नादुरुस्त नसोन तयार होती. तरी तुम्ही शंभर पन्नास रुपये खर्च लाविला असेल तर मी देऊ शकेन परंतु माझी जागा मजला कां मिळू नये याजबद्दल हकीकत कळवावी. तुमचेजवळ मुळींच स्वदस्तुरचें आमचें कांहीं खरेदी पत्र वगैरे काय असेल तें कळविलें पाहिजे. माझे हिशेबानें तुमचें मजला एक छदामसुद्धां देणें नाहीं मग माझें घर मजला राहण्यास कां देत नाहीं. याजबद्दल खातरी लायक कळवावें. आतां या नोटिशीचे तारखेपासून पांच दिवसांचे आंत तुम्ही माझी जागा खालीं करून द्यावी. नाहीं तर तुमचा दस्तऐवज काय असेल तो चार भले मनुष्याचे हातानें मजला दाखवावा म्हणजे मजला समजून मी त्याची तजवीज करीन. तुम्ही मागें एकदां भले मनुष्याचे हातानें मजला पांचशे रुपये देऊन घराचें बेदावापत्र लिहून मागत होता परंतु मजला रुपयांची गरज नसून हवेलीची गरज आहे. करितां मी रुपयांचा इनकार करून जागाच खालीं करून मागितली आहे. जर तुम्ही वर लिहिलेले मुदतीच्या आंत जबाब न दिला तर दिवाणींत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेऊं कळावें. ता० ८ सप्टेंबर १८६९.

(सही) केशव पुरुषोत्तम पानट दस्तुर गोपाळ केशव.

## क्रिमिनल प्रोसिजर कोड.

प्रोसिजर कोड सन १८६१ चा आक्ट २५ हा सुधारण्याबद्दल नवीन सन १८६९ चा आक्ट ८ झाला आहे त्यावरून पूर्वींच्या पैकीं पुष्कळ कलमें रद्द झालीं आहेत सबब पूर्वींच्या आक्टा पैकीं चालू कलमें व हल्लीं नवीन झालेलीं कलमें एकंदर करून आम्ही आपले छापखान्यांत शिलाप्रेसवर चतुष्पत्री सांचाचे छापण्यास आरंभ केला आहे. सदर्हू बुकाची किंमत रुपये २ आगाऊ ठविली आहे. मागाहून जास्त किंमत पडेल. या बुकास समजुतीचा कागद जोडलेला सुद्धा मिळेल. हें बुक माहे सपटेंबर सन १८६९ अखेर वर्गणीदारास बाधुन तयार मिळेल. पत्र पाठविणारांनीं सोलापुर येथें "कल्पतरु" छापखान्यांत किमतीचे पैशासुद्धां अगर टिकिटें पाठविणें. ह्याल्यास अर्धा आणा वर्तीळ्यासह पाठविले असतां बुक तयार होतांच रवाना करण्यांत येईल. किमती शिवाय टपालखर्च पडेल. ता० ८ माहे आगष्ट सन १८६९.

कल्पतरूचे मालक.

## जाहिरात.
## मुदतीसंबंधी तिन्ही इलाख्याचे हायकोर्टाचे निवाडे.

सर्व लोकांस कळावें कीं, आम्ही मुदतीचे कायदे व इतर आक्ट यांजवर आजपर्यंत मुंबई, कलकत्ता, व मद्रास यांतील हायकोर्टांनीं ठराव केले आहेत त्यांचा उपयोगापुरता सारांश समजण्याजोगा फक्त मुदती प्रकरणीं व ते ठराव कोणते ग्रंथांत कोणते पानांत सांपडतील त्याविषयीं प्रत्येक ठरावावर खुलासा होण्याकरितां नंबर तारिख, सन व त्या ग्रंथाचें पान याप्रमाणें हिलें आहे. या ग्रंथाची रचना अशी केली आहे कीं, ज्याज्या आक्टाचे ज्याज्या कलमावर हायकोर्टानें ठराव दिला आहे. त्या त्या आक्टाचीं कलमें लिहून त्या कलमा खालींच ठराव, नंबरवार, वार तारिखवार लिहिले. आहेत. फक्त सन १८५९ चा आक्ट १४ वरच झालेले ठराव लिहिले नाहींत. इतर आक्टावर मुदती संबंधीं केलेलेही लिहिले आहेत. एक कलमावर आजपर्यंत किती ठराव झाले आहेत हें चांगले रितीनें समजावें म्हणून प्रथम मोठे अक्षरानीं कलम लिहून त्याचे खालींच त्या कलमावरचे सर्व ठराव लिहून नंतर दुसरें कलम या प्रमाणे ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथांत खालीं लिहिलेल्या बुकांपैकीं ठराव आहेत.

१ मुंबई हायकोर्ट रिपोर्ट वाल्यूम १ पासून वाल्यूम ५ भाग २ पर्यंत.

२ मद्रास हायकोर्ट रिपोर्ट वाल्यूम १ पासून ३ पर्यंत.

३ कलकत्ता उइकली रिपोर्ट वाल्युम १ पासून १० पर्यंत.

४ शिवाय कितीएक वर्तमानपत्रांतील ठराव.

हे सर्व डिमळून सुमारें चार चारशें अगर साडेचारशें होतील.

अशा प्रकारचा ग्रंथ आजपर्यंत झाला नाहीं दिवाणी खात्यांतील न्यायाधीश वकील लोक व वकिलीचे परिक्षेंत जाणारे उमेदवार यांस याग्रंथापासून फारचउपयोग होईल, यांत संशय नाहीं. हें बूक छापण्याचें काम सोलापूर येथें कल्पतरु छापखान्यांत शिळाप्रेसावर सुवाच्य अक्षरांनीं जाड कागदावर चतुष्पत्री सांचाचें सुरु केलें आहे. वर्गणीदारांस हें बूक ता० १५ डिसेंबर सन १८६९ चे आंत मिळेल हें बूक सर्वांस सोइंवार मिळावें म्हणून आगाऊ किंमत ३ रुपये शिवाय टपाल खर्च ८४ व मागाहून रुपये ४ व टपाल खर्च याच प्रमाणें ठेवला आहे तर ज्या लोकांची बुकें घेण्याची इच्छा असेल त्यांणीं ता० १५ माहे सपटेंबर सन १८६९ चे आंत रुपये पाठविल्यास आगाऊ असें समजले जाईल. हे रुपये आमचे नांवें वर्गणीदारांनीं आपले नाव पत्यासुद्धां लिहून पाठवावें म्हणजे बुक तयार होतांच त्यांजकडे रवाना करण्यांत येईल. टिकिटा पाठविल्यास वर्तीळ्या सुद्धां पाठविणें. हें बूक दोततीन वकिलांचे मदतीनें निघणार आहे, सबब सर्व लोक आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

तारिख १५ माहे आगष्ट सन १८६९ इसवी. } विश्वनाथ नारायण सहस्त्रबुद्धे वकील कोर्ट अदालत जिल्हा सोलापूर.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरु केलें त्यास दोन वर्षें होत आलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल.

व. स. म्यानेजर.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscriber that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this] reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | ४ | |
| फुटकळ … … … | ० | ९ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरिता छापू[illegible]म• केलें

# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. IV AKOLA:—SATURDAY EVENING, SEPTEMBER 18, 1869 NO. 37

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १८ माहे सप्तंबर सन १८६९ इ० अंक ३७

## वसूल.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| श्री. रा. पंतप्रतिनिधी सा० | १० | ८ | ० |
| मे० लायल साहेब कामि० | ११ | १४ | ० |
| मे० डाक्टर पोर्टर साहेब | १९ | १२ | ० |
| मे० ऐक्षेट साहेब ए. इं. | १९ | १२ | ० |
| मे० डेविस सा० ए. अ. क. | १९ | ० | ० |
| मे० ताजुदीन सा० अ. क. | ९ | ४ | ० |
| रा. रा. श्रीकृष्ण नरहर जु. ए. अ. | ९ | ४ | ० |
| रा. रा. श्रीराम भिकाजी डि. इ. | ६ | ० | ० |
| रा. रा. बजाबा रामचंद्र डि. इ. | ९ | ४ | ० |
| शेट हरदयाळ गोवि० साहू | २२ | ९ | ० |
| शेट गोविंदराय गुलाबराय | १० | ४ | ० |
| शेट शिवलाल मोतीलाल | ११ | ० | ० |
| रा. रा. लक्ष्मण बाळाराम तह० | ९ | ४ | ० |
| रा. रा. त्रिंबकराव यशवंत तह० | २० | २ | ० |
| रा. रा. मल्हारराव सदाशीव त० | २३ | १० | ० |
| रा. रा. विश्वनाथ लक्ष्मण हेड | ० | ७ | ० | ० |
| रा. रा. केशव महिपत क्लार्क | ७ | ० | ० |
| रा. रा. गोपाळराव केशव देश० | १८ | ० | ० |
| रा. रा. लक्ष्मण जानराव जाहा० | १० | ० | ० |
| रा. रा. जानराव रामचंद्र देशमु० | १३ | २ | ० |
| रा. रा. मयाराम तुळशीराम | ८ | ४ | ० |
| रा. रा. विनायकराव अप्पाराव दे० | ९ | ४ | ० |
| रा. रा. हणमंत जयराम देशमुख | १६ | ० | ० |
| रा. रा. मार्तंड आनंदराव देश० | ९ | ४ | ० |
| रा. रा. शामराव रावजी देशमु० | ९ | ४ | ० |
| मि० बाळक रामजी पो० इस्पे० | ९ | ४ | ० |
| रा. रा. रामचंद्र रघुनाथ चीफ. का. | १७ | ८ | ० |
| मि. गुलाम अहमदुल्ला ची० का० | १० | ० | ० |
| रा. रा. बलदेव सिंव्ह ची० का० | ६ | ० | ० |
| रा. रा. केशव घनःशाम वकील | १४ | ७ | ० |
| रा. रा. वामन लक्ष्मण वकील | १० | ४ | ० |
| रा. रा. शामराव गोविंद वकील | १० | ८ | ० |
| रा. रा. बाळकृष्ण विनायक वकील | १० | ८ | ० |
| रा. रा. पांडुरंग गोविंद वकील | ७ | ० | ० |
| रा. रा. लक्ष्मण राजाराम वकील | ४ | ६ | ० |
| रा. रा. अप्पाजी श्रीपतराव वकील | १० | ० | ० |
| रा. रा. केशव यादव वकील | ६ | ० | ० |
| रा. रा. मार्तंड लक्ष्मण वकील | ७ | ० | ० |
| रा. रा. बळवंत बापुजी वकील | २६ | ० | ० |
| रा. रा. गोपाळ नारायण वकील | २२ | १२ | ० |
| रा. रा. मोतीलाल रामलाल वकील | १९ | ११ | ० |
| रा. रा. गणेश रावजी वकील | १० | ० | ० |
| रा. रा. गणेश रंगनाथ नाझर | ९ | ४ | ० |
| रा. रा. आत्माराम अनंत क्लार्क | १० | ० | ० |
| रा. वामन अनंत भोळे ओव्ह. सि. | १० | ८ | ० |
| रा. रा. नारायण जयकृष्ण शास्त्री | ३ | ० | ० |
| शेट नजुभाई अलिमहमद | १० | ० | ० |
| रा. रा. मोहनरिाज गोविंद ना. त. | ११ | ४ | ० |
| रा. रा. कृष्णाजी बापुजी ना. तह. | १० | ० | ० |
| रा. रा. भास्कर लक्ष्मण मास्तर | ९ | ९ | ० |
| रा. रा. महादाजी गंगाधर मास्तर. | ९ | २ | ० |
| रा. रा. मार्तंड बाबाजी मास्तर. | १० | ० | ० |
| रा. रा. लक्ष्मण महादेव मास्तर. | १० | ४ | ० |
| रा. रा. गोपाळ नारायण मास्तर. | ११ | २ | ० |
| रा. रा. रामचंद्र हरी मास्तर. | ६ | १२ | ६ |

आमच्या कित्येक प्रिय वर्गणीदारांकडे दोन दोन वर्षांच्या बाकया येणें राहिल्या आहेत. व त्यांस पत्रेंही पाठविलीं आहेत तर त्यांनीं लवकर पैसा पाठविण्याची कृपा करावी.

---

**गजकरणाचें औषध**—विक्रीस आलें आहे. चांगलें आहे. किंमत सहा आणे.

## कामदारांची शैली.

सरकारचें नुकसान न होऊं देतां, रयतेवर व हाताखालच्या नोकरांवर कटाक्ष न ठेवितां व हर कामांत त्यांवर तंतोतंत अवलंबून रहातां हुशारीनें व अब्रूनें जो सरकारी काम चालवितो त्याची लोकांत मोठी ख्याती व सरकारांत वजन असतें. सरकारी कामदार बारानबारा चोविस वर्षें एके ठिकाणीं एकेच कामावर राहील असें कधीं घडणें नाहीं; वारंवार कामदारांच्या बदल्या होतअसतात; तरी कामाचें स्वरूप सामान्यतः एकाच पध्दतीचें असतें. व इंग्लिश सरकारचें काम काजाचा नमुना असाच आहे कीं एके ठिकाणीं कामदार चांगला तयार झाला म्हणजे कोणत्याही जिल्ह्यांत त्यास कामावर पाठविलें तरी तो मागील पध्दती प्रमाणें काम करित असतो. एवढें मात्र जरूर आहे कीं बदली होऊन आलेल्या नवक्या कामदारास त्याच्या आफिसांतील जुन्या माहितगार नोकरांची माहिती व दप्तरचे दाखले यांचें सहाय घतलें पाहिजे. म्हणजे त्याचे कामांत बहुश कोठें व्यंग राहणार नाहीं.

युरोपियन कामदारांसही सदरील सर्व लिहिणें सारखेंच लागू आहे. त्यांतून ज्यांस मराठी भाषा चांगली येत नाहीं किंवा मुळींच येत नाहीं त्यावर तर, त्याभाषेतील कागद पत्रांवर सह्या घालण्यानें जबाबदारीचा अधिक बोजा पडत असतो हें त्यांचे लक्षांत असेलच. ते बहुधा आपले शिरस्तेदारावर अवलंबून असतात; म्हणजे शिरस्तेदार त्यांस कागदाचें स्वरूप हिंदुस्थानींत किंवा इंग्रजींत सांगून व डावे हाताकडे आपली सही करून उजवे हाताकडे साहेबांची सही घेतअसतात. शिरस्तेदार सरकारचे भरवशाचे व मोठ्या पगाराचे नोकर, व साहेबांस मराठी भाषा येत नाहीं म्हणून ते आपले स्वतांवर जबाबदारी अधिक आहे हें समजत असतीलच असा साहेबांचा साधारण ग्रह असावा हें उघड आहे. व मराठी कामाचे संबधानें साहेबांवर कांहीं दोष आला तर त्याचें जोखीम त्यांवर कांहीं पडणार नाहीं असें दिसतें. कारण साहेबांस ती भाषा बिलकुल येत नसतांहीं त्यांचे वरिष्ट त्यास त्या कामावर नेमतात ही वहिवाट आपण हमेषा पाहतो तेव्हा यांतच तें जोखिम शिरस्तेदारावर पडावें असा गर्भितार्थ दिसतो.

आणखीं हेंही खरें आहे कीं अधिकाऱ्यास भारेच्या भारे सह्या करावयाच्या प्रत्येक कागदांतील मजकूर समजून घेण्यास सर्व काळ सवड मिळेल असें होणार नाहीं. तेव्हां त्यांस शिरस्तेदारावर भरवसून राहवें लागतें त्यास त्यांचा उपाय नाहीं; तेव्हां अशा ठिकाणीं शिरस्तेदारांनींच हुशारीनें, मागील दाखल्यानें, व आफिसांतील दुसरे लोकांचे माहितीनें काम केलें पाहिजे. त्यांतून शिरस्तेदार नवके असून पूर्वीं त्या खात्यांत कधीं काम केलेले नसतील तर त्याची गोष्ट फार नाजूक आहे. त्यांनीं मागील दाखले पाहिले नाहींत व आफिसांतील लोकांची माहिती घेतली नाहीं तर त्यांची मोठी विद्वत्ता व उत्तमबुद्धिकौशल्य असलें तरी त्यांस थोडा तरी दोष आल्यावाचून राहणार नाहीं असें आम्हास वाटतें. याजकरितां शिरस्तेदार लोकांनीं जेथें असें असेल तेथें दक्षता ठेवावी हें उत्तम.

ही गोष्ट आम्हास आज आठवण्याचें कारण, अकोल्याच्या डिपुटी कमिशनरच्या रिविन्यु शिरस्तेदारीचे जाग्यावर रा० माधवराव हरी सहस्त्रबुद्धे यांस आलीकडे नेमलेले आहे. यांस इंग्लिश येते व बुद्धिमान आहेत. यांनीं सोलापुरास व नगरास अदालतीमध्यें राइटरचें काम केलें आहे व इलिचपुरास स्मालकाज कोर्टाकडे थोडे महिने हे क्लार्क होते. इतक्या ठिकाणीं रिविन्यु कामाचा त्यांस गंध नव्हता तरी त्यांची इतर हुशारी पाहून क्या० हडलस्टन साहेब रजेवर असलेले डिपुटि यांनीं त्यांस आपले रिविन्यु शिरस्तेदार केलें. यात त्यांनीं दुसरे लोकांचे हक्क बुडविले याशिवाय दुसरें कांहीं वाईट केलें असें आमचें म्हणणें नाहीं. बुद्धिमान व विद्वान मनुष्य असले तर शाळाखात्यांतूनही एकदम त्यास मामलेदार व डिपुटि कलेक्टर करितात व ते त्या कामास उत्तम लायकही होतात असें आम्हीं पाहिलेले आहे. मग आमच्याकडे कअसलेल्या माधवरावजीस हडलस्टन साहेबानीं रिविन्यु शिरस्तेदार बनविलें यांत कांहीं फाजिल केलें असें कोणाचे म्हणणें नसावें व सहस्त्रबुध्यानीं बुद्धी लढवून आज वर्षभर तें कामही बरेंच रेटलें आहे व त्यांत जे सामान्य दोष लोकांस वाटत आहेत त्यांशिवाय आणखी कांहीं दोष नसतलि तर त्यांस कोणी कांहीं टपका दिला पाहिजे असें नाही. माधवरावजी आमचे स्नेही आहेत व त्यांच्या हुशारीस आम्ही चाहतो. व आम्हांस वाटतें कीं त्यांनीं पूर्वीं कधीं असलें काम केलेलें नाहीं याजकरितां दुसरे शिरस्तेदार रा० रा० सखाराम दत्तात्रय, व चिटणिसी कडील कारकून यांचे माहितीनें व जुने दाखले त्याच्या अनुरोधानें कांहीं काळ काम करीत गेलें असतां त्यांस तें सुलभ जाऊन लवकरच करतळमळमय होईल व मग निर्दोषपणें काम चालून त्यांचा लौकिक होईल-

आम्हांस ज्या कित्येक गोष्टी कळल्या आहेत त्या तपशिलवार एथें सांगण्याचें कारण व अवकाश दिसत नाहीं म्हणून एकादी सांगतो.

वनचराई म्हणजे पाडित नंबराचे लिलाव मुंबई इलाख्यांतील वहिवाटी प्रमाणें इकडेही जुलई महिन्यांत होतात व त्यांचा वसूल पुढें हंगामावर घेत असतात. त्याप्रमाणें गुदस्त सालचे बाळापुर तालुक्याचे वनचराई लिलावाचा वसूल हंगामावर करण्याची तहशिलदारांनीं सक्त तजवीज केली असतां सुमारें १९३८॥ वसूल न येण्यांत निघाले; म्हणून तहशिल दारांनीं डिपुटि कमिशनर साहेबांकडे रिपोर्ट केला कीं सदरहु रकम सूट देऊन खर्चीं घालण्या विषयीं मर्जीनुरूप सांकशन आणवावें. परंतु डिपुटि आफिसांत तो विचार न मानवतां चतहशिलदारांनीं ती रकम आपले खासगींतून भरावी व पुढें लिलावाचे वेळी रोख रकम घेत जावी असा तहशिलदारास हुकूम गेला. आमच्या मतें हा वाजवी नाहीं. व अशी पूर्वींची वहिवाट नसावी. या विषयीं रिविन्यु शिरस्तेदार स्वतां माहिती मिळवून साहेबास देते तर तहशिलदारास गैरशिस्त हुकूम न मिळता, अशी आमची कल्पना आहे. मग शिर०नीं साहेबास कळवूनही त्यानीं तसा हुकूम दिलाअसल्यास आमची कल्पना खोटी ठरते व शिरस्तेदारावरील दोष दुसरीकडे जातो. अस्तु तो हुकूम पुढील कारणावरून गैरशिस्त असें आम्हांस वाटतें. आमचे ऐकण्यांत असें आलें आहे कीं अकोला तहशिली कडे मागें याच बाबदींत अशी बाकी राहिलेली आहे व तहशिलदारांचे रिपोर्टा वरून ती खर्चीं घालण्याचें सांगशंन आणविण्याची मागील डिपुटीनीं तजवीज केलेली आहे. मग एकाच जिल्ह्यांत अशा दोन वहिवाटी कां व्हाव्या? बरें हे १९३ रुपये बाळापुर तहशिलदाराचे खासगींतून भरून घेतले तर सरकारच्या वर्षास किति तोटा होणार तो पहा.

बाळापुर तहशिलदारांनीं सालमजकुरीं वनचराई लिलाव पुकारण्यांत दोन तऱ्हा केल्या. एक हंगामावर वसूल द्यावयाचा तर अमुक रुपये व तीन वेळां लिलाव होण्या बरोबर रोख वसूल द्यावयाचा तर अमुक रुपये अशीं दोन टिपणें केलीं व लिलाव तकूब ठेवून डि० कामि० सा०कडे दोहोंतून कोणता प्रकार करावयाचा म्हणून रिपोर्ट केला. त्या दोन रकमांत ३००० रुपयांची तफावत आहे असें दिसेल तेव्हां डि० साहेबानीं ताबडतोब रुपये घेण्याविषयींचा आपला हुकूम फिरविला व हंगामावरच वसूल घेण्याचा दुसरा हुकूम दिला. तेव्हां या गोष्टीचें मनन केलें असतां आम्हीं सदरी लिहिलेला सर्व प्रकार मनांत येण्या जोगा आहे. आतां आणखी कांहीं गोष्टी कळविण्यास अवसर नाहीं सबब पुरें करितों. मग पुढें पाहू.

प्रसिद्ध करण्यास आमचे मतें आम्हास जी गोष्ट रास्त दिसली ती इमानें इतबारें आम्ही लिहून प्रसिद्ध केली आहे. तिजवर कामदारांनीं लक्ष द्यावें.

---

## वर्तमानपत्रावर बेअदबीचा चार्ज.

(मागील अंकावरून पुढें चालू)

आनरबल मि० जस्टिस फियर साहेब म्हणाले—

या गोष्टीमध्यें आह्मी उत्सुकतेनें सांगतों कीं या कोर्टास जें वैभव आहे तें अयोग्य कृत्यानीं लोकांस दिसेसें करण्याकडे किंवा फाजील हुकूम चालविण्याकडे आमचा कल विल

कुळ नाहीं. जर या कोर्टाचे जज्ज मोठ्या काळजीनें व विश्वासानें आपलीं कामें करून कोर्टाचा सन्मान राखणार नाहींत तर जुलमी वर्तनानें त्यांजकडून तो कधीं हीं राखला जाणार नाहीं याविषयीं आमची पूर्ण खात्री आहे. अडवोकेट जनरल यांनीं हाजो मुकदमा कोर्टापुढें आणिला आहे तो केवळ या कोर्टाचा अमल व वैभव खरें करून दाखवावें या मुद्यावर आणिला नाहीं; या कोर्टाच्या फौजदारी कामाच्या स्वरूपाचें व योग्यतेचें रक्षण होणें आवश्यक आहे या मुद्यावर आणिला आहे असें आम्हीं समजतो. म्हणजे हें पत्र छापल्यानें कोर्टाचे वैभवाची अगर त्यांतील जज्जांचे अधिकाराची बेअदबी झाली या सबबेचें हें गाऱ्हाणें नाहीं, तर या इलाख्यांतील सर्वांहून श्रेष्ठ जें फौजदारी कोर्ट त्याजमध्यें प्रयक्ष चालू असलेल्या फौजदारी मुकदम्याच्या चौकशींत लांडावुच्चा कारभार करावयाचा प्रयत्न केल्याचें हें गाऱ्हाणें आहे; आणि हें पत्र आम्हीं वाचलें तेव्हां या मुकदम्यांत ज्या लोकांच्या साक्षी व्हावयाच्या होत्या त्यांच्या मनांत खोटी साक्ष दिल्याचें भय उत्पन्न व्हावें, व सरकारी कामदार खोट्या साक्षी देण्याबद्दल लोकांस लाच लुचपती देऊन कसे बधवितात हें दाखवावें असा या पत्राचा रोख आहे असें आह्मास दिसून आलें. त्या पत्रांत आरंभास लिहिलें आहे तें हें "असें म्हणतात कीं अलिपुरच्या माजिस्त्रटानीं ज्या लोकांच्या साक्षी जबान्या घेतल्या त्या आपल्या प्रासिक्यूशनांतील आरोपाशीं मिळाव्या अशसंकेताजोग्या करण्यास - लांच लुचपतीची खटपट झाली आहे परंतु तो प्रासिक्यूशनाचा आरोपच सर्वथैव असत्य आहे' नंतर पुढें असें लिहिलें आहे "दरवड्याच्या भयंकर गुन्ह्याचा खोटसाळ पणानें आरोप आणिला आहे, कारण तसें करण्यास हेतु कांहींच दिसत नाहीं. अशा उघड पणानें असा मोठा गुन्हा करणें, आणि प्रासिक्यूशनास मेळ घालण्याच्या इरादानें सक्षी पुरावा सजवून मुकदम्यांस जें अतिभयंकर स्वरूप आणिलें आहे तसें कृत्य मोठ्या, व काळ्या आणि गोऱ्या लोकसमूहां मध्यें मनुष्यानें करणें म्हटलें म्हणजे मनुष्य मात्राचा स्वाभाविक आदिकायदा किंवा पहिलें कर्तव्यकर्म जें "स्वसंरक्षण" त्याच्याही विरुद्ध गेल्यासारखें होतें. "असें लिहिलें आहे. व त्या पत्राच्या शेवटास आणखी असें लिहिलें आहे कीं "मनाचा थोर व उद्योगी अशा तरुण मनुष्याची अब्रू खराब करण्याकरितां असा अनीतीचा दुष्ट, व पिशाचवत प्रयत्न याहून अधिक कधीं कोणीं केला नसेल. आणि ज्या रितीनें हा खोटा व निराधार आरोप आणिला आहे व उत्तम रितीनें सजविला आहे तीहून अधिक फजितखोर रीति दुसरी नसेल."

मिस्राचें वर्तमानपत्र, जें लोक प्रिय असून ज्याचा खप मोठा आहे त्यांत अशा मजकुराचें पत्र व तेंही ज्या दिवशीं सेशन कोर्ट भरावयाचें त्याच दिवशीं प्रातःकाळीं छापून प्रसिद्ध झालें आणि तें जुरीपुढें योग्य द्वारानें यावयाचें असा संभवच, तेव्हां निःसंशय असें अनुमान होतें कीं चौकशीचे कामांत या पत्रानें कांहीं गुण करावा, व कैदीचा बचाव करणारास मदत व्हावी याकरितांच त्याची योजना होती.

नंतर मि० उइलसन साहेब एडिटर यानीं पुन्हा भाषणास परवानगी मागितली, आणि म्हणाले. ( पुढें चालू )

## सुएझचा कालवा.

हिंदुस्थानांतून विलायतेस जाण्याचे वाटेवर सुएझ नावाची संयागी भूमी आहे. तिचे दोहो बाजूस समुद्र असून तेवढीच मध्यें जमीन असल्या मुळें जलमार्गानें जाणार येणारास अडचण होत, म्हणजे येकीकडून येके आगबोटींत बसून यावें, पुढें सुएझ पाशीं उतरून आगगाडींत बसावें व तो जमिनीचा टापू संपला म्हणजे पुन्हां दुसरे आगबोटींत बसावें यामुळें उतारकरूस जरा त्रास व अवकाश लागे आणि माल चढविण्यास व उतरण्यास तरखर्च व आयास लागे तीसर्व अडचण हल्लीं दूर होण्याची तजवीज झाली आहे. म्हणजे या समुद्रापासून त्या समुद्रापर्यंत एक कालवा खणून काढिला आहे. व येथून तेथून सर्व पाणी येक केलें आहे. आतां आगबोट मुळींच बदलायास नको व आगगाडीचेंही कारण नाहीं. हा सुएझचा कालवा ९९ मैल लांब आहे व याची रुंदी ७७ मैलपावेतों ३२७ फुटांची आहे व पुढें २२ मैल १९६ फुटांची रुंदी आहे.

## नागपुर अब्झरवर.

लिहिण्यास वाईट वाटतें कीं नागपुर अबझर्वर नावाचें नागपुरचें वर्तमानपत्र या महिन्यापासून बंद झालें. याचें कारण कांहीं समजलें नाहीं. हें पत्र बंद झाल्यामुळें सेंट्रल इंडिया एकझामिनर नावाचें नवीन वर्तमानपत्र आठवड्यांतून दोनदा निघू लागलें आहे. परंतु हें सर्व इंग्लिश असतें यांत मराठी भाग मुळींच नाहीं. नागपुर अबझरवरांत इंग्लिश व मराठी मजकूर असत, त्यांत तरी मराठी भाग फार थोडा असून तोही चांगलासा नसे; आणि आतां तर मराठी मुळींच बंद झालें. नागपुरासारख्या शहरांत एकही मराठी पत्र नसावें हें तेथील विद्वानांस व देशसुधारकांस लाजिरवाणें आहे.

## BERAR COMMISSION.

Since the cession of Berar as a political trust by the Nizam to the English, good many changes have taken place in the administration of the province. In an intellectual, moral, social and political poiut, Berar at present is quite different from what it was 16 years ago. As soon as it was settled that the Berar should be governed by the English for the Nizam such officers as could be selected and spared from the staff attached to the Hyderabad contingent force, were appointed as Deputy Commissioners and put in charge of the several districts into which the province was then divided. They were directly placed under the Resident at Hyderabad. As time passed on, he found it difficult to superintend their work properly and consequently a commissioner was solely nominated to the Berar with authority, to control the proceedings of the Deputy Commissioners and to prescribe under instructions from the Resident, rulings in various matters affecting the welfare of this province. Under this *regime* a number of changes most salutory to the interest of the province were made in almost all the departments of this administration, so far as it was compatible with the circumstances, which it is not the object of our present article to enumerate. In the year 1867/68 when Sir Richard Temple was the Resident at Hyderabad, a sort of reorganization of the commission took place. The province, which formerly consisted of four districts, was made into two divisions East Berar and West Berar, and each of these division was presided over by a Commissioner.

The commissioners are independent of each other and they directly correspond with the Resident on matters arising in each division. Since the appointment of the Director of Public Instruction, educational department is regularly organized. Departments for the inspection and administration of forest, and cotton, Despensaries, revenue survay & were created, Courts of small causes established in different parts of Berar. All the Officers of these departments have something or other to do with the Resident, who has in addition to the supervision of this vast and most important province, political duties to perform at the court at Hyderabad. Since the death of the late Nizam, which sad evnt took place early this year Mr. Sanders acts as the head of the regency, which is appointed for the government of the Nizams dominion. The Resident has to perform a multiplicity of work a circumstance which is injurious to the interest of the Berarees. It is impossible to expect from a single officer, however, able, experienced, and well disposed he may be, to do justice to a variety of subjects of paramount importance, which would come before him. Besides Hyderabad is at too great a distance to be convenient to the people of this province to have recourse to the redress of any wrong when they might experience here. Considering all the circumstances of the province, it appears to our humble opinion absolutely necessary, as pointed out some time ago in one of our marathi leaders, that it high time for the government of India to think that a change in the present commission be made for public good.

A properly constituted court of the position of the High Court is a great want of this province. Its establishment will serve greatly to check effectually the irregular proceedings of several courts and give a real vigorousness to the judicial administration. We propose, therefore, that instead of having the two Commissioners as at present under the Resident directly, it would be better for the interest of the public to have one of them chief commissioner, with more powers than are given to the present Commissioners to decide matters on the spot under the general superintendance of the Resident and the other should a judicial commissioner who should watch how the courts of justice transact the work entrusted to them. The increasing demands created by the Railway intercourse, progress of education &c. clearly shows that some such change is imperetive to be made in the existing administration.

*Satya Prakash.*

## Local

## वऱ्हाड.

वऱ्हाडांत मरण पावणाऱ्या त्रिटिश लोकांच्या मालमत्तेविषयीं कशी व्यवस्था करित जावी या विषयीं हिं० सर०चा चालू सालचा १९ वा आक्ट झाला आहे.

वऱ्हाडांत कोणत्या प्रकारच्या शाळेंत कोणत्या यत्तेपर्यंत अभ्यास असावेत या विषयीं डायरेक्टर सा०नीं नियम करून चालू महिन्याच्या इजु० रेकार्डांत छापिले आहेत.

उमरावतीचे मोफसिल प्रेस कंपनीचे म्यानेजर डुगल साहेब यांनीं कांपिटिटिव परीक्षेकरितां गुदस्तां दिलेली जागा यावर्षींही देण्याचें कबूल केलें.

डायरेक्टर साहेबांचा सहामाही रिपोर्ट रेसिडंट साहेबानीं पसंत करून शाळांची व विद्येची वृद्धी होत आहे याजबद्दल संतोष दाखविला. व सर्व डिपुटि इजु०इन्स्पेक्टरांची हुशारी व उत्तम कामगिरी डायरेक्टर व डिपुटिकमिशनर यानीं कळविली तिजबद्दल त्यांनीं आपलें समाधान व्यक्त करून दाखविलें आहे.

या सहामाही वरून कळतें कीं मागील सहामाही पेक्षां ८० शाळा अधिक झाल्या. व ज्यास्त १०६३ मुलें अभ्यास करूं लागलीं.

हैदराबादचे रेसिडंट मेहे० सांडर्स साहेब विलायतेस रजेवर जाणार व त्यांचे जाग्यावर अयोध्ये कडील कर्नल बारो साहेब यांस नेमणार अशी टाइम्स पत्रामध्यें ऐकिव बातमी आहे.

नेटिव ओपिनियन पत्रावरून समजतें कीं निझामाचे राज्यांत धान्यापेक्षां कापसाचा पेरा जास्त होतो असें सर सालर जंग यांस कळल्यावरून कापसाचा पेरा कमी होऊन धान्याचा जास्त व्हावा या हेतूनें दिवाण यांणीं असा हुकूम केला आहे कीं कापुस पेरलेल्या शेतास दर बिघ्यास ५ रुपये सारा घेत जावा.

स्टांपकागदावर एकाबाजूनें मात्र लिहावें, अशी वहिवाट होती ती मोडून दोन्ही बाजूनें लिहिण्यास हरकत नाहीं असा नवीन ठराव झाला आहे.

वऱ्हाडचे व मध्य प्रांतचे रजिस्टर खात्याचे सुपरइंटेंडेंट मि० चेंबर्स रजा पुरी होण्यापूर्वीं येऊन आपले कामावर रुजू झाले-

मि० ब्रेटल साहेब वऱ्हाडच्या जंगल खात्याचे कनसरवेटर यांनीं चार्ज घेऊन आपलें काम सुरू केलें.

मि० डिसनी साहेब पैंगाषी कडील असिस्टंट सुपरइंटेंडेंट यांस दोन महिन्यांची रजा मिळाली.

### अकोला.

या आठवड्यांत करेन्सी आफिसांत ४८७३५० रुपयाच्या नोटी विकल्या. यांत मुबई व्यांकेनें व वाशीमचे डिपुटी कमिशनर साहेबानीं बऱ्याच नोटी घेतल्या. खाम गावांस नोटी मिळण्याची सरकारांतून तजवीज होणार आहे असें ऐकतों.

आम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं शहरांतील चौकें बाजारांत दुकानांतून रांडा राहिल्या होत्या त्या तेथून दुसरे ठिकाणीं जाऊन राहतील अशी तजवीज झाल्यास चांगलें होईल या बाबे डिपुटी कमिशनर साहेबांस आम्हीं गल्या अंकांत शिफारस केलीती ती त्यांस पसंत होऊन त्यांनीं त्यां रांडांस तेथून दुसरेकडे जाऊन

राहण्याचा हुकूम दिला व तो मे० दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब असिस्टंट कमिशनर यांजकडून अमलांतही आला.

येथील हल्लींचे डिपुटी कमिशनर क्या० मेकंजी साहेब यांस नवीन क्रिमिनल प्रोसिजर कायद्याच्या ४४५ व कलमाप्रमाणें सात वर्षे कैदेची शिक्षा देण्याचा अधिकार मिळाला. आतां त्यांचे सेशन कोर्ट भरत जाईल. व त्याप्रमाणें सोमवारीं सेशन आहे.

विष्णु विठ्ठल शेट सोनार या नावाचे एक कारागीर ठाण्याहून येथें आले आहेत ते चांगले दागिने करितात असें पाहण्यांत आलें आहे. त्यांनीं आपलें दुकान ताजना पेठेंत मिस्तर पांडुरंग दामोदर क्युरेटर यांचे बंगल्यांत चालू केलें आहे.

डा० सिंक्लेयर साहेब पुन्हा उमरावतीस गेले आहेत. .

## Epitome of News
## वर्तमानसार.

टार्ट या विषयावर मराठींत नवीन येक ग्रंथ होत आहे. त्याची जाहिरात मित्रोदय पत्रांत लिहिली आहे.

नगर जिल्ह्यांतील येवल्याचे मुनसफ माधवराव पालेकर मरण पावले. त्यांचे जागेवर मुंबईचे वकील रा० रा० विश्वनाथ गोविंद चोळकर यांस नेमणार असें वर्तमान आहे.

खानदेशांत कुणबी लोकांचा महर्घतेनें फार उपासमारा होत आहे. म्हणून धुळयास कलेक्टर साहेबांनीं सभा भरविली व वर्गणी जमविण्याचा क्रम सुरू केला. त्यांनीं स्वतां १००० रुपये दिले. व जडज साहेबांनीं ५०० रुपये दिले.

मुंबइत आमनिबस म्हणजे जनरथ नावाच्या आगगाडीवर ह्या मोठाल्या गाड्या होत्या त्या त्यांच्या भागीदार मंडळींनें आपला कारखाना बंद करण्याचा ठराव केला.

रजपुत संस्थानांत धान्याचा व मारवाडांत पाण्याचा दुष्काळ झाला आहे.

मुंबईचे स्त्रियांचें नार्मल स्कूल या महिन्या पासून सुरू झालें.

रायपुरास ४०००० रुपये खर्चून नुकतीच जिल्हा कचेरी बांधिली तिची तपासणी करण्याच्या प्रथम दिवशींच तिला गळती लागली.

नोटिस—शिवराम वलद भवानी पाटील राहाणार खंडाळे ता० बाळापूर यांस भोळाराम वलद पुनमचंद साहू याजकडून देण्यांत येते कीं तुम्ही दवलता वलद बापूजीचे मार्फतीनें जिमा घेवून १५ दिवसात दस्तऐवज करून देऊं म्हणून कबूल केलें असता त्या प्रमाणें तुम्ही केलें नाहीं तर ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत दस्तऐवज करून द्यावा कळावे ता० १६ सपटंबर सन १८६९ इ०

(सही) भोळाराम वलद पुनमचंद दस्तुर खुद.

नोटिस—जयराम पुरुषोत्तम पांडे मौजे नीमकर्द हल्ली वस्ती खंडाळे तालूके बाळापूर यांस भोळाराम पुनमचंद यांजकडून देण्यांत येतेकीं आपण दवलता वलद बापूजी याजबद्दल जामीनकी घेऊन पंधरा दिवसांत निकाल करितों म्हणून बोलला त्या प्रमाणें आज पर्यंत झालें नाहीं तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत दस्तऐवज करून द्यावा कळावें तारीख १७ सपटंबर सन १८६९ इ०

(सही) भोळाराम वलद पुनम चंद साहू

नोटिस—जगंनाथ डालीये किसन तारकेस यांचा गुमास्ता मयत ह्याची वारस बायको गंगा मर्द जगंनाथ इजला नोटिस चुनीलाल भवानीदास साहु बाळापूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे नवऱ्याचे व आमचे भागीदारी मधें अफूचा व्यापार असता त्याने बाराशे रुपये व्यापाराकरितां घेतले पैकीं साडेतीनशें रुपये पोच देऊन बाकी साडेआठशें रुपये व अफू बाकी राहिली त्याजबद्दल आजपावेतों निकाल झाला नाहीं व अफूबद्दल आम्हांस दंड ही झाला तर ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत आपला माल फरोक्त करून आमचे रकमेचा व्याजा सुद्धां निकाल करावा नाहींतर रितीप्रमाणें सरकारात फिर्याद करून या नोटिसीचे खर्चा सुद्धां भरून घेण्यात येईल व अफूची तक्सीम तुम्ही घेऊन गेला नाहीं व आमचे तक्सिमेची आम्हांस विकता आलीनाहीं यामुळे घरांत अफू सुमारें साडेतीन वर्षे राहिल्यानें सरकारचे गुन्हेगार होऊन दोनशें रुपये आम्हास दंड झाला व सर्व अफू सरकारांत गेली हे आमचें नुकसान तुमचे कसुरीने झालें सबब दंडाचे रुपये २०० व निमे अफू साडेदाहा शेराची किंमत १५० मिळून रुपये साडे तीनशें पाठवावे व आपले आमचे तक्सिमेचा हिशोब करून आमचे घेणें निघेल तें द्यावें कळावें तारीख १७ सपटंबर सन १८६९ इसवी.

( सही ) चुनीलाल भवानी दास दस्तुर खुद

नोटिस—दवलता वलद बापुजी देशमुख राहाणार खंडाळे तालूके बाळापूर यांस भोलाराम वलद पुनमचंद साहू दुकान खंडाळें यांजकडून देण्यांत येते कीं तुमचे कडे १२५ रुपये बाकी निघत असून आपल्यास मागे या बाबदीत नोटिस दिली होती परंतु त्या प्रमाणें तुम्ही येऊन हिशोब वगैरे कांहीं केले नाहीं तर आतां आम्ही फारदिवस वाट न पाहातां तुमचेवर फिर्याद करून रिती प्रमाणें या नोटिशीचे व व्याजाचे खर्चासुद्धा भरून घेण्यात येईल कळावे ता० १७ सपटंबर सन १८६९ इ०

(सही)भोलाराम वलद पुनमचंद

नोटिस— पनालाल साहेबराम मारवाडी राहणार सावरगांव तालुके जळगांव यास खालीं सही करणार अशी नोटिस देतों कीं, गोकुळचंद याचें शेत नंबर ११२ यांतील उभे पिकाचा माल कापूस आम्ही खरेदी केला असून त्या नंबरापैकीं तुम्ही कापूस खंडी ६॥ आमचा घेऊन गेलात. सबब कळवितों कीं सदहू तुम्ही नेलेला माल आठ दिवसांत आमचा आम्हास आणोन देणें न दिल्यास शिरस्त्याप्रमाणें फिर्याद करून खर्चासुद्धां रुपये घेण्यांत येतील कळावे. ता० १७ सप्टेंबर १८६९ इ०

(सही) किसनराम लक्ष्मणदास राहणार सावरगांव याचें वकिलपत्रावरून माधवराव विष्णु वकील.

नोटिस—सर्वत्रांस कळण्यासाठीं देण्यांत येते कीं, सूर्यभान वलद मानाजी कुलट पाटील मौजे पुंड तालुके अकोट यानकडे आमचे घेणे रुपये १७७३८५८४ असोन त्याबाबद आम्ही त्याजवर दिवाणी कोर्टांत दावाही केला आहे. या जाहिरातीने इतकें कळविण्यांत येतें कीं, आम्ही फिर्याद केल्याकारणाने तो आपली जिनगी लबाडीनें म्हणजे आम्हास पैसा न मिळावा या हेतूनें गहाण किंवा विक्री करील तर ती घेणारांनीं विचार करून घ्यावी व तसेंच देणार सूर्यभान यांणींही विचार करून द्यावी कळावें. ता० १६ सप्टेंबर १८६९ इसवी.

(सही) हनवतराव जयराम ठोंबे दस्तुर रामचंद्र रामकृष्ण ठोंबरे.

नोटिस—तुकाराम वलद चिमणाजी, नारायण वलद जानजी, रंभु वलद हरकाजी पाटील राहणार वस्ती माटरगांव वु० तालुके बाळापूर यांस खालीं लिहिलेले इसमाकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येते ऐशीजे.

१ तुम्ही ता० १९ अगष्ट सन १८६९ इसवीची नोटिस दिली त्याविषयीं आतां खालीं लिहिलेले खुलासे तुम्हास कळाते.

२ दस्ताऐवजांत लिहिलेली शर्त पुरी केली नाहीं म्हणून तुमचें म्हणणें तें आम्ही नाकबूल करितों. कारण ही गोष्ट पुरतेपणें समजून उमजून लिहिली नसावी.

३ तुम्ही ज्या रुपयांचें मागणें मागतां तें धनको रिणकोचे दरम्यान जसा व्यापार चालून उभयतांमध्यें अडथळा येतो तेव्हां जसें धनकोकडून मागणें होतें आणि तो व्याजासह आकार करितो त्या उदाहरणाप्रमाणें आपले नोटिशींत दाखविलें परंतु तसा मुळींच प्रकार नाहीं. हे तुमचे लक्षांत आहे असें असून विनाकारण आम्हास नोटिस दिली हें बराबर नाहीं.

४ दिवाणींत दावा करण्याची भीती ही नोटिशींत आम्हास दाखविली त्या दस्ताऐवजास तीन वर्षांहून ज्यास्ती दिवस झाल्या कारणानें मुदतीची हरकत असेल.

५ या नोटिशीचे खर्चाचे रुपये विनाकारण आम्हास तुह्मी नोटिस दिल्यानें पडले सबब हे रुपये प्रथम तुमचेकडून आदा झाले पाहिजेत कळावें. ता० १८ सपटेंबर सन १८६९ इसवी.

(सही) रायभान वलद बेगाजी पाटील दस्तुर रामजी पाटील.

(सही) रामजी वलद सूर्यभान पाटील दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० महाराज, आपल्या सुंदर समाचारपत्रीं ह्या चार ओळी छापून प्रसिद्ध कराल अशी आशा धरून पाठविल्या आहेत ह्यांस येत्या अंकांत जागा मिळावी.

अरुणोदय पत्रकर्त्यानें आपल्या तारीख २२ अगष्टच्या अंकांत अवलियाचे पुस्तकावर पांडित्य करून शत्रूवर शस्त्रप्रहाराप्रमाणें गालीप्रदानांत बरीच जागा खपविली. अरुणोदय आपणांस दुनयेंतील काय ते शहाणे आम्हीं एक, अशा भ्रमानें नसती उठाठेव करून विनायक रावजीचे गुरू होण्यास पहातात. परंतु पुस्तक करणाराचा हेतु कोणता व पुस्तकांतील एकंदर मर्म कोणतें, तें कांहींच त्यांस कळालें नाहीं. बरें नाहीं तें नाहीं त्यांत लिहिलेली गोष्टही त्यांस चांगली समजली नाहीं. हें त्यांनीं केलेल्या दोषारोप निंदेवरूनच मर्मज्ञ वाचक जाणतील. परंतु गुण असतील ते गुण न दिसतां जर उलट दोष दिसूं लागले तर हें लहान अज्ञान काय? असो, त्यांणीं आपलें अंगचें अज्ञान आणण्यास, आपण एडिटर झालों म्हणजे सर्वज्ञ झालो, हा मृषा अभिमान सोडून त्यांनीं विनायक रावजीचा "ओ ना मा" वळावा अशी त्यांस त्यांचे कल्याणाकरितां सूचना आहे.

या ग्रंथांतील सर्व पात्रें एकसारखींच प्रमुख आहेत व जरी श्रीधररावासच नायक मानला तरी तोच नायक या ग्रंथात योग्य समजला पाहिजे. आपल्या बायकोच्या उघड वागणुकीवरून श्रीधराचे मनांत तिजविषयीं विपरीत संशय झाला, व तो कोणीं कितीही शहाणा असला तरी त्याचे मनांत येण्यास शक्य आहे. ही हिची मानसीक वागणुक भित्रेपणामुळें व लज्जेमुळें झाली किंवा आपणावर तनाखोरीनें झाली ही जाणण्यास अशक्य आहे. मनुष्य कितीही शहाणा असला तरी समजून कामक्रोध जिंकण्यास पंडितास ही कठीण व ओघर कांहीं योगी नव्हता म्हणून गर्वानें त्यांचे ज्ञानाचा नाश होऊन महादेव हा माझे बायकोचा फार प्रिय मित्र, ह्या वैषम्यानें अत्यंत क्रोधानें अंध होऊन विचारांत चुकून त्यास विहिरींत ढकलून दिलें. हा दोषरूप गुण ह्या नायकाचे अंगीं असलाच पाहिजे. दोष किंवा गुण कथेच्या संगतीस विरुद्ध न येतां व रसाभास न होतां जे असतील ते त्या नायकाचे गुणच समजावे. नायक ईश्वरासारखा फारच योग्य असावा असा कोठें विधी असेल तर मग बरीक विधी प्रमाणें न वागल्यास नरकप्राप्तीचा प्रत्यवाय लागेल. ग्रंथांतील नायक दोषरहित असावा हें युक्तीनें घेणें आहे. या ग्रंथांत महादेवास नायकपणा देऊन ग्रंथ रचना करण्याची शक्ती ग्रंथकर्त्यास नव्हती असें आम्हास वाटत नाहीं; तर ही नवीन तऱ्हा केली आहे हें ग्रंथकर्त्याचें ज्ञानावरून स्पष्ट समजतें, तेव्हां मागील ग्रंथकाराच्या रीतीहून वेगळी रीत योजून सर्व प्रकारें नवीन कल्पना करून ग्रंथ चांगला रचिला असें कां म्हणू नये; मागील ऋषींनीं केलेल्या धर्मशास्त्रांत युक्तीनें फेरफार करण्याचा जर सुधारलेले हुकुम आणितात तर यःकश्चित कादंबरीचा नायक अमुक तऱ्हेचा पाहिजे अशाबद्दल आपणास अटकेंत काय म्हणून पाडून घेतात? ज्याचे इच्छेस जसा युक्त वाटेल तसा तो आपले ग्रंथात नायक करील. मागील ग्रंथकारांनीं जसे ग्रंथ लिहिले आहेत तसेच लिहावे असें असेल तर मागील ग्रंथ पाहूनच निर्वाह होत असतां, उगीच नवीं पुस्तकें लिहिण्याची व वाचण्याची अवश्यकता राहिली नाहीं असें होईल. ह्मणून नवीन कल्पना करून ग्रंथ लिहिला तरच त्याची मातब्बरी समजली पाहिजे.

जी गोष्ट आपल्या ओठा बाहेर निघाली नाहीं व ज्याकरितां सर्व जगाचा कंटाळा येऊन मरणास राजी झालेल्या मनुष्यास जर त्याची त्वद्गत गोष्ट सांगून संशयाची निवृत्ती कोणी करील तर त्यापेक्षां कोणतें बलवत्तर प्रमाण आमच्या सुधारलेले अरुणोदयास विश्वास बसण्यास पाहिजे? 'एम ए, च्या व 'बी ए, च्या टिकल्या मिळविल्या ह्मणजे सर्वज्ञता येते अशी अरुणोदयाची समजूत असेल तर ती त्यांनीं सोडून दिली पाहिजे, माधव आपल्या बापकोचा कोण हेंही समजण्यास व्यवहारचातुर्य पाहिजे असें ते कबूल करतील. व श्रीधरास ती माहिती न होण्याचीं कारणेंही ग्रंथकर्त्यानें लिहिलीं आहेत.

राज्यें नाटक पाहिलें त्यांत ऋषिपुठ्यां तील मंडळीनें गोपीचीं सोंगें घेतलीं असें कोणीं सांगितलें तर अरुणोदय त्याचा उपहास करून त्यास मारावयास उठतील. व विच्यारतील कीं, कायहो पुरुषाच्या अवयवाच्या व पिकलेल्या दाढी मिशाच्या तरुण स्त्रिया झालेल्या तुम्हीं कधी तरी पाहिल्या आहेत काय? त्यास उत्तर काय द्यावें? अवलियाचें सोंग घेणाऱ्या बहुरूप्यास बैदेणीचें सोंग घेतां येणार नाहीं असें समजणें, हा केवढा वरें व्यवहाराच्यातुर्याचा प्रकाश अरुणोदयांतून निसटला! या ग्रंथांतील दोष वऱ्हाडसमाचारांनीं काढलेले येणेंप्रमाणें.

१. सगुणीस बैदेणीनें गोष्ट सांगितलेली अंमळ वेगट झाली.

२. महादेवानें गर्भाधानाचे उत्तर दिवशीं केलेला आपल्या सख्या बहिणीचा विनोद त्याचे योग्यतेस फारच हलकट झाला. व तोच विनोद दोन साधारण मनुष्यें एकाच व्यसनाचीं असूनपरस्पर मित्र ( मित्र म्हणून फक्त बोलण्याचा प्रकार असतो ) असतां उभयतांची एकाच फार दुर्मिळ पर स्त्रीवर अतिशय उत्कंठा असून त्यांतील एकास ती प्राप्त झाली असतां, दुसरा ती गोष्ट समजल्यावर कामांध होऊन सुमार न पहातां आपल्या कृत्रिम मित्रास बोलतो तर तसे ठिकाणीं हा विनोद असेल तर योग्य होईल.

३. नारायण शास्त्री व महादेव कृत कार्य झाल्यावर इतकेदिवस गुप्त राहाण्याचें कारण ग्रंथ कर्त्यानें प्रदर्शित केलें नाहीं.

४. अवलियानें श्रीधर रावास बहुत झिटकारलें व फार हेलपाटे दिले तर हा विस्तार ज्यास्त आहे.

विच्यार करून पाहातां वऱ्हाडसमाचारानीं काढलेले दोष योग्य आहेत. व यावरून त्यांनीं ग्रंथ समग्र वाचून त्यांतील मर्म जाणलें असें स्पष्ट दिसतें.परंतु चौथा दोष त्यांच्या नजरचुकीनें गुण असतां त्यांस दोष दिसला असें आम्हांस वाटतें जर तेअमळ विच्यार करून पहातील तर श्रीधर आपणास पूर्ण वश झाला व आतां याची बुद्धी फिरणार नाहीं हें कसून पहाण्याकरितां अवलियानें दिलेले हेलपाटे योग्य दिले असे कबूल करतील.

७३-७४ पृष्ठावरचा दोष अरुणोदयास स्वज्ञानानें सांपडला नसावा तर सर्वत्र दोषदृष्टी असल्यामुळे सहजानुसार सांपडला असावा असें त्यांच्या लेखावरून उघड दिसतें.

हा ग्रंथ छापण्याचे पूर्वीं रा० रा० कृष्णशास्त्री चिपळूणकर प्रभृति विद्वान मंडळीस दाखवून त्यांनीं पाहिल्या नंतर छापला, असें माझे ऐकण्यांत आलें आहे. तेव्हां त्यांचे पेक्षा शतपट अरुणोदय विद्वान असतील म्हणूनच विद्वानाचे दृष्टीनें जे गुण ते, त्यांस दोष दिसून, नवीन उमेदवारास हिंमत देण्याचें एकीकडेस राहून (या पुस्तकाचे किंमती बद्दल किती रुपयांस देशबांधव बुडाले असतील.ही गोष्ट अशी आहे व हिची योग्यता अशा प्रकारची आहे म्हणून जर पूर्वी समजलें असतें तर ती वाचण्याकरितां आयुष्याचा अमूल्य भाग कधींहि खर्चिला नसता) अशा प्रकारचे उद्गार त्यांचे लेखणींतून निघाले. व याजवरून कादंबरीची प्रीति त्यांस मुळीच नाहीं हें स्पष्ट होतें. तर त्यांनीं पूर्वी सांगितल्या प्रमाणें अवलियाचा ओनामा वळवावा. अरुणोदयाचे या आर्टिकलावर जबाब न देतां उगीच बसावें असा मनांत विचार आला, परंतु व्यर्थ उगीच निंदा केली ती सहन न होऊन यांचे पांडित्यानें लोकांचे मनांत पुस्तकाविषयीं विपरीत बुद्धी होऊन हें सुंदर पुस्तक वाचण्यास लोक मुकतील म्हणून त्यांतील कांहीं दोषांचा उद्धार केला.बाकीचे दोष अप्रयोजक आहेत ते वाचकच जाणतील.

आतां अरुणोदय उगींच न बसतां मांझे लिहिण्यावर स्वज्ञानानें आणखी पांडित्य करतील परंतु उगीच त्यांचे बरोबर मी भांडण्यांत आपला अमोल्यकाळ पुनः खर्च करणार नाहीं.

एक मर्मज्ञ

## जाहिरखबरा.

नोटिस—प्रयागदास दमाजी साहू दुकान पेठ नांद्रे तालुके मलकापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं कसबे नांद्रे येथें उखर्डा थोरट कुणबी याचे घरासमोरचे जागेतील पेवांत तुमची व आमची शेताची जवारी खंडया २५ व शिवाय आमची खाजगतची जवारी खंडया ४७१ मिळून जवारी खंडया २९१ भरलेली आहे ती जवारी विकण्यास अगर वाटून देण्यास पुष्कळवेळां तुह्मास म्हटलें असतां तुम्हीं दोहीतून कोणताही एक निकाल केला नसल्यानें हल्लीं या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांत सदर्हू पेवांतील हिस्से रशिदीनें तुमची तुम्हीं घेऊन आमची आम्हास द्यावी अगर विकणेंविशीं लेखी आह्मास पत्र द्याहावें. तसें न कराल तर आमचे हिशाची कुल जवारी खंडया १६॥१ चीं किंमत आजचे बाजारभावानें तुम्हास द्यावी लागेल मग तुमची कोणतीहि तक्रार चालणार नाहीं व बाजारभावची किंमत तुम्हीं न द्याल तर मग फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां जवारीची किंमत भरून घेण्यांत येईल. हें पक्कें समजून फिर्यादीचा प्रसंग न येईल अशी तजवीज करावी कळावें. ता० १४ सप्टेंबर १८६९ इसवी

(सही) नथमल किसनचंद साहू नांद्रेकर.

नोटिस—दयाळसा वलद अर्जूनसा जात रंगारी यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हीं आमचे जवळून रुपये १७०० कर्जाऊ व्याजावर दस्तऐवज लिहून देऊन घेतले त्याचा उलगडा मुदतींत केला नाहीं तर ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत उलगडा करावा किंवा नवीन दस्तऐवज करून द्यावा तसें न झाल्यास फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां व व्याजासुद्धां रुपये घेण्यांत येतील कळावें तारिख १६ सप्टेंबर सन १८६९ इसवी.

(सही) चुनीलाल भवानीदास दस्तुर खुद.

नोटिस—सर्व लोकांस खालीं सही करणाराकडून कळविण्यांत येते कीं, खामगांव तालुके बाळापूर येथील राहणार कुंजलाल वलद लक्ष्मण पुरवार हा माझा पुत्र असून सुमारें ४१५ वर्षांपासून निराळा रोजगार करीत आहे. याणें आजपावेतों केलेले व्यवहारसंबंधी देणें व घेणें याचा मालक तोच असोन याचे रोजगाराचा अथवा कोणत्याही प्रकारचा संबंध आह्माकडे स नाहीं. याजबरोबर ज्यांची देवघेव असेल त्याजबद्दलची व्यवस्था त्यांची त्यांणीं परभारें पाहिजे तशी करावी. आह्माकडे अगदीं संबंध नाहीं कारण याची चालचलणूक चांगली नसल्याकारणानें तो पैसा गैरशिस्त रीतीनें खर्च करीत आहे. यास्तव सर्वांस या जाहिरातीनें कळवितो कीं, पुढें याजला कोणीं पैसा देऊ नये. दिल्यास त्याबद्दल व पूर्वीचे ज्यांचें देणें असेल ते इसम यासुद्धां सर्वत्रांची आह्माकडे कोणत्याही कारणानें व कोणत्याही प्रकारची जबाबदारी नाहीं हें सर्वत्रांस कळावें.

ता० २७ आगष्ट सन १८६९ इ०

(सही) लछिमन दास हेमराज पुरवार वस्ती पेठ खामगाव.

नोटिस—भोनाजी वलद भावसिंग जात कुणबी अडनांव म्हाली वस्ती अकोट येथें इलिचपूर वेशीवर यांस महादेव सदाशिव महाजन दुकान अकोट अशी नोटिस देतो कीं, हल्लीं तुम्हीं अकोट येथें ज्या घरांत राहातां तें घर भगवंतराव देशमुख व खुशालराव देशमुख अकोटकर याचें आहे व त्यांनीं मजला २०० रुपयांस फरोक्त करून तारीख २८ माहे अगष्ट सन १८६९ इसवी रोजीं लेख लिहून दिला त्याजवर तुम्हीं साक्ष घातली आहे. दस्तऐवज माझे हातीं आल्यावर मी तारीख ३० अगष्ट सन १८६९ इसवी रोजीं चवघा मनुष्या समक्ष बोलाऊन घर माझे ताब्यांत द्या वें असें म्हटलें असतां तुम्हीं उत्तर केलें कीं भगवंतराव जर मजलाच घर फरोक्त करते तर मी रुपये दिले असते आतां ही भगवंत रावानीं दुसरी जागा मजला राहाण्यास द्यावी मी घर खालींकरून देतों माझी त्या घरावर मालकी नाहीं. असें असतां तुम्हीं विनाकारण तहशीलदार साहेब तालुके अकोट यांकडे खोटा अर्ज दिला कीं मी राहतों तें घर माझें आहे. मी खरीद पत्रावर साक्ष घातली नाहीं, पुर्जा आहे असें सांगून माझी साक्ष लिहून घेतली असा अर्ज केला म्हणून तुम्हीं जबाबदारींतून मुक्त झाले नाहीं. घर व जागा भगवंतरावजींची असल्याबद्दल त्यांजपाशी कबाला आहे.व तुम्हीं भाडें देऊन थोडे दिवसापासून राहातां व तुमची कोणतेही प्रकारें घरावर मालकी नाहीं. खरेदी खतावर तुम्हीं साक्ष घातली म्हणून मी तो लेख ठेऊन घेतला यास्तव ह्या नोटिशीनें कळवितों कीं तुम्हीं नोटिशीचे तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत घर खालीं करून माझे ताब्यांत द्यावें. तसें न केल्यास तुमच्यावर दिवाणींत फिर्याद करून घर ताब्यांत घेऊं आणि नोटिशीचे खर्चासुद्धां सर्व कोर्ट खर्च देणें लागेल, तारिख १२माहे सपटंबर सन १८६९ इ०

(सही महादेव सदाशिव माहाजन दस्तुर खुद.

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास दोन वर्षें होत आलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या मोहन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्र तेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणाराचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबदलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscriber that their Subscriptions, for the present year, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this] reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास··· | ···६ | ० |
| साल अखेर ··· ··· | ···७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ··· | ···३ | ८ |
| एक अंकास ··· | ···० | ४ |
| फुटकळ· ··· ··· | ···० | ९ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबदल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

## नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० केलें

# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. IV  AKOLA :—SATURDAY EVENING, SEPTEMBER 25, 1869  NO. 38

पुस्तक ४  अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २५ माहे सप्तंबर सन १८६९ इ०  अंक ३८

## वसूल.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| मि० स्कार्जी साहेब | ८ १२ ० |
| रा. रा. वामन रेणको वकील | १९ ० ० |
| रा. महादेव गंगाधर मास्तर | ९ २ ० |
| रा. मार्तंड बाबाजी मास्तर | १० ० ० |
| रा. लक्षुमण महादेव मास्तर | १० ४ ० |
| रा. | |
| रा. | |
| रा. | |
| रा. | |
| रा. | |
| रा. | |
| रा. | |
| रा. | |

## जाहिरनामा.

डिपुटी कमिशनर जिल्हा अकोलें प्रांत वऱ्हाड यांचें कोर्टांतून:—

मिस्तर बेजनजी आरदेसरजी माजी तहशिलदार तालुके अकोलें हे तारीख २७ माहे जानेवारी सन १८६९ इसवी रोजीं अकोलें येथें मयत झाले. त्या मयतांनीं तारीख २२ जानेवारी सन मजकूर रोजीं लिहून दिलेलें उईल (मृत्युपत्र) चांदबी निसबत बेजनजी इणें आमचें कोडतांत हजर करून सन १८६५ चा आकट १० प्रमाणें प्रोबेट् मिळणें विषयींचा अर्ज केला आहे. त्याची चौकशी हें कोर्ट तारीख १९ माहे आकटोबर सन १८६९ इसवी रोजीं करील सबब या जाहिरनाम्यावरून सर्वांस कळविण्यांत येतें कीं, सदरलि नेमले तारखेचे आंत कोणी येऊन वर लिहिलें चांदबी इजला प्रोबेट न मिळतां आपल्यास मिळावें अशी तक्रार न केल्यास चौकशी होऊन चांदबीस प्रोबेट दिलें जाईल. मुक्काम अकोलें तारीख २२ माहे सपटेंबर सन १८६९ इसवी.

मधवराव हरी
शिरस्तेदार.

C. Hordern.
आफि० डिपुटी कमिशनर.

लें आहे. चांगलें आहे. किंमत सहा आणे.

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

## अंकलिपी.

( मित्राकडून. )

मनुष्यांनीं आपलें मनोगत परस्परांस कळण्याकरितां भिन्न भिन्न प्रकारच्या लिपी काढल्या आहेत त्याच वर्गांत गणित संबंधीं अंक आहेत. त्या अंकांचा उपयोग गणितावाचून अन्य होत नाहीं तो व्हावा या हेतूनें ही अंक लिपी तयार केली आहे हिचा उपयोग लिहिणें, वाचणें, इत्यादि प्रकारांनीं होतो.

कागद, शाई, लेखणी यावांचून मण्याचे माळेंत व दुसऱ्या अशा सांकेतिक ... पत्र पाठवितां येतें.

...नें एकदम छापखान्याप्रमाणें दहा पंधराही पत्रें

| स्वर |
|---|
| काना |
| इ |
| ई |
| उ |
| ऊ |
| ए |
| ऐ |
| अं, अनुस्वर |
| अः विसर्ग |

दिव्याची जोत किंवा दुसरा लांबूनदिसणारा पदार्थ या योगानें तारायंत्राप्रमाणें ते पदार्थ ज्या लांबीवरून दिसतील त्या अंतरावरून बोलतां येतें.

सर्व भाषेंतील अंकांत हिचा उपयोग केल्यास होईल.

हस्त, नेत्र, संकेतानें करपल्लवी व नेत्रपल्लवी प्रमाणें व मुखानें अंकावर मिताक्षरी प्रमाणें मनोगत कळतें.

एक पत्रांत दोन मजकूर पाहिजे तसे उत्पन्न करितां येतात. सारांश ह्या लिपीचा सर्व तऱ्हांनीं उपयोग होतो.

याबद्दलचें पुस्तक थोडयाच दिवसांत जिज्ञासु वाचकांकरितां तयार होईल, अशी आशा धरून तूर्त हा तक्ता परमादरानें सादर केला आहे यास्तव याचा अंगीकार करून; केल्याचा दाखला माझे परिचित व अपरिचित देशबांधव दाखवितील अशी आशा धरितों.

...मजुतीचींकलमें.

...वर स्वरांक लिहिल्यानें अंकलिपींत बाराखडी उत्पन्न

| ... | शू | शे | शै | शो | शौ | शं | शः |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ... | ११५ | ११६ | ११७ | ११११६ | १११७ | ११८, | ११९ |

...र काना मात्रा मिळून झालें आहे म्हणून श + काना
११ १

...इतर बाराखडया या उदाहरणाप्रमाणें समजाव्या.

जोडाक्षर—अक्षरांचा संयोग ज्या क्रमानें झाला असेल त्या क्रमानें व्यंजनांकावर व्यंजनांक लिहून नंतर त्यावर हवा असेल तो स्वरांक लिहावा, जसें.

श्री = श + र + ई = ११४२३
११ ४२ ३

या प्रमाणें रेफादि जोडाक्षरें समजावींत क्ष ज्ञ र्प क्त त्त
७११२, २३२५४१, ४२३१, ७१२१, २१२१.

मजकूर—अंकलिपींत मजकूर बेरजेच्या रितीनें लिहावा किंवा अक्षरलिपीप्रमाणें पंक्तीनें लिहावा परंतु अक्षरलिपीप्रमाणें लिहितांना प्रत्येक अक्षरांतीं नवाचा अंक लिहित जावा व त्यास अक्षरविरामचिन्ह समजावें. अशा पंक्तींत विसर्गांत अक्षरापुढें दोन नवाचे अंक येतीलच.

यादोन प्रकारांचीं उदाहरणें— " दुःखित अंतःकरणास विवेकानें शांत करा "

पांक्ति. २३४९९७२२९२१९४५८९२१९९७१९४२९६५१९१३९४४२९४४६९७११९२५६८९१११८९२१९७१९४२१९.

बेरजेच्या रितीनें.

| | |
|---|---|
| २३४९ | ४४२ |
| ७२२ | ४४६ |
| २१ | ७११ |
| ४५८ | २५६८ |
| २१९ | १११८ |
| ७१ | २१ |
| ४२ | ७१ |
| ६५१ | ४२१ |
| १३ | |

या लिपींत आंकडा लिहिणें झाल्यास तो ८ या अंकावर लिहीत जावा जसें. २५ पंचवीस हें लिहिणें आहे तर ८२५. असे लिहावेत.

गणितशब्द.— हे ... अक्षरलिपींत जसे ... देऊन लिहितात तसे अंकलिपींत शून्य देऊन लिहावे तसें.

पाहिजे किंवा पा
तसे } असें लिहावें.
३११ ३११०
१४२
९३६

## वर्तमानपत्रावर बेअदबीचा च्यार्ज.

(मागील अंकावरून पुढें चालू)

जज्ज आनरबल जस्टिस फियर साहेब यांनीं, सेशनांत चालणारे चौकशींत न्यूनाधिक व्हावयाच्या योजनेनेंच त्या दिवशीं सकाळीं पत्र छापिल्याचें अनुमान होतें, असें म्हटलें इतका मजकूर मागील अंकांत झाला आहे. त्या पुढील हकीकत—

मि० डइलसन साहेब एडिटर म्हणाले, नामदार साहेबानीं एका मुद्यावर जें सांगितलें त्याच्या खुलाशा विषयीं एक शब्द बोलण्याची मला परमानगी असावी.

१८ वे तारखेस म्हणजे ज्या दिवशीं सकाळीं मि० शेफर्ड साहेबांचें पत्र प्रसिद्ध झालें त्याचदिवशीं क्रिमिनल सेशन सुरू होणार होतें या विषयीं मला बिलकुल माहिती नव्हती. शेफर्ड साहेबांनीं मला असें सांगितलें कीं माझ्या मुलावरील आरोपाबाबद मागें जें पत्र प्रसिद्ध झालें होतें त्या विषयीं आणखी मजकूर दुसऱ्या वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झाल्यानें फार गवगवा झाला आहे. व तो खोटा आहे असें लोकांस कळविण्याची माझी इच्छा आहे. सेशन उद्या सुरू होणार आहे याजकरितां माझें एवढें पत्र आपण प्रसिद्ध करावें असें ते मजजवळ बिलकूल बोलले नाहींत. आणखी मी खरोखर सांगतो कीं सेशना विषयीं मला कांहीं कल्पना नव्हती. व पत्रा खालीं तें पत्र लिहिणाराचें नाव होतें. तेव्हां तें वाचतांनां निःसंशयें लोक समजतीलच कीं हें मुलाचे बापाचे हातचें पत्र आहे तेव्हां एकतर्फी व अपमतलबी असण्याचा संभव आहे असें मला वाटलें होतें.आणि जरकरितां तें बिननावानें प्रसिद्ध झालें असतें

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. IV AKOLA :—SATURDAY EVENING, SEPTEMBER 25, 1869 NO. 38

पुस्तक ४ अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २५ माहे सप्तंबर सन १८६९ इ० अंक ३८

## वसूल.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| मि० स्कार्जी साहेब | ८ | १२ | ० |
| रा. रा. वामन रेणको वकील | १५ | ० | ० |
| रा. महादेव गंगाधर मास्तर | ५ | २ | ० |
| रा. मार्तंड बाबाजी मास्तर | १० | ० | ० |
| रा. लक्षुमण महादेव मास्तर | १० | ४ | ० |
| रा. गोपाळ नारायण मास्तर | ११ | २ | ० |
| रा. रामचंद्र हरी मास्तर | ६ | १२ | ६ |
| रा. अनंत रामचंद्र मास्तर | ९ | ४ | ० |
| रा. महादेव शास्त्री माटे मास्तर | ९ | ४ | ० |
| रा. सदाशीव गोविंद मास्तर | ५ | ० | ० |
| रा. हरी महादेव मास्तर | १५ | १२ | ० |
| रा. वामन गणेश मास्तर | ७ | ० | ० |
| रा. नारायण बल्लाळ मास्तर | ५ | ० | ० |
| रा. वामन गणेश मास्तर | ७ | २ | ० |
| रा. विश्वनाथ नारायण मास्तर | ५ | २ | ० |
| रा. मार्तंड गंगनाथ मास्तर | १३ | १५ | ६ |
| रा. नरसो यशवंत कारकून. | ५ | ० | ० |
| रा. मोरो जनार्दन कारकून. | १० | ० | ० |
| रा. श्रीनिवास नारायण हु.का. | ९ | ४ | ० |
| रा. महादेव बाबाजी मोजणी. | ९ | ४ | ० |
| रा. रामराव निळकंठ राशीन. | ९ | ४ | ० |
| रा. चुडामण देवला | १० | ८ | ० |
| रा. गणपराव बापुजी विदूर | ३ | ० | ० |
| रा. कृष्णराव चिमणाजी | ५ | १० | ० |
| रा. दिनानाथ गोपाळ जळगां. | ९ | ० | ० |
| रा. रामचंद्र रामकृष्ण मुळे | १० | ८ | ० |
| रा. रामराव बापुजी अकोल० | १६ | ३ | ० |
| रा. धर्मासा सोनासा | १२ | ४ | ० |
| रा. चिमणाजी पाटील | २२ | ४ | ६ |
| रा. पुंजाराम बाबा पाटील | ९ | ५ | ० |
| हुबळी लायब्ररी | ९ | ० | ० |
| उमरावती लायब्ररी | ३ | ० | ० |
| वाई लायब्ररी | ७ | ३ | ६ |
| इलिचपुर लायब्ररी | ७ | ० | ० |

आमच्या कित्येक प्रिय वर्गणीदारांकडे दोन दोन वर्षांच्या बाकया येणें राहिल्य' आहेत. व त्यांस पत्रेंही गेलीं आहेत तर त्यांनीं लवकर पैसा पाठविण्याची कृपा करावी.

**गजकरणाचें औषध**—विक्रीस आलें आहे. चांगलें आहे. किंमत सहा आणे.

### TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

## अंकलिपी.

( मित्राकडून. )

मनुष्यांनीं आपलें मनोगत परस्परांस कळण्याकरितां भिन्न भिन्न प्रकारच्या लिपी काढल्या आहेत त्याच वर्गांत गणित संबंधीं अंक आहेत. ह्या अंकांचा उपयोग गणितावाचून अन्य होत नाहीं तो व्हावा या हेतूनें ही अंक लिपी तयार केली आहे हिचा उपयोग लिहिणें, वाचणें, इत्यादि प्रकारांनीं होतो.

कागद, शाई, लेखणी यावांचून मण्याचे माळेंत व दुसऱ्या अशा सांज्ञिक प्रकारांनीं पत्र पाठवितां येतें.

टोंचण्याचें साधन केलें तर त्यानें एकदम छापखान्याप्रमाणें दहा पंधराही पत्रें तयार होतील.

| व्यंजनें. | | | | | स्वर | |
|---|---|---|---|---|---|---|
| श ११ | ष १२ | स १३ | ह १४ | ळ १५ | १ | काना |
| त २१ | थ २२ | द २३ | ध २४ | न २५ | २ | इ |
| प ३१ | फ ३२ | ब ३३ | भ ३४ | म ३५ | ३ | ई |
| य ४१ | र ४२ | ल ४३ | व ४४ | अ ४५ | ४ | उ |
| च ५१ | छ ५२ | ज ५३ | झ ५४ | ञ ५५ | ५ | ऊ |
| ट ६१ | ठ ६२ | ड ६३ | ढ ६४ | ण ६५ | ६ | ए |
| क ७१ | ख ७२ | ग ७३ | घ ७४ | ङ ७५ | ७ | ऐ |
| | | | | | ८ | अं, अनुस्वर |
| | | | | | ९ | अः विसर्ग |

दिव्याची जोत किंवा दुसरा लांबूनदिसणारा पदार्थ या योगानें तारायंत्राप्रमाणें ते पदार्थ ज्या लांबीवरून दिसतील त्या अंतरावरून बोलतां येतें.

सर्व भाषेंतील अंकांत हिचा उपयोग केल्यास होईल.

हस्त, नेत्र, संकेतानें करपल्लवी व नेत्रपल्लवी प्रमाणें व मुखानें अंकावर मिताक्षरी प्रमाणें मनोगत कळतें.

एक पत्रांत दोन मजकूर पाहिजे तसे उत्पन्न करितां येतात. सारांश ह्या लिपीचा सर्व तऱ्हांनीं उपयोग होतो.

याबद्दलचें पुस्तक थोडया च दिवसांत जिज्ञासु वाचकां करितां तयार होईल, अशी आशा धरून तूर्त हा तक्ता परमादरानें सादर केला आहे यास्तव याचा अंगीकार करून; केल्याचा दाखला माझे परिचित व अपरिचित देश बांधव दाखवितील अशी आशा धरितों.

### समजुतीचीं कलमें.

**अक्षरवटिका**—व्यंजनांकावर स्वरांक लिहिल्यानें अंकलिपींत बाराखडी उत्पन्न होते; जसें:—

| श | शा | शि | शी | शु | शू | शे | शै | शो | शौ | शं | शः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १११ | ११२ | ११३ | ११४ | ११५ | ११६ | ११७ | १११६ | १११७ | ११८, | ११९ |

ह्या बाराखडींत शो हें अक्षर काना मात्रा मिळून झालें आहे म्हणून श + काना + मात्रा
११ १ ६

याप्रमाणें शौ हें अक्षर जाणावें व इतर बाराखडया या उदाहरणाप्रमाणें समजाव्या.

**जोडाक्षर**—अक्षरांचा संयोग ज्या क्रमानें झाला असेल त्या क्रमानें व्यंजनांकावर व्यंजनांक लिहून नंतर त्यावर हवा असेल तो स्वरांक लिहावा, जसें.

श्री = श + र + ई = ११४२३
११ ४२ ३

या प्रमाणें रेफादि जोडाक्षरें समजावीत क्ष ज्ञ र्प क्त त्त
७११२, २३२५४१, ४२३१, ७१२१, २१२१.

**मजकूर**—अंकलिपींत मजकूर बेरजेच्या रितीनें लिहावा किंवा अक्षरलिपीप्रमाणें पंक्तीनें लिहावा परंतु अक्षरलिपीप्रमाणें लिहितांना प्रत्येक अक्षरांतीं नवाचा अंक लिहित जावा व त्यास अक्षरविरामचिन्ह समजावें. अशा पंक्तींत विसर्गांत अक्षरापुढें दोन नवाचे अंक येतीलच.

यादोन प्रकारांचीं उदाहरणें— " दुःखित अंतःकरणास विवेकानें शांत करा "

पांक्ति. २३४९९७२२९२१९४५८९२१९९७१९४२९६५१९१३९४४२९४४६९७११९२५६८९१११८९२१९७१९४२१९.

बेरजेच्या रीतीनें.

| | |
|---|---|
| २३४९ | ४४२ |
| ७२२ | ४४६ |
| २१ | ७११ |
| ४५८ | २५६८ |
| २१९ | १११८ |
| ७१ | २१ |
| ४२ | ७१ |
| ६५१ | ४२१ |
| १३ | |

या लिपींत आंकडा लिहिणें झाल्यास तो ८ या अंकावर लिहीत जावा जसें. २५ पंचवीस हें लिहिणें आहे तर ८२५. असे लिहावेत.

[illegible]— हे [illegible] अक्षरलिपींत जसे [illegible] देऊन लिहितात तसे अंकलिपींत शून्य देऊन लिहावे जसे.

पाहिजे किंवा पा } असें लिहावें.
तसें
३११ ३११०
१४२
५३६

## वर्तमानपत्रावर बेअदबीचा च्यार्ज.

(मागील अंकावरून पुढें चालू)

जज्ज आनरबल जस्टिस फियर साहेब यांनीं, सेशनांत चालणारे चौकशींत न्यूनाधिक व्हावयाच्या योजनेनेंच त्या दिवशीं सकाळीं पत्र छापिल्याचें अनुमान होतें, असें म्हटलें इतका मजकूर मागील अंकांत झाला आहे. त्या पुढील हकीकत—

मि० उइलसन साहेब एडिटर म्हणाले, नामदार साहेबानीं एका मुद्यावर जें सांगितलें त्याच्या खुलाशा विषयीं एक शब्द बोलण्याची मला परमानगी असावी.

१८ वे तारखेस म्हणजे ज्या दिवशीं सकाळीं मि० शेफर्ड साहेबांचें पत्र प्रसिद्ध झालें त्याचदिवशीं क्रिमिनल सेशन सुरू होणार होतें या विषयीं मला बिलकुल माहिती नव्हती. शेफर्ड साहेबांनीं मला असें सांगितलें कीं माझ्या मुलावरील आरोपाबाबद मागें जें पत्र प्रसिद्ध झालें होतें त्या विषयीं आणखी मजकूर दुसऱ्या वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध झाल्यानें फार गवगवा झाला आहे. व तो खोटा आहे असें लोकांस कळविण्याची माझी इच्छा आहे. सेशन उद्या सुरू होणार आहे याजकरितां माझें एवढें पत्र आपण प्रसिद्ध करावें असें ते मज जवळ बिलकूल बोलले नाहींत. आणखी मी खरोखर सांगतो कीं सेशना विषयीं मला कांहीं कल्पना नव्हती. व पत्रा खालीं तें पत्र लिहिणाराचें नाव होतें. तेव्हां तें वाचतांनां निःसंशयें लोक समजतीलच कीं हें मुलाचे बापाचे हातचें पत्र आहे तेव्हां एकतर्फी व अपमतलबी असण्याचा संभव आहे असें मला वाटलें होतें. आणि जर करितां तें बिननावानें प्रसिद्ध झालें असतें

तर त्याबरोबर खात्रीचा कांहीं एडिटोरियल लेख प्रसिद्ध झाला असता, व मग मात्र तें न्यायाच्याकामांत न्यूनाधिक व्हावें या इराद्याचेंच होतें अशी कल्पना करणें योग्य होती.

नामदार जज्ज साहेब म्हणाले —हें पत्र प्रसिद्ध झाल्याची जबाबदारी उइलसन साहेब आपल्यावर घेतात. परंतु कोर्टानें कल्पना केलेला परिणाम घडण्याविषयींचा त्यांचा स्वतांचा हेतु काडिमात्रही नसल्याविषयीं ते सांगतात तें आम्ही कबूल करितों. व याच प्रसंगीं हेंही सांगतों कीं सेशनाचे सुरवातीचेच दिवशीं असें पत्र प्रसिद्ध होणें वाईट होतें. वर्तमानपत्राचे मोकळिकेंत कांहीं प्रतिबंध असावा अशी आमची काडिमात्र इच्छा नाहीं. परंतु अप्रातिबंधपणें या देशांतील सर्वांहून श्रेष्ठ कोर्टाच्या न्यायाच्या कामांत न्यूनाधिक करण्याच्या इराद्याचें चिन्ह जेव्हां आम्हांस दिसून आलें तेव्हां तें मना करणें जरूर वाटून अडवोकेट जनरल यांच्या हें प्रकरण उपस्थित करण्याचा सूचनेस आम्ही रुकार दिला. आतां कोर्टास वाटलें होतें इतकें दुष्ट परिणामकारक तें पत्र नाहीं असें ठरतें. आमची खात्री आहे कीं फौजदारी कोर्टाच्या निष्पक्षपाता विरुद्ध बोलण्यास जितके मि० उइलसन साहेब निरिच्छ आहेत तितके दुसरे कोणी नसतील; तथापि जुरीचे चौकशीचें काम, मग तें उण्या अधिक किती ही महत्वाचें असो, त्यांत अशा लौकिक गोष्टींनीं बिघाड न होईल याविषयीं जपवेल तितकें जपलें पाहिजे; आणि यापत्रामध्यें जसें जुरीविषयीं म्हटलें आहे तसें कोर्टाचे इतल्या शिवाय तिला कोणी बोलतां कामा नये हाही निर्बंध पाहिजे आहे. परंतु मि० उइलसन साहेब यांचा तसें करण्याचा उद्देश नसून ते म्हणतात कीं सेशनच्या सुरवातीच्या दिवशीं तें पत्र प्रसिद्ध झालें गेलें हा केवळ कर्मधर्मसंयोग होय व तसें असावें असें आम्हासही वाटतें. आतां आम्हीं अडवोकेट जनरल यांचा विच्यार घेतो.

अडवोकेट जनरल म्हणाले कीं मि० उइलसन साहेबांनीं पब्लिक ओपिनियन म्हणजे लोकांचें मत या विषयीं जें सांगितलें तें सर्वच मला संमत नाहीं असें जरी आहे तरी मी नामदार साहेबांचेच विच्यारावर ही गोष्ट सोपवितो.

मि० जस्टिस फियर म्ह० या फिर्यादी संबंधी नियमाप्रमाणें हा खटला सोडून देणें किंवा चालविणें हें जडजांचे खुशीवर ठेविलें आहे किंवा नाहीं हें बरोबर समजत नाहीं.

अड० जन० म्ह० होय साहेब. त्या नियमांत असें आहे कीं "तसें नसेल तर कायद्या प्रमाणें करावे."

मि० ज० फिय० म्ह०—या मागें असें एकादें प्रकरण झालेलें आम्हास आठवत नाहीं. आम्हीं बारिस्टर मंडळींतून कोणास या विषयीं माहिती असली तर ती कळवावी म्हणून विच्यारितो.

यावर कोणाकडून कांहींच उत्तर मिळालें नाहीं.

नंतर मि० जस्टिस फियर साहेब म्हणाले. या प्रकरणांत आम्हांस असें वाटतें कीं थोडा दंड ठरवावा म्हणजे पुरें आहे. व तोही नुसता कोर्टाचें मत प्रदर्शनार्थं बहुतांशी नावाचाच असावा. आमच्या मतें पन्नास रुपये दंड पुरे आहे. व मुकदमा चालवा नाही असेंच समजावें

आम्हीं इच्छितो कीं हा दंड केवळ नावाचा आहे. व खरोखर नाही असा आमचा मतलब सर्वांस समजावा.

मि० उइलसन साहेब यांस पन्नास रुपये दंड केला आहे.

---

याप्रमाणे या कज्जाची हकीकत आहे. याचा निकाल झाल्यावर दुसरे दिवशीं उइलसन साहेबांनीं आपले पत्रांत लिहिलें आहे कीं या कज्जाच्या अवल पासून अखेर पर्यंत यत्किंचितही आरोपापासून दूर राहण्या विषयीं जो संभावित व प्रशस्त मार्ग आम्हास दिसला तो आम्हीं धरिला होता. आमचे दुर्लक्षानें हा आम्हावर मुकदमा होण्याचा प्रसंग आला होता म्हणून त्याचें फलभोक्तृत्वाविषयीं आम्ही धीट व तत्पर झालो होतो. व आम्हास जें थोडें अवघड वाटलें होतें तें मुकदम्याच्या अखेरीअखेरीस. व आम्हीं कोर्टांतून आपले आफिसांत जाऊन पोचलों नाहीं तोंच आम्हांस एक पत्र व पन्नास रुपये असे आले होते. व संध्याकाळ पर्यंत दंडाकरितांच म्हणून बहुतांकडून बहुत रकमा आम्हांस नजर आल्या, परंतू त्या गृहण करू नयेत हेंच आम्हांस योग्य वाठलें व तसें करून आम्ही त्यांचे आभार मानिलें.

---

THE DISTRESS IN MARWAR.

In a communication, dated Aboo, the 17th August, Lieut. Col. R. H. Keatinge, C. S. I. & V. C., Governor General's Agent for the States of Rajpootna, wrote as follows to the Secretary to the Government of India, Foreign Department:—

"I have the honour to reply to your telegram of 16th inst desiring information as to the state of Marwar.

"Within the last few days crowds of people in a partially starving condition have flocked into Erinpoora; and from reliable information given to me by European travellers, I learn that great destitution is observable on all the high road from thence to the Ajmeer district.

"A considerable number of people have quite lately left the country for Malwa.

"Prices continue as high as they ever have been in Ajmere, which is close to the border of the most favoured part of Marwar. Wheat is selling at five seers, and barley at six seers per rupee.

"Locusts are out over almost the entire western protion of Marwar, in Serohi, and in the country around Deesa. They are now doing little harm; but great apprehensions are entertained for the result in October when the young crops are produced.

"Near Palee and in Jodhpore itself, the tanks are still empty, and the ground up to this date barely sufficiently moistened to admit of sowing. In this part of Marwar the area sown is estimated not to be one quarter of the usual cultivation.

"There is a great deal of disease throughout the country from bad food in Jodhpore; cholera has been active for many weeks, and deaths are now reported to be sixty to seventy daily.

"Contrary to this very sad picturer, I have good accounts of all the States in the Meywar Agency."

---

# Local

# वऱ्हाड.

नंबर ६१७

मेहेरबान कमिशनर साहेब बहादुर पश्चिम वऱ्हाड यांस:—

फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट साहेब हैदराबाद यांजकडून लिहून आवयाचें कीं, वऱ्हाडांत निजामसरकारांतून स्टांप कागद येऊन ते आक्टोबर महिन्याच्या पहिले तारखेपासून चालू व्हावयाचे होते. परंतु ते इतक्या लवकर तयार होऊन येऊन वऱ्हाडांत पुरविले जाणार नाहींत असें त्यांस दिसल्याचें त्यांनीं कळविल्यावरून रेसिडेंट साहेबांचे हुकुमावरून आपणास कळविण्यांत येतें कीं, त्या स्टांपकागदाच्या सुरवातीकरितां नोवेंबर महिन्याची पहिली तारीख ठरविली. आहे तर हा मजकूर सर्व लोकांस जाहिर होईल अशी तजवीज आपण करावी.

हैदराबाद रेसिडेन्सी ता० १९ सपटेंबर १८६९ इ. } डब्ल्यु टुइडी आफि० फ० असि० रेसिडेंट.

लेफ० अलेकझांडर साहेब वऱ्हाडांतील आफिशियेटिंग असिस्टंट यांचें नांव बंगाल स्टापकोरमध्यें सन १८६६ चे जून महिन्याचे ४ थे तारखेपासून दाखल केलें असें गेल्या आठवड्यांतील हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटावरून कळतें.

काटन कमिशनर मि० रिवेट कारन्याक साहेब सिमल्यास जाणार आहेत असें नागपुरा कडील वर्तमान पत्रावरून समजतें.

इलिचपुरचे कायमचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्णशास्त्री बापट यांची प्रकृती अजून चांगली दुरुस्त झाली नाहीं म्हणून त्यांनीं आणखीं ३ महिन्यांचे रजेचा अर्ज केला आहे असें ऐकतों.

वणी जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर मे० वुषबी साहेब थोडे महिन्यांत विलायतेस जाणार असें ऐकण्यांत आहे.

वाशिम जिल्ह्यांतील पुसदचे तहशीलदार मि० मीर वजीर आली खा हे पेनशन घेणार असें ऐकतों.

क्या० मेकंजी साहेब डिपुटी कमिशनर नांदुरा येथें आल्या वेळीं तेथील सरकारी शाळेंत गेले होते. शाळेची व्यवस्था चांगली, मुलांचा अभ्यास चांगला, व मास्तराची हुशारी चांगली पाहून त्यांनीं मास्तर यांस एक पागोटें बक्षीस दिलें व आपलें संतोषसूचक पत्र लिहिलें. या शाळेवर रा. नारायण प्रभाकर पराजपे हे हेड मास्तर आहेत. व यांस हें भूषण आहे. यांस त्या शाळेवर जाऊन अजून च्यार महिनेही झाले नाहींत इतक्यांत त्यांनीं शाळेस असें रूप आणिलें व कांपिटिटिव परिक्षेकरितांही कांहीं मुलें तयार केलीं हें पाहून आम्हांस संतोष वाटतो.

## अकोला.

या आठवड्यांत दोन तीनदा पाऊस चांगला पडला. नदीलाहि दोन दिवस सामान्य पाणी आलें होतें. असें मध्येंच पाणी आलें म्हणजे बोटवाल्याचें चांगलें पिकतें व लोकांस त्रास होतो. आणि अमक्यास आधीं बसवावयाचें, अमक्यास मागाहून दुसरे खेपेस बसवावयाचें असें तोंडदेखलें व हिमायतीचें काम चालतें असें ऐकण्यांत आहे. तसें नसावें. व क्रमानें येतील तसतसे सर्वांस बसवून न्यावें. हें चांगलें.

कमिशनर साहेबांची स्वारी नांदुऱ्यास सेशना करितां गेली होती. दुसरे दिवशीं परत आली. दोन कैदींस १०।१० वर्षांच्या शिक्षा झाल्या.

डिपुटी कमिशनर साहेबांकडे या आठवड्यांत सेशन झालें. मुकदमे चार होते. सोमवारीं आरोपी शिवलाल सनोडे याजवर दोन मुकदमे होते त्यांचा निकाल झाला. त्यावर एक च्यार्ज, तो चोरांचे टोळींतील असल्याचा होता व दुसरा त्यानें माजिस्त्रेट साहेबांकडे एक जबानी देऊन कमिशनर साहेबांकडे दुसरे मजकुराची जबानी दिली असा खोटया प्रतिज्ञेचा च्यार्ज होता. पहिल्याबद्दल ९ महिने व दुसऱ्याबद्दल ६ महिने सक्तमजुरी कैदेची शिक्षा झाली.

तिसरा मुकदमा खोटें नाणें पाडल्याचा, यांत चार आरोपी होते. पैकीं एकावर दोन च्यार्ज बसून त्यास ८ वर्षें कैदेची, व दुसरे दोघांस पांच पांच वर्षांची व चवथ्यास एक वर्षाची कैद झाली व चवथा मुकदमा सदोषमनुष्यवधाचा असून एक आरोपी होता त्यावर शाबिदी नाहीं म्हणून त्यास सोडून दिलें.

असें ऐकण्यांत आलें आहे कीं, शेट गंगाधर जोरावरमल साहू यांचे येथून त्याचा भाचा पनालाल यानें गैरहुकुमानें आफू विकलेली तहशिलदारानीं पकडली आहे. आफू सुमार १०० शेर आहे. गंगाधर शेट खानदेशांत मालेगांवाकडे गेलेले आहेत.

नवाबपुऱ्यांत गणपतीपुढें गावठी नाटक होत होतें तें पाहवयास गेलेली एक ब्राम्हणाची मुलगी भिंतीशीं उभी असतां तिला सर्पदंश झाला व त्याच रात्रीं मरण पावली. बिचारी बाळविधवा होती!

येथील डिपुटी कमिशनर आफिसांतील रिकार्डाचें काम रा० रा० रामचंद्र व्यंकटेश यांनीं चांगलें ठेविलें होतें असें कमिशनर साहेबानीं तपासणीचे वेळीं पाहिल्यावरून कळविलें आहे.

येथील प्रसिद्ध साहू शेट गुलाबराय यांचे मुनीम बसंतराय यास गेल्या महिन्यांत कामिशनर कोर्टांत सेशनचे कामीं असेसर नेमिले होते व ते समान रुजू करून हजर झाले नाहींत सबब त्यांस ५० रुपये दंड झाला.

कमिशनर साहेबांकडे सोमवारीं सेशन आहे.

गेले आठवडयांतील वऱ्हाडसमाचारांत येथील डिपुटी कमिशनर यांस सात वर्षांचे शिक्षेचा अधिकार मिळालेला लिहितांनां नावांत चूक पडून क्या० मेकंजी साहेब असें लिहिलें गेलें आहे. त्या ठिकाणीं क्या० हार्डन असें पाहिजे. व दुसरें वर्तमान असें कीं, क्या० मेकंजी साहेब बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर यांसही असा अधिकार मिळाला आहे.

गेल्या आठवडयांत येथें गणपती पोचविण्याचा समारंभ झाला. दक्षिण प्रांतापेक्षां इकडील ही तऱ्हा निराळी आहे. गावांत पांच चार गणपती फार मोठाले आहेत. त्यांतून कांहीं द्वादशीस व कांहीं चतुर्दशीस निघतात. ते संध्याकाळचे सात वाजतां मोठ्या रस्त्यावर येऊन सारी रात्र मिरवत राहतात. त्यांचे मिरवणुकीपुढे मोठा समारंभ काय तो दिंडयांचा. दिंडी म्हणजे अभंग म्हणून भजन करणारे लोकांची टोळी. या टोळ्या गावोगावाहून पूर्वीं निमंत्रणें करून बोलावित असतात. त्यांस फारसा खर्च लागत नाहीं. येतात तेव्हां संध्याकाळचें जेवण त्यांस दिलें म्हणजे झालें. तेवढयावर व देवाचें काम म्हणून ते सारी रात्र भर रस्त्यांतून मोठाले हेल काढून नाचत नाचत भजन करित असतात. अशा टोळ्या कोणा गणपतीपुढें पांच, कोणा

गणपतीपुढें दहा, कोणापुढें याहून अधीक अशी गर्दी असते. पलितेही पुष्कळ जळतात, दारूकाम थोडें असतें. व ग्यास धरून कांहीं गुबारे आकाशांत सोडित असतात. गावांतील व खेडयांपाडयांतील पुरुष व स्त्रिया हजारो पाहावयास जमतात याप्रमाणें रात्रभर क्रम चालवून पहाटेचे ५ वाजतां नदीवर गणपती पोंचवितात व कोणी तसाच पुढील वर्षांकरितां माघारा आणितात याप्रमाणें येथें वर्षास समारंभ होत असतो.

डाक्तर सिंक्लेअर साहेब उमरावतीहून परत आले.

क्या० हडलस्टन साहेब येथील कायमचे डिपुटी कमीशनर बिलायतेस रजेवर आहेत ते लवकरच परत येणार अशी बोलवा आहे.

डिपुटि कामिशनर साहेबाकडील सेशन कोर्टाकरितां रा० रा० माधवराव हरी त्या आफिसांतील क्लार्क यांस प्रासिक्युटर नेमिलें. बुलढाण्याचे क्लार्क मि० मीर चिरागुदीन हे हुशार आहेत याजकरितां त्यांसही तेथील डि० कमिशनरांनीं प्रासिक्युटर नेमावें अशी आम्हीं शिफारस करितों.

## Epitome of News

## वर्तमानसार.

राव ब० मोरोबा कानोबा यांस हाय कोर्टांत वकिलीचें काम करण्याविषयीं, पुष्कळ वाटाघाट होऊन, शेवटीं परमाणगी मिळाली.

शिपाई लोकांच्या उद्योगाचें प्रदर्शन मुंबईस २७ वे तारखेस सुरू होणार आहे.

पुण्यास घोडयांच्या शर्यती ९ वे तारखे पासून सुरू झाल्या.

माळव्याचे अफू वरील जकात कमी होण्याचा पुकारा झाला होता त्यावरून सरकारनें तारायंत्रांतून कळविलें आहे कीं ती बातमी खोटी आहे.

विलायतेस राहून नेटिवानीं विद्याभ्यास करण्याची गिलख्रिस्त साहेबांची स्कालरशिप आहे तिजकरितां मुंबई सरकारानें पुढील सालच्या जानेवारी महिन्याची १८ वी तारीख परीक्षा घेण्या करितां मुकरर केली आहे.

बाबु लालमोहन घोस व बाबु कृष्ण गोविंद गुप्त यानावाचे बंगाल्या कडील दोन गृहस्थ या महिन्यांत बिलायतेस सिविल सरविस चे परीक्षेस जात आहेत.

मद्रास इलाख्यांत एका हत्यारबंद मनुष्यानें च्यार मनुष्यें ठार मारिलीं व आणखी मारणार होता त्यास दोघी बायकांनीं पकडलें व त्याचें हत्यार काढून घेतलें-या त्यांच्या शौर्याबद्दल सरकारानें त्यांस पन्नास पन्नास रुपये बक्षिस दिले.

यासालीं आफूचें पीक गुदस्त पेक्षां अधिक होईल. बंगाल्या कड याच हंगमांत २७००० मण आफू इतक्यांत जमा झाली.

गुदस्त सालांत नोटीच्या नाण्याच्या संबंधानें सरकारास खर्च वजा होऊन ७२६०३४६रुपये निवळ नफा झाला. व खर्च झालेला पाहिला तर त्यांतून निमा खर्च इमारतीसंरदी वगैरे कडेसच आहे. तेव्हां तोही नफ्याचीच रकम समजावयाची.

जोधपुरचे राजेसाहेबानीं सरकारास विच्यारिलें आहे कीं आग्रापासून अहमेदपुरापर्यंत लोखंडी सडक आमचे राज्यांतून बांधण्यास आम्हांस परवाणगी द्यावी. आम्ही आपले खर्चानें युरोपियन इंजनेर ठेवून सर्व काम करणार.

मिस टाइनी या नावाची स्त्री आफ्रिका खंडांत शोधार्थ फिरत होती तिजवर उंटवाले सारवान लोकांनीं व तिच्या पदरच्या दोघां युरोपियन चाकरांनीं हल्ला केला व तिला ठार मारिलें. या बाईचें वय ३० वर्षांचें होतें.

पुढील महिन्याच्या पहिले तारखेस अंबाल्या पासून लुधियाना पर्यंत आगगाडी चालू होणार आहे. हीं स्टेशनें ईस्टइंडिया रेलवेचे वरील बाजूस हिमालयाचे पायथ्याशीं आहेत.

अमृतसर एथें सहावे तारखेस ४ व सातवे तारखेस ७ मनुष्यें महामारीनें मेलीं. गेल्या महिन्यांत याच तारखांस १२० व १३० मेलीं होतीं.

विलायते कडील घरगुती बातमीवरून कळतें कीं सर एच. राबिनसन हे मद्रासेच गवरनर होणार आहेत.

निळीचें पीक सालमजकुरीं कमी आलें आहे. बंगाल्यांतील व वायव्य प्रांतीं मिळून ७५००० मणांहून ज्यास्ती नीळ उत्पन्न होणार नाहीं असें म्हणतात.

इराणांत महामारीचा उपद्रव फार झाला होता. सिराज शहरांत अडीचहजार मनुष्यें मरण पावलीं.

गेल्या सहामाहींत ईस्टइंडिया रेलवेचे आगगाडींतून २६ लक्ष प्यासेंजर आले गेले. त्यांत शेकडा ९७ थर्डक्लासचे प्यासेंजर होते. हिंदुस्थानांतील सर्व आगगाडयांस प्यासेंजरचें जें उत्पन्न आहे त्याचे दोनतृतीयांश फक्त ईस्टइंडिया रेलवेचें प्यासेंजरचें उत्पन्न आहे.

मि० किंडर्स्ली साहेब म्हैसुरचे जुडीशल कमिशनर मद्रासचे हायकोर्टांत जडज होणार आहेत.

कराचीचे मुनसिपल कमिटीस गुदस्तसालीं उत्पन्न २,९९,७०३ रुपये झाले. हीरकम तिगस्त सालाहून ९८८६३ रुपयांनीं अधिक आहे. येकटया टीन डयुटीचें उत्पन्न १९६०९७ रुपये झालें.

मि० ब्रेटन साहिब जि. आय. पी रेलवेचे चीफ इंजिनियर येत्या महिन्यांत भुसावळ येथें साहिब लोकांस मोठी मेजवानी देणार आहेत. व तीकरितां स्पेशियल ट्रेनही काढणार आहेत.

सिमलायेथें सुंदर कलाकौशल्याचें प्रदर्शन या आठवडयांत सुरू होणार आहे. त्याची सुरवात नामदार गवरनर जनरल साहेब करणार. पुढील महिन्याचे तिसरे तारखे पर्यंत तें राहाणार आहे.

स्टांपा विषयीं—सन १८६२ चे १० वे आक्टाचे ३० वे कलमा अन्वयें दिवाणी कामदारांनीं आपले हुकुमनाम्याच्या नकला सरकारी कामदारांस पाठवावयाच्या त्या बाबदींत शंका निघून हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला कीं सरकारचे उपयोगाकरितां दिवाणी कामदारांनीं आपले हुकुमनामे किंवा इतर कागद पत्र यांच्या नकला पाठवावयाच्या त्यांस स्टांपकागदाची जरूर नाहीं. परंतु अशी साधे कागदावरील नक्कल न्यायाच्या कोर्टांत इनसाफी कामांत घेतली जाणार नाहीं.

जिल्ह्यांतील सरकारी वकील लोकांच्या नेमणुका वाढविण्याचे कामीं सरकारानें बंगाल्यांत नवें सांगशन दिलें.

तुरुंगाकडील अधिकाऱ्यांची समज होती कीं जुडिशल कामदारांस तुरुंगाची तपासणी करण्याचा अधिकार नाहीं. व त्यांनीं तुरुंग पाहण्यास येणें तर पूर्वीं सूचना पाठवीत जावी. हिंदुस्थान सरकारानें ठराव केला कीं जुडिशल कामदार अपराध्यास कैदेची सजा देतात त्या पक्षीं ज्या कैदखान्यांत कैदी राहवयाचे त्याची व्यवस्था कशी आहे हें पाहण्याची त्यांस जरूरी आहे. व ते वेळोवेळा पाहण्यास जात जातील तर फार चांगलें. व कळवून जाण्यापेक्षां अकस्मात जाणें हें बंदोबस्तास अधिक चांगलें आहे.

मि० क्यांबेल साहेब मध्य प्रांताचे चीफ कमिशनर बिलायतेस रजेवर आहेत ते लवकरच परत येणार असें हल्लींचे चीफ कमिशनर साहिबांस त्याचें पत्र आल्यावरून समजलें आहे.

हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे कीं सदर स्टेशनच्या जागीं बेसनदी सरकारी कामदार ज्यांच्या नेमणुका ग्याझेट मध्यें छापिल्या जातात तशा कामदारांचे घरीं ते आजारी पडले असतां सिविल सरजन म्हणजे सरकारी डाक्टर यानें त्यांस औषध देण्या करितां जात जावें. व जेथें अपाथिकरी, सबअसिस्टंट सरजन, अथवा आस्पिटल असिस्टंट असेल तेथें त्यानें मध्यम प्रतीच्या म्हणजे क्लार्क वगैरे कामदरांच्या घरीं औषध देण्यास जात जावें. व कनिष्ठ प्रतीचे नोकर लोकांकरितां डिस्पेन्सरीव आस्पिटलस आहेत. व वरिष्ठ प्रतीचे कामदारही यांतून आल्यास डाक्टरांनीं औषधें त्यांस दिलीं पाहिजेत.

मध्यप्रांतांत चिंधवाडा जिल्ह्यांत ३७७२९८ येकर पडीत जमीन आहे.

सिमला येथें एक चमत्कारीक खटला आला आहे. एका मनुष्यानें जाहिरात दिली कीं आमचा एक घोडा साडेच्यारशें रुपयांस विकावयाचा आहे. दुसऱ्या एकानें उत्तर दिलें कीं साडेतीनशे रुपयांस द्याल तर आमची सोय आहे. आम्ही घेऊं. त्यानें मान्य केलें. व घोडा घेणारानें रकम पाठवून दिली. व घोडा त्याच वेळेस आमचा आम्हांस पाठवून द्या असें कळविलें किंवा कसें, ठाऊक नाहीं. पण त्याच रात्रीं मूळ मालकाचे येथें घोडा मरण पावला. यावरून प्रश्न उत्पन्न झाला आहे कीं मरते वेळीं घोडा कोणाचा होता? व यावर कोर्टांत वादविवाद चालला आहे. काय ठराव होतो पाहावें.

गुरांस रोग होतात त्यांवर कारबालिक असीड फार प्रशस्त आहे असें मेजर त्रेवर साहेब दिनापुरचे डिपुटी असिस्टंट कमिसरी जनरल यानीं प्रसिद्ध केलें आहे.

इंडियन डेलीन्यूस पत्रावरील फिर्यादींतील शेफर्ड साहिब यांचे चिरंजीव ज्यांवर दरोडयाचा आरोप होता त्यांस सदर कोर्टानें १० वर्षे कैदेची शिक्षा दिली ही शिक्षा फारच कडक झाली असें तिकडील पत्रकर्ते लिहितात.

भुपाळच्या शहाजहान बेगम साहेबानीं एक उद्योगशाळा काढिली आहे- व तिला प्रिन्स आफ वेल्स स्कूल असें नांव दिलें आहे.

पंजाबाकडे दुष्काळ फार आहे म्हणून सरकारानें दीडलक्ष रुपये दिले आहेत. त्यांतून दुबळे व म्हातारे यांस अन्न देणार व इंजनेरी काम मोठें वाढविलें आहे त्यात गरीब गुरीबांस मजुरीस लावणार आहेत.

मुंबईच्या स्मालकाज कोर्टाचे जडज मि० माणकजी करशेटजी यांचे चिरंजीव बिलायतेहून बारिस्टर होऊन मुंबईस आले आहेत. यांनीं आक्सफर्डच्या युनिवर्सिटी मध्यें बी. ए. ची पदवी मिळविलेली आहे.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, काल रोजीं मी अकोल्यास आलों असतांनां मजजवळ असलेले कागद रस्त्यांत कोठें पडून गहाळ झाले या कागदांत माझें नांवचे पुर्जे दोन दर रुपये १२५ प्रमाणें २५० चे रिणकोनाम कवडया वल्लद गव्या महार व जामिनदार नान्द्या महार व दाणू महार राणू महार वस्ती पळसो याणीं मजपासून रुपये घेऊन दोन वर्षें झालीं लिहून दिलेले होते ते गहाळ झाले. जर कोणास सापडतील आणि तो इसम आम्हास आणून देईल तर आम्ही त्यास १० रुपये इनाम देऊ कळावें. तारीख २२ सपटेंबर १८६९ इ०

(सही) सखाराम वल्लद पिरथमजी पाटील वस्ती पळसो दस्तर खुद

## जाहिरनामा.

डिपुटी कमिशनर जिल्हा अकोलें प्रांत वऱ्हाड यांचें कोर्टांतून:—

मिस्तर बेजनजी आरदेसरजी माजी तहाशिलदार तालुके अकोलें हे तारीख २७ माहे जानेवारी सन १८६९ इसवी रोजीं अकोलें येथें मयत झाले. त्या मयतांनीं तारीख २२ जानेवारी सन मजकूर रोजीं लिहून दिलेलें उईल (मृत्युपत्र) चांदवी निसबत बेजनजी इणें आमचें कोडतांत हजर करून सन १८६५ चा आक्ट १० प्रमाणें प्रोबेट् मिळणें विषयींचा अर्ज केला आहे. त्याची चौकशी हें कोर्ट तारीख १९ माहे आकटोबर सन १८६९ इसवी रोजीं करील- सबब या जाहिरनाम्यावरून सर्वांस कळविण्यांत येतें कीं, सदरील नेमले तारखेचे आंत कोणीं येऊन वर लिहिलें चांदवी इजला प्रोबेट न मिळतां आपल्यास मिळावें अशी तकार न केल्यास चौकशी होऊन चांदवीस प्रोबेट दिलें जाईल. मुक्काम अकोलें तारीख २२ माहे सपटेंबर सन १८६९ इसवी.

माधवराव हरी
शिरस्तेदार

C. Hordern.
आफि० डिपुटी कमिशनर.

नोटिस—रामकृष्ण बिठ्ठल शिरस्तेदार मुकाम अडगाव यासी अकोल्याहून भगुलाल ताराचंद याजकडून आमची खाते बाकी रुपये ११४ तुम्हाकडून येणें आहे ती आली नाहीं. व पूर्वीं आम्ही तुम्हास लिहिलेलें पत्र नाटपेड पाठविलेंतें आपणास पोंचलेच असेल परंतु तुम्हाकडून जाब आला नाहीं. तर आतां लिहिण्यांत येतें कीं, मेहेरबानगी करून रुपये आठ दिवसांचें पोटांत पाठऊन द्यावे, नाहींतर साफ आम्ही तुम्हावर फिर्याद करूं कळावें. ता० २४ सपटेंबर १८६९ इ०

(सही) भगुलाल ताराचंद

नोटिस—निंबाजी वल्लद कुकाजी माळी पान्ड्रेर तालुके मलकापूर यास खालीं सही करणार नोटिस देते कीं, मी तुझी लग्नाची बायको असून लग्न होण्यास सुमारें १५ वर्षे झालीं. मी तुझे घरीं असतांनां मला दोन मुलें झालीं होतीं. परंतु हल्लीं ४ वर्षें झालीं तूं मला माझे बापाचे घरीं आणून त्यावर एकवेळ मला नेण्याचे निमित्यानें येऊन माझे बापाशीं बिनाकारण तंटा केला, आणि जाती वाले लोक जमा करून त्यास कांहीं एक दोष लावून जातीबाहेर टाकविलेस. त्या दिवसापासून तूं मला नेण्यास येत नाहींस व अन्नवस्त्रही पुरवित नाहींस यास्तव या नोटिशीनें तुला कळवितें कीं, ही नोटिस पावल्याचे तारखेपासून ८ दिवसांचे आंत मी आजपावेतो माझे बापाचे घरीं राहिले या बद्दल खर्च दरसाल रुपये ७५ प्रमाणें ४ वर्षांचे रुपये ३०० देऊन मला घेऊन जावें. असें न केल्यास मी तुझी ही फारकत समजून दुसरा पाटाचा नवरा करीन. मजवर तुझा कोणतेही प्रकारें हक्क राहाणार नाहीं कळावे तारीख २२ सपटेंबर सन १८६९ इ०

(सही) तुळसा मर्द निंबाजी हल्लीं वस्ती नांद्रे निशाणी बांगडी.

## मास्तर क्लेशाष्टक.

( चाल केका. )

मनासि बहुकाळज्या निशिदिनीं
हि पंतोजि त्या ॥करा श्रवण हो तुम्हीं
कथिन सर्वही आजि त्या ॥ मना करू
नियां जरा स्थिरचि लावणें लक्ष्य तें॥
खचीत पडतील हो श्रवणिं क्लेशची
लक्ष ते ॥ १
जना करूनि याचना मिळवि
बाळकें लेखना ॥ अनुग्रह शिशूमना
करितया श्रमालेखना ॥ जुना क्रमवि
ना घना नुतन शासना साधना ॥ उ
पाय सुचवी परी बहुत बालकां सा-
धना ॥२
छळा न सकळा खिळा शिशुस आग
ळा ज्या लळा॥अळा बसणिया खळा
हुनर योजि नाना कळा ॥ गुळासम
मधूर गी करूनि पुष्कळां घ्या फळा॥
चळावि न मनें कदा मज मुलांचिया
नाढळा ॥ ३
धरा फुरसती जरा करूनि जाउनी त्या
नरा ॥ खरा समज घ्या बरा मन करा
सुविद्यातिरा ॥ दराहि विसरा करा इ
तिं धरा त्वरा लेंकरा ॥ वरा न कधिं
ही स्मरा विमुख लेखना मंदिरा ॥ ४
धिरासहि धरा पुरा त्वरित लेखना सं
चरा ॥ सुरांस अमरागिरा स्तव करा
हरा निर्जरा ॥ स्मरामानिं खराखुरा स
दुपदेश तोही बरा ॥ परा न वशहि
स्मरा यमसुदुर्धरावाघुरा ॥ ५
महान श्रमतो असे वसुल कीं कराया
स फी ॥ लहान क्रम हा नसे म्हणुन
तीस आयास कीं ॥ नहान जरि इच्छि
तां शिशुसमूह या कारणीं ।।पहा न क
रितां दिलें अधि पयांशि निःकारणी ॥ ६
चुका न घडण्या फुका न करण्या अ
का कामुका ॥ ठकाहि अमिषाखिया
पळति आणिका मीं धका ॥ बकास-
मचि लक्षतें वसाविणें जसें काटका ॥
यदार्थि गुरूलग्नका अधिपहूकुमीं आ
टकां ॥ ७

( चालबदलून )

श्लोक.

ऐसा रात्रदिवा झटूनिहि कसा वाटे ज
नां श्वानसा ॥ मासांतीं मिळतो पगा
र जिवसा पोसावया शक्तिसा ॥ पुता
दो सकलां पसाभरहिसा याया जिवा
वाटिसा॥कैसा तूं परमेश्वरा उबगसी
आम्हांसिं गा दूरसा ॥ ८ ज्ञा० च०

---

**धुळें**—या आठवड्यांत पर्जन्य अगदीं नाहीं. उत्तरा नक्षत्र लागून ६ दिवस झाले ऊष्मा फार होत आहे. आकाश दिवसां ढगांनीं व्याप्त असतें. रात्रौ चांदणें पडून निरभ्र होतें. एकदोन पर्जन्य पडतील तर चांगलें होईल. गोळीचा आजार तुरळक आहे डा० साहेब यांचे उपचार होत आहेत. महर्गतेचें मान पूर्वींप्रमाणेंच असून फेरबदल नाहीं.

रावबहादुर भिकाजी रामचंद्र दप्तरदार १७ वे तारखेस येणार. खा० वै०

लंडनच्या पत्रावरून कळतें कीं, कोंब्रिज येथील युनिव्हरासिटीच्या पहिल्या परीक्षेंत बायका उमेदवार ३६ होत्या त्यांपैकीं गैरहजिर होत्या व परीक्षेंत उतरल्या नाहींत अशा अकरा. बाकी राहिलेल्या पंचवीस पसार झाल्या इं० प्र०

**नाशिक**, ता० ११ सप्तंबर १८६९, एकामित्राकडून—"खानदेशांतून एक मामलतदार थोड्या दिवसांपूर्वी आला होता, त्याच्या भोंवतीं दररोज हजारों लोकांची गर्दी होत असे, कारण तो नवसाला पावतो असें हिंदु लोक समजत. तो मोठा धर्म करणाराही आहे. त्यानें पुष्कळ लोकांस आपले आंगावरिल वस्त्रें देखील दिलीं. धर्म करणें चांगलें आहे पण मामलतदार साहेब यांस फार कर्ज असतां त्यांचा धर्म काय कामाचा? लोकांचें कर्ज तसेंच राहूं देऊन दानधर्म करणें योग्य नाहीं. "नांव मोठें आणि लक्षण खोटें" जो दुसऱ्यांलापाहिजे त्या नवसाला पावतो त्याला आपलें कर्ज फेडण्याची शक्ती नसावी काय? तर हें सर्व ढोंग आहे. लोक त्यावर कसा भरवसा ठेवतात कोण जाणें! ज्ञा० द०

रत्नागिरीचे हायस्कुलावरील मास्तर रा० रा० वामनराव आबाजी मोडक यांस ब्राम्हणांनीं बहिष्कृत टाकिल्याचा विचार नीतीस विरुद्ध व अप्रयोजक आहे. व मोडक यांजवर कसलाच दोष नाहीं असा शाळेंत सभा भरवून कित्येक संभावित गृहस्थांचा ठराव झाला व यादीवर सह्या झाल्या असें कळतें. ज० मि०

बेळगाव, धारवाड, कलादगी, सातारा व नगर येथिल दप्तरदारांस पेनशनांत काढिलें. व पुण्याचे दप्तरदार आणि दाक्षिण भाग रिविन्युचे दप्तरदार यांसही काढणार असें कळतें. बे० स०

सिविल सरवीस परीक्षेंत पास झालेले दोन नेटिव आधिक वयाच्या तक्रारींत काढिले आहेत. त्यांचा कमी वयाचा पुरावा अक्टोबर महिन्यांत पहाण्याचा ठराव झाला आहे. मि०द

**सातारा**—येथें गेले रविवारीं पुन[illegible]वाह अशास्त्र, आहे असें निरूपण करण्य[illegible] रितां विठोबा अण्णा दप्तरदार यांणीं स[illegible] भरविली होती. पण भाषण थोडेच झाले.

पर्जन्य पडावा तसा पडत आहे. काल रोजीं व आज सातार जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं पाऊस पडल्याची बातमी आली आहे.

येथिल रा० बा० दप्तरदारांस पेशनीचा हुकूम होऊन त्यांणीं आपले कामाचा चार्ज मे० हरण साहेब याजकडे दिला. म० मि०

**पुणें**— नेक नामदार गवरनर साहेब यांचा खासगी नौकर पोषाग करविणारा यानें एका हमालास जबर मारिलें. त्याबद्दल नामदार गवरनर साहेब यांणीं त्या हमालास कांहीं पैसा देऊन त्याची फिर्याद सरकारांत आलेली रद्द करविली असें ऐकण्यांत आलें आहे.

येथें आज जमलेले कलेक्टर लोकांची कमिटी कोर्द खतावणी कशी ठेवावी याच्या विचाराबद्दल भरणार आहे.

येथील दक्षणाप्रैज कमिटीचे सेक्रेटार मिस्तर शंकर पांडुरंग यांची नेमणुक कलादगी डेपुटी माजिस्त्रेटच्या हुद्यावर झाली तेव्हां त्यांच्या येथोल जागेवर मिस्तर राबजी शास्त्री गडबोले यांस दक्षणाप्रैज कमिटीचे रिवैझर नेमले म्हणून समजलें आहे. ज्ञा० च०

मिरजगांव जि० अहमदनगर येथिल रंगोबा जोशी नांवाच्या ब्राम्हणास अविवाहित कन्या फार मोठी वाढविली म्हणून जगद्गुरु शंकराचार्यांचे पुण्यांतील मठाधिकारी यांणीं बहिष्कृत केलें होतें. यामुळें आपणास पीडा झाली व आपलें नुकसान होत आहे अशा मतलबाची रंगोबा याणें मठाधिकाऱ्यावर फिर्याद केली होती तिचा निकाल पुण्याचे सिटि माजिस्त्रेट मेहेरबान रिचर्डसन साहेब यांणीं धर्माच्या बाबदींत हात घालीत नाहीं असें सांगून केला. रिचर्डसन साहेबांची प्रकृती जरी थंड आहे तरीं त्यांच्या हातून अन्याय झाल्याचें उदाहरण आमच्या ऐकिवांत नाहीं व यावेळेस त्यांणीं खरोखरच उत्तम न्याय केला असें म्हणून त्यांची तारीफ करावी लागते.

**ठाणें**—अलिबागचे कलेक्टर मि० शेफर्ड हे आपल्या कामावर रुजू झालें.

रा. रा. नारो पांडुरंग यांस ठाणें जिल्ह्यांत वाडे येथें मामलेदार कायम केले.

या आठवड्यांत पाऊस अगदीं नाहीं. पूर्ण उन्हाळ्याची छब भासूं लागली आहे. इतक्यांत पर्जन्य कृपा करील तर बरें. अरुणोदय.

---

## जाहिरखबरा.

---

**नोटिस**—बेशर्मी कालेखा वल्लद हाजीबखा वस्ती सिरसोली तालुके अकोट यांस नोटिस देणार गफूर महमद वल्लद शेख महेबूब वस्ती मजकूर सन १२७९ फसली कारणें नोटिस देतो ऐसाजे मौजे मजकूर येथिल आमचीं शेतें १० असोन हें सेत आमचें नांवें होतें मध्यंतरी आम्हास लोकांचें देणें झाल्या मुळें आम्हीं तुमचे नांवें खातें बाहाल करून देऊन आम्हीच वाहा-[illegible] असें असतां तुम्हीं बेमानीवर कंब[illegible] आम्हास त्या शेतांतून काढून दि-[illegible] या नोटिसीनें तुम्हासकळविण्यां-[illegible]ीं या नोटिसीचे तारिखे पासून पं[illegible]वसाचे पोटांत तुम्ही सदरहू शेत[illegible]राजीनामे देऊन आमचे शेत स्वाधीन करून द्यावें असें तुम्हाकडून न झाल्यास तुम्हावर दिवाणीत फिर्याद करून या नोटिसीचे खर्चासुद्धां तुम्हापासुन भरून घेतले जाईल हें आपणास कळावें तारिख२१ माहे सप्तंबर सन १८६९ इसवी.

( सही ) गफूरमहमद वल्लद शेख महेबूब निशाणी खुद्द हातची

---

**नोटिस**—मुरली सिंग खत्री हलवाई दुकान खामगांव वहिवाटदार रामसुख गौड ब्राम्हण यांशीं केशव रामजी रामजस साहू दुकान खामगांव तालुके बाळापूर सदर्हू नोटिस देण्यांत येत आहे कीं, पेठ मजकुरी आमचें एक दुकान तुह्मास पूर्वीं भाड्यानें दिलें होतें. त्याचा करार मित्ती भाद्रपद शुद्ध १ मुताबीक तारिख७ सप्टेंबर सन १८६९ इसवी रोजीं पावेतों होता त्यास आम्हि कराराचे पूर्वीं एक महिना दोन चार वेळां तुम्हास ताकीद केली होती कीं, आमची दुकान करारशीर खालीं करून द्यावी तेव्हांपासून तुम्ही खालीं करून देऊं देऊं म्हणता परंतु अद्याप पावेतों खालीं करून देत नाही. सबब नोटिस देण्यांत येते कीं, आजपासून आठ दिवसांत आमचें दुकान खालीं करून द्यावें कदाचित आठ दिवसांत तुम्ही न खालीं केलें तर बारा महिन्याचे रुपये ५०० अक्षरी पाचशे शिक्के कंपनी व या नोटिशीचे खर्चासुद्धां दिवाणी कोर्टांत फिर्याद करून भरून घेण्यांत येईल कळावें. तारीख २१ माहे सपटेंबर सन १८६८ इसवी सदरील आठ दिवसाचे आंत तुम्हीं दुकान खालीं करून न दिल्यास आमचा किराया तुमचे कडेस रुपये ५०० भरून घेण्यांत येईल.

(सही) केशवरामजी रामजस साहू दुकान खामगांव दस्तुर गोविंद इछयाराम गुमास्ते कुलमुखत्यार

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास दोन वर्षें होत आलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या मोहन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं-

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

---

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररूपयास अर्धआणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे
मालक.

---

## नादारी प्रकरणीं नियम.

हें पुस्तक आमचे छापखान्यांत मागेंच छापून तयार झालें आहे. वऱ्हाडांतील न्यायाच्या कोर्टांत हे नियम चालतात. किंमत ८६ सहा आणे व डाक हाशिल एक आणा पडेल. व. स. म्यानेजर.

---

| किमतीचे ठराव. | रु. | अ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | ४ | |
| फुटकळ … … … | ० | ५ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

---

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी.

---

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८।८६

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत माळकांकरितां छापून प्र० केलें